CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २२ ऑक्टोबर २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक ३२३ | पाने १२ | किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

डायरेक्ट मिलच्या दरात खरेदी करा.
N.R. DHOOT GROUP Since 1975
धूत सिल्क सारीज्
९१२, चाटी गल्ली, सोलापूर. | कावळे मेडिकलच्या बोळात, चाटी गल्ली, बाळीवेस, सोलापूर.
खरेदी करा कुपन मिळवा
जिंका लाखोंची बक्षिसे


5, औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक 2026 | राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार
अ.क्र. 2
चव्हाण सतीश भानुदासराव
बी.ई. (मेकॅ.)
पसंती क्र. 1
यांनाच प्रथम पसंतीचे मत देऊन विजयी करा!
मतदान - शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 वेळ - सकाळी 8:00 ते दुपारी 4:00 पर्यंत
मतदार यादीत आपले नाव पाहण्यासाठी 0794 344 9512 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
प्रकाशक : नितीन बागवे


## विचारपुष्प



मनाचे नियंत्रण आत्म्यापासून होत असते. जर मन विकारांचे शिकार झाले तर ते मन बुद्धीला भ्रष्ट करून टाकते. आणि ही भ्रष्ट झालेली बुद्धी आत्म्याला अनात्म करून टाकते. या सर्व क्रिया फक्त मानवी शरीरातच होतात. म्हणून मानवी जीवनात मन सुसंस्कारित ठेवण्यासाठी मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक पातळ्यांवर विविध उपक्रमांची रीतसर अशी व्यवस्था आवश्यक असते.

**- स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# समरसता, संघटित समाजातून समर्थ भारताची निर्मिती

### संघाच्या शताब्दी वर्ष समारोपात डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन



**नागपूर, २१ ऑक्टोबर**
विविधतेचा स्वीकार आणि सन्मान, सामाजिक समरसता, स्वबोध, स्वदेशीचा अंगीकार, नागरिक कर्तव्यांचे पालन आणि संघटित समाजातूनच समर्थ भारताची निर्मिती होऊ शकते. समाजातील परस्परविश्वास, सद्भावना आणि एकात्मता दृढ करीत संघटित पुरुषार्थाच्या बळावर भारताला विश्वगुरुपदावर नेण्यासाठी प्रत्येकाने आपल्या व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवावे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

रेशीमबाग मैदानावर मंगळवारी (२० ऑक्टोबर) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवात ते बोलत होते. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांच्या समारोपप्रसंगी त्यांनी, संघाच्या शंभर वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, आगामी वाटचालीची दिशा स्पष्ट केली. भारताची विविधतेने नटलेली संस्कृती हीच राष्ट्रीय एकात्मतेचा आधार असल्याचे सांगताना सरसंघचालक म्हणाले, भाषा, जात, पंथ, प्रांत,

**(शेवटच्या पानावर)**

### पंचपरिवर्तनाचा विस्तार, व्यसनमुक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेवर भर

### भारतीयत्व आणि हिंदुत्वाचा प्रभाव निर्माण होण्याचे श्रेय संघाला : संजय गुप्ता



आपल्या भाषणात संजय गुप्ता म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नसता, तर हिंदू संस्कार आणि हिंदू जीवनपद्धती कदाचित फार पूर्वीच लुप्त झाली असती. जवळपास सहाशे वर्षांच्या पारतंत्र्यानंतरही भारतीयत्व आणि हिंदुत्वाचा प्रभाव जगभरात निर्माण होण्याचे श्रेय संघालाच द्यावे लागेल. काळानुसार समाजात निर्माण होणाऱ्या कुप्रथा दूर करण्यासाठी संघासारख्या निष्काम भावनेने कार्य करणाऱ्या संस्थांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यानंतर सनातन भारतीय मूल्यांचा प्रचार-प्रसार करून त्यांचे महत्त्व जनमानसाला समजावून सांगण्यात संघाची भूमिका महत्त्वाची राहिल्याचे नमूद करीत, हिंदू समाज जाती-पातीत विभागला जाऊ नये, यासाठी या मूल्यांचे जतन आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. संघाच्या आगामी शतकातील कार्यात देशवासीयांचे चारित्र्यनिर्माण सर्वोच्च प्राधान्याचे असावे. भारताला पुन्हा सुवर्णयुग प्राप्त करून देण्यासाठी चारित्र्यनिर्माणाशिवाय पर्याय नाही, असेही गुप्ता यांनी स्पष्ट केले.

# आणखी सात जणांना अटक



**मुंबई, २१ ऑक्टोबर**
अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणात दिल्ली व मुंबई पोलिसांनी बुधवारी दोन महिलांसह सात जणांना हरयाणातून अटक केली. या प्रकरणात आतापर्यंत १० आरोपींना अटक झाली आहे. कुणाल, सुमित, अंकित, समीर व जतीन, राधा, बबिता, अशी आरोपींची नावे आहे. यापूर्वी राजस्थानच्या कोटामधून तीन शूटर्सना अटक करण्यात आली होती.

आरोपी कुणाल, सुमित, अंकित, समीर, जतीन हे हरयाणातील सोनीपतचे रहिवासी तर राधा आणि बबिता उत्तर प्रदेशातील आहे. या आरोपींवर हल्लेखोरांना शस्त्रे पुरवल्याचा आरोप आहे. राधा आणि बबिताने शस्त्रे मुंबईत पोहोचवून शूटर्सपर्यंत पोहोचवण्यात भूमिका बजावल्याचा संशय आहे. या दोन्ही महिला ट्रेनने मुंबईला गेल्या आणि शस्त्रे सुपूर्द करण्यासाठी त्यांनी तेथील एका व्यक्तीशी संपर्क साधला. पोलिस आता आरोपींमधील संबंध, शस्त्रांची हालचाल आणि या संपूर्ण नेटवर्कमध्ये सामील असलेल्यांच्या भूमिकेचा तपास करत आहेत. (वृत्तसंस्था)

### जतीन हल्लेखोरांसोबत मुंबईत होता वास्तव्यास

आरोपींपैकी दोन महिलांनी शस्त्रे हल्लेखोरांपर्यंत पोहोचवली. तर जतीनसह दोघांनी रसद पुरवली होती. जतीन यापूर्वी अटक केलेल्या तीन आरोपींसोबत मुंबईत वास्तव्यास होता आणि तो त्यांना मदत करत होता. तसेच अंकितही मुख्य आरोपीसोबत सुमारे २० दिवस मुंबईत होता. त्याच्याकडे रेकी करण्याची जबाबदारी होती. तर समीर मुख्य आरोपीच्या सतत संपर्कात होता. सुमित एका कपड्यांच्या दुकानात काम करत असे. बबिता इलेक्ट्रिकल वायरिंग टेक्निशियन म्हणून तर राधा कुणालची गर्लफ्रेंड आहे.

# जोडबसवण्णा चौकात रिक्षा चालकावर चाकूने खुनी हल्ला

- छातीत अडकलेल्या चाकूसह सिव्हिल मध्ये
- शस्त्रक्रियेने चाकू काढला बाहेर
- एका आरोपीस अटक, दुसरा फरार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
मागील भांडणाच्या रागावरून एका रिक्षा चालकास चाकूने वार करून गंभीर जखमी करण्यात आल्याची घटना जोडबसवन्ना चौकात सोमवारी रात्री नऊ वाजता घडली. दरम्यान या खुनी हल्लाप्रकरणी दोघा मारेकरी तरुणांविरुद्ध जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ताजोद्दीन चांदसाब शेख, मोहसीन लियाकत चौधरी(रा. राहुल गांधी झोपडपट्टी सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत खालिद आसिफ शेख ( वय- ३३, रा. ८९, साखर पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ९.१५ वा. चे सुमारास न्यु गोविंद मेडीकलजवळ, जोडबसवण्णा चौक, येथे रिक्षा भाडे मारण्यासाठी थांबलेले होते. सदर वेळी वरील आरोपी हे मागील भांडणाचा राग मनात धरुन बुलेट वाहनावरून त्या ठिकाणी आले. फिर्यादीस तेरी औकात क्या हमारे साथ झगडे करनेकी, तुझे बहुत मस्ती आई, तुझे अब जिंदा रखता नही, तुझे खतम करता अशी धमकी देऊन आरोपी ताजुद्दीनने कमरेला ठेवलेला चाकू काढून फिर्यादीच्या छातीमध्ये उजव्या बाजुला भोसकला. हल्ल्यात चाकू जखमीच्या छातीमध्ये अडकला गेला. या खुनी हल्ल्यात फिर्यादी हा गंभीर जखमी झाल्याने त्याला मदतनीस शाहिदने उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात चाकूसह रात्री दहा वाजता दाखल केले. त्यानंतर शस्त्रक्रिया करून छातीत अडकलेला चाकू काढण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### खुनी हल्ल्यातील मुख्य आरोपी जेरबंद; आज कोर्टात हजर करणार

दरम्यान या खुनी हल्ल्यानंतर पसार झालेला मुख्य आरोपी ताजोद्दीन शेख याला जेलरोड पोलिसांनी आज बुधवार रोजी सायंकाळी अटक केली आहे. तो ट्रक चालक असून त्याचा भाऊ हा रिक्षा चालक आहे. काही दिवसांपूर्वी आरोपीच्या भावाचे व यातील जखमीचे रिक्षात प्रवासी भरण्यावरून तक्रार झाली होती. या रागातूनच आरोपीने हा खुनी हल्ला केला. तर दुसरा आरोपी मोहसीन चौधरी हा अद्याप फरार असून पोलीस त्याच्या मागावर आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपीला उद्या गुरुवारी दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती तपासी अमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी दिली.

# अवैध शस्त्रे विक्रीच्या तयारीत असलेल्या इसमास अटक

### २ गावठी पिस्तुले, ४ काडतुसे जप्त; एमआयडीसी पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
गावठी पिस्तूल व काडतुसे विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या एका इसमाला एम आयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून दोन देशी बनावटीची गावठी पिस्तुले, चार जिवंत काडतुसे आणि एक मोटारसायकल असा एकूण १ लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी आज बुधवारी सायंकाळी पत्रकार परिषदेत दिली.



हुसेन अहमद मकबूलसाब कुमसी (वय ४१, रा. शिवगंगा नगर, नई जिंदगी , सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. एम आयडीसी पोलिस ठाण्याच्या गुन्हे शाखेचे फौजदार अल्फाज शेख यांना गोपनीय बातमदारामार्फत माहिती मिळाली की, विमानतळाच्या पाठीमागील रस्त्याने सिद्धेश्वर साखर कारखान्याकडे जाणाऱ्या मार्गावरील सनराईज शाळेसमोरील मोकळ्या मैदानाजवळ एक व्यक्ती गावठी पिस्तूल विक्रीसाठी येणार आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कळवून एमआयडीसी पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचला. आरोपी हुसेन अहमद कुमसी याला ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिशात एक गावठी पिस्तूल व गाडीच्या डिग्गीत एक अशी दोन गावठी पिस्तूल आढळून आली. त्याच्यासोबत चार जिवंत काडतुसे होती. या प्रकरणी एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही शस्त्रे संशयिताकडे कुठून आली, ती कोणाला विक्री केली जाणार होती आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.

हि कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त प्रितम यावलकर, आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. बिराजदार, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार राकेश पाटील, संदिप जावळे, आमसिध्द निंबाळ, एकनाथ उबाळे, सचिनकुमार लवटे, सुहास अर्जुन, अमर शिवशिंगवाले, नागेशसिंह चव्हाण, अजित माने, अविनाश दिघोळे, अमोल खरटमल, सकलेन मुकादम, अयाज बागलकोटे, कुमार बोल्ली दिपाली राठोड यांनी पार पाडली.

तुमचे नामनिर्देशन तपशील अद्ययावत करा
आणि तुमच्या महत्त्वाच्या व्यक्तींचे संरक्षण करा


सर्व बँक ठेव खात्यांमध्ये आणि लॉकरमध्ये नामनिर्देशन नोंदवा.
ऑनलाइन किंवा ऑफलाइन माध्यमांद्वारे नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण करा.
नामनिर्देशन तपशील अद्ययावत ठेवा.
एकाच वेळी जास्तीत जास्त 4 नामनिर्देशित व्यक्तींची नावे लिहा. बँक ठेवींसाठी प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीचा हिस्सा नमूद करा.
किंवा
जास्तीत जास्त 4 नामनिर्देशित व्यक्तींची नावे क्रमाने लिहा. बँक ठेवी तसेच सुरक्षित ठेव लॉकरसाठी प्राधान्यक्रम निश्चित करा (मागील नामनिर्देशित व्यक्ती(क्तीं)चा मृत्यू झाल्यास).


अधिक माहितीसाठी, https://rbikehtahai.rbi.org.in/nomination-and-settlement वर जा
अधिकृत व्हॉट्सअप नं. 99990 41935 / 99309 91935
सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# शिक्षक नसतानाही मतदार यादीत नाव

## बनावट कागदपत्रांचा वापर; ११ जणांविरोधात बार्शीत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ ऑक्टोबर-**

शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या मतदारयादीत शिक्षक नसतानाही मुख्याध्यापकांचे बनावट सही-शिक्के व प्रमाणपत्र सादर करून नावे समाविष्ट केल्याचा गंभीर प्रकार बार्शी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी झोनल ऑफिसर तथा गटशिक्षण अधिकारी गजानन बाळूजी बाजड (वय ५३) यांच्या फिर्यादीवरून ११ अर्जदारांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २२ सप्टेंबर रोजी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची मतदार यादी प्रसिद्ध केली होती. या यादीत शिक्षक नसतानाही काही व्यक्तींची नावे समाविष्ट झाल्याच्या बातम्या समाजमाध्यमांवर प्रसारीत झाल्या होत्या. या अनुषंगाने संबंधित अर्जाची पडताळणी केली. अर्जदारांनी 'एम. जी. गुरुकुल पेढे (ता. पंढरपूर)' आणि 'छत्रपती शिवाजी विद्यालय, ज्योतीबाची वाडी (ता. बार्शी)' या शाळांचे प्रमाणपत्र जोडल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, निवडणूक कार्यालयाने संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडे चौकशी केली असता, त्यांनी सदर व्यक्ती या शाळेत शिक्षक नसल्याचे पत्राद्वारे स्पष्ट कळवले. तहसील कार्यालय बार्शी येथे २१ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर दरम्यान कार्यालयीन वेळेत शिक्षक मतदार नोंदणीसाठी शिक्षक नसताना मुख्याध्यापकांचे खोटे बनावट प्रमाणपत्र सादर करून नाव नोंदवल्याप्रकरणी ११ जणांवर गुन्हा नोंदवण्यात आला

**चौकट : हे आहेत गुन्हेगार**

मोहन बाळासाहेब भोसले (रा. ज्योतीबाची वाडी, ता. बार्शी), अक्षय श्रीहरि चव्हाण (रा. जवळगाव, ता. बार्शी), तुषार मोहन भोसले (रा. रुई, ता. बार्शी), स्वप्नील अंबरुषी कापसे (रा. अंबाबाईची वाडी, ता. बार्शी), रोहीत बाबासाहेब कापसे (रा. अंबाबाईची वाडी, ता. बार्शी), पृथ्वीराज बाळासाहेब कापसे (रा. अंबाबाईची वाडी, ता. बार्शी), शुक्राचार्य शाहूराजे बाबर (रा. अंबाबाईची वाडी, ता. बार्शी), सुरज युराज बाबर (रा. अंबाबाईची वाडी, ता. बार्शी), सुदेश नवनाथ कापसे (रा. ज्योतीबाची वाडी, ता. बार्शी), अभिजीत बापू डिसले (रा. ज्योतीबाची वाडी, ता. बार्शी), संतोशी किशोर धेंडे (रा. ज्योतीबाची वाडी, ता. बार्शी).

## शेतातील पैशाच्या वाटणीवरून भावाला मारहाण

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

शेतातील पैशाच्या वाटणीवरून झालेल्या वादातून लहान भावाला लोखंडी सळईने मारहाण करून जखमी केल्याची घटना १९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास कुमठे तांडा येथे घडली. याप्रकरणी मोठ्या भावा विरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजुदास गुरुप्पा चव्हाण (रा. कुमठे तांडा, सोलापूर) असे गुन्हा दाखल केलेल्या मोठ्या भावाचे नाव असून याबाबत संतोष गुरुप्पा चव्हाण यांनी फिर्याद दिली आहे.१९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास कुमठे तांडा, सोलापूर येथे यातील फिर्यादी संतोष चव्हाण यांना आरोपी राजुदास चव्हाण याने शेतात आलेले पैशाची वाटणी मागितल्याच्या कारणावरून हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच हातातील लोखंडी सळईने फिर्यादीच्या डाव्या डोळ्याच्या बाजूस मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार मणुरे हे करत आहेत.

## महत्वाचे...



## बजरंग दलतर्फे विजया दशमी साजरी

**अक्कलकोट, दि. २१ ऑक्टोबर -**

अक्कलकोट तालुका बजरंग दलतर्फे विजय दशमी दसरा निमित्त प्रभू श्री राम मंदिरात शस्त्र पूजन करण्यात आले. शस्त्र पूजनास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा ग्राम विकास मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, बजरंग दल तालुका संयोजक मदनकुमार राठोडसह संयोजक सुनील पाटील, दिनेश मिंगगळे, सुनील शिंदे, विनोद शिंदे, राहुल जाधव, बळीराम पवार, सचिन भंडारे, राजू शेजुळे उपस्थित होते.




## संत सेवा वाचन कट्ट्याचा प्रारंभ

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून संत सेवा वाचनालयाच्या वतीने सुरू केलेल्या संत सेवा वाचन कट्टा'या उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ झाला. या प्रसंगी ज्येष्ठ लेखक हेमकिरण पत्की प्रमुख उपस्थित होते. दर शनिवारी सायंकाळी ६ ते ७ या वेळेत आयोजित करण्यात येणाऱ्या या वाचन कट्ट्याच्या माध्यमातून वाचकांना पुस्तके वाचण्यासाठी, त्यांवर चर्चा करण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. हेमकिरण पत्की यांनी संबोधित केले. वाचनालयाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी यांच्या हस्ते पत्की यांचा सत्कार केला. कार्यक्रमाला संत सेवा वाचनालयाचे नूतन संचालक श्रीधर खेडगीकर, संचालक महेंद्र दीक्षित, गौरी किणीकर, मिता जवळकर, कार्यवाह नितीन गोवर्धन,ग्रंथपाल परिणीता नेसरीकर यांच्यासह विकास धांडोरे, आकाश कोठाडिया आणि अनेक वाचक उपस्थित होते. संत सेवा वाचन कट्टा हा उपक्रम दर शनिवारी सायंकाळी ६ ते ७ या वेळेत वाचनालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात होणार आहे.



## नवरात्रोत्सवानिमित्त 'आपुलकी'तर्फे महिलांना शिलाई मशीन भेट

**सांगोला, दि.२१ ऑक्टोबर-**

नवरात्रोत्सवाचे औचित्य आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला या सामाजिक संस्थेच्या वतीने दोन गरजू महिलांना शिलाई मशीन भेट देण्यात आल्या. या उपक्रमामुळे संबंधित महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी हातभार लावण्यास मदत होणार आहे. महिलांचा सन्मान करण्याबरोबरच रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्याचा उपक्रम आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आला. या अंतर्गत उज्वला बनसोडे आणि सोनाली बोधे यांना शिलाई मशीन भेट दिल्या. केवळ मदत करण्यापुरते मर्यादित न राहता गरजू महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, हा उद्देश आहे. उपक्रमातून महिलांच्या सक्षमीकरणाचा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, चंद्रशेखर कवडे, अरविंद डोंबे, महादेव बोराळकर, अशोक सावंत, संदीप खाटपे उपस्थित होते.

## महावितरणच्या तांत्रिक कामगारांचे आज राज्यव्यापी धरणे आंदोलन

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

महावितरण कंपनीतील तांत्रिक कामगारांच्या प्रलंबित मागण्यांवर प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (१०२९) च्या वतीने २२ ऑक्टोबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी भव्य धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. संघटनेचे केंद्रीय सरचिटणीस रवी बारई यांनी हा सज्जड इशारा दिला आहे. यापूर्वी ६ व ९ ऑक्टोबर रोजी विभागीय व मंडळ कार्यालयांसमोर झालेली निदर्शने यशस्वी झाली होती. वरिष्ठ तंत्रज्ञ ते यंत्रचालक अंतर्गत भरती तात्काळ राबवणे, वद्युत सहाय्यकांना वाढीव इंधन भत्ता देणे किंवा इलेक्ट्रिक दुचाकी उपलब्ध करणे, ह्व सुरक्षा साधने, हत्यारे आणि साहित्याचा पुरवठा करणे; सडलेले खांब व तारा बदलणे, महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र वॉशरुम आणि नाईट ड्युटी दरम्यान स्वतंत्र केबिनची व्यवस्था करणे. आदी मागण्या करण्यात येणार आहे. या आंदोलनात सोलापूर जिल्ह्यातून सुमारे १०० ते १२५ कर्मचारी उपस्थित राहणार असल्याची माहिती पुणे प्रादेशिक संघटक सुनील काळे यांनी दिली आहे.

## घरासमोर लावलेली मोटारसायकल लंपास

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

घरासमोर पार्क केलेली ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना हुच्चेश्वर मठाजवळ १८ ऑक्टोबर रोजी रात्री ९ ते १० वाजेच्या दरम्यान केवळ तासभरात घडली. याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे. याबाबत मुलप अड्डाकुलु (रा. हुच्चेश्वर मठाजवळ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीने १८ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता त्यांची हिरो फॅशन प्रो मोटारसायकल (क्र. एमएच १३ बीएच ००६४) नेहमीप्रमाणे घरासमोर पार्क केलेली होती. तासाभरात १० वाजेच्या दरम्यान चोरट्याने ती चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार विधाते करत आहेत.



## पांगरीत एमआयटी कोरर, सेसातर्फे वंचित विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि, २१ ऑक्टोबर-**

एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय व संशोधन केंद्र (एमआयटी कोरर), बार्शी येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेतर्फे (सेसा) वंचित व गरजू विद्यार्थ्यांसाठी सामाजिक उपक्रम राबवला.

राजीव गांधी केंद्रीय निवासी प्राथमिक व माध्यमिक (अ.जा.) आश्रम शाळा, पांगरी, येथे उपक्रम झाला. उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वयंसेवकांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उपक्रमातून अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना समाजसेवेचे महत्त्व आणि समाजाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीची जाणीव झाली. उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध केले. कार्यासाठी सुरज गायकवाड, राजेश राऊत आणि एस के कन्टरक्शन यांनी सहकार्य केले. सुरज गायकवाड आणि सम्यक स्ट्रक्चरल कन्सलटन्सीकडून विद्यार्थ्यांना ड्रॉइंग बुक्ससह अन्य शैक्षणिक साहित्य दिले. एस. के. कन्स्ट्रक्शनच्या वतीने वह्यांचे वाटप केले.

उपक्रमाचे आयोजन स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. अमित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. सेसाचे प्राध्यापक समन्वयक प्रा. निरंजन पाटील यांनी उपक्रमाच्या नियोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सेसाच्या अध्यक्षा गौरी पाटील यांच्या नेतृत्वाखाली सेसाच्या सर्व समिती सदस्यांनी आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. उपक्रमास सहकार्य करणाऱ्या सर्वांचे संघटनेतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.



## हर्षदा देशमुख-जाधव यांच्या प्रचारार्थ अकलूजला मतदारांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ ऑक्टोबर-**

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार हर्षदा देशमुख-जाधव यांच्या प्रचारार्थ अकलूज येथे कृष्णप्रिया हॉलमध्ये मेळावा झाला. उमेदवार हर्षदा देशमुख, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, शितलदेवी मोहिते-पाटील, माजी आमदार रामहरी रुपनवर, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, प्रकाश पाटील, शंकरराव माने-देशमुख आदी उपस्थित होते.

हर्षदा देशमुख-जाधव यांनी आपल्या विचारांचे लोकप्रतिनिधी सभागृहात पाठवायचे असतील, तर मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावे, असे आवाहन केले. शितलदेवी मोहिते-पाटील आणि माजी आमदार रामहरी रुपनवर यांनीही मनोगत व्यक्त केले. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आपल्या विचाराचे जास्तीत जास्त प्रतिनिधी असले पाहिजेत. तसेच रामहरी रुपनवर यांनी मोहिते-पाटील यांनी केलेली कामे ठणकावून सांगितल्याबद्दल त्यांचे आभार मानले. हा मुद्दा जागच्या जागी मांडल्याबद्दल मोहिते पाटील परिवार रामहरी रुपनवर यांचा आभारी आहे, असेही खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले.

**रुपनवर यांचे सडेतोड उत्तर**

माजी आमदार रामहरी रुपनवर यांनी त्याच सभेत मोहिते पाटील यांनी गेल्या सत्तर वर्षांत केलेल्या कामांचा ठणकावून उल्लेख करून या प्रश्नाला सडेतोड उत्तर दिले. त्यांच्या कामामुळेच तुम्हाला मागे लोकांनी निवडून दिल्याचा उल्लेख केला.

## ऊस तोडणी मशीन बंद करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**मंगळवेढा दि. २१ ऑक्टोबर-**

दुष्काळी परिस्थितीमुळे तालुक्यात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. त्यातच हार्वेस्टर यंत्राद्वारे ऊसतोड होत असल्याने जनावरांसाठी उपयुक्त ठरणारे उसाचे वाढे व पाचट यांचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी जिल्ह्यातील कारखान्यांना सूचना देऊन ऊस तोडणी यंत्र बंद करावेत अशी मागणी शेतकरी करत आहेत. उसाचे वाढे आणि इतर चारा पशुपालकांसाठी महत्त्वाचा आधार ठरतो. मात्र, यंत्राद्वारे ऊसतोड करताना हा चारा बारीक होऊन शेतातच पडतो. ऊसतोडीचे नियोजन करताना केवळ ऊस कारखान्यापर्यंत पोहोचविण्यापुरता विचार न करता, त्यातून जनावरांसाठी चारा कसा उपलब्ध होईल, याचाही विचार करावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

## अकलूजमध्ये दांडिया, गरबा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. २१ ऑक्टोबर-**

जैन सोशल ग्रुप अकलूज व संगिनी फोरम अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने कांतीलाल सांस्कृतिक भवन शंकरनगर-अकलूज येथे दांडिया व रासगरबा महोत्सव २०२६ तसेच कोजागिरी पौर्णिमा महोत्सवाचे भव्य आयोजन केले होते.




कार्यक्रमाचे नियोजन जैन सोशल ग्रुप अकलूजचे अध्यक्ष सीए अमित दोशी, सचिव गौरव फडे, संगिनी फोरमच्या अध्यक्षा भक्ती वैद्य व सचिव अर्पिता गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे कार्यक्रम पार पडला.विविध वयोगटांनुसार स्पर्धा झाल्या. यामध्ये ५ ते १० वर्षे वयोगट, १० ते १५ वर्षे वयोगट, खुला गट तसेच जोडीदार गट अशा विविध गटांचा समावेश होता. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या सदस्यांनी दांडिया व रास गरबाच्या तालावर ठेका धरत कार्यक्रमाचा आनंद लुटला. सर्व विजेत्यांना बक्षिसे व ट्रॉफी दिली. परीक्षक म्हणून नेहा फडे तसेच प्रतीक्षा काळेल लाभले.

सर्वांसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था होती. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मसाला दुधाचीही व्यवस्था होती. कार्यक्रमासाठी पियुष दोशी, अमेय व्होरा, शितल व्होरा, डॉ.निलेश फडे, विरन गांधी, राहुल व्होरा, धवल गांधी, अन्वित गांधी, आनंद देसाई यांनी विशेष सहकार्य केले. तसेच संगिनी फोरमच्या वतीने सपना दोशी, डॉ.मानसी गांधी,श्रुती फडे, अमृता गांधी, रिया गांधी, मेघना फडे, नितुजा चंकेश्वरा, सेजल दोशी, काजल खिवंसरा, प्राची चंकेश्वरा, कोमल व्होरा आदींनी योगदान दिले.



## पंढरपुरात धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.२१ ऑक्टोबर-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समिती, पंढरपूर आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन पंढरपूर येथे साजरा करण्यात आला.

सुरुवात भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. हे पूजन आमदार समाधान अवताडे आणि मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. भव्य धम्म रॅलीचे शहरात ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. 'बुद्धं शरणं गच्छामि' च्या जयघोषाने संपूर्ण पंढरपूर नगरी दुमदुमून गेली होती.कार्यक्रमास समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, भारतीय बौद्ध महासभेचे जितेंद्र आठवले गोविंद सर्वगोड,राहुल सर्वगोड, आरपीआय नेते आप्पासाहेब जाधव,बाळासाहेब कसबे, सुनील सर्वगोड, रामदास सर्वगोड, आर पी आयचे तालुकाध्यक्ष संतोष पवार रिपब्लिकन सेनेचे सागर गायकवाड, भीमशक्ती मंडळाचे संतोष सर्वगोड आदी उपस्थित होते.

# जन्मेजयराजे भोसले, महेश इंगळे यांना जगद्गुरु बसवलिंग रत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ ऑक्टोबर-**

श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, विश्व फाउंडेशन शिवपुरीचे संस्थापक डॉ.पुरुषोत्तम राजीमवाले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले, हृदयरोग तज्ञ डॉ.शैलेश पाटील, कलाकार ईश्वर हिरेमठ कनकूर यांना यंदाचा जगद्गुरु बसवलिंगरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.

नागणसूर येथील जगदगुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान तुप्पीन मठाचे कार्यसेवक विद्याधर गुरव यांनी ही माहिती दिली. दरवर्षी श्री जगद्गुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान, तुप्पीन मठ, नागणसूर यांच्या वतीने श्री गुरु बसवलिंगेश्वर यांच्या १४ व्या पुण्य स्मरणोत्सवानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार वितरण सोहळा दि.२३ ऑक्टोबर नागणसूर येथील जगद्गुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान, तुप्पीन मठ येथे होईल. त्यादिवशी सकाळी महारुद्राभिषेक, घटस्थापना, ध्वजारोहण, श्री जगद्गुरु बसवलिंग रत्न प्रशस्ती प्रदान, सामूहिक विवाह, धर्मसभा, श्री जगद्गुरु बसवलिंगेश्वर भक्तनिवास उद्घाटन समारंभ, २१ हजार सुवासिनींचा ओटी भरण्याचा कार्यक्रम व ११ हजार जंगमांचा जंगमार्पण सोहळा होणार आहे. भाविकांसाठी पुरणपोळी व तुपाचे महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

दि. २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्रींच्या भव्य फोटो व वचन साहित्याची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक नागणसूर गावातील प्रमुख रस्त्यावरून रांगोळीच्या







उद्घाटनाने निघणार आहे. यात श्री जगद्गुरु बसवलिंग शिवयोगी यांचे भव्यचित्र आणि धर्मध्वज असणार आहेत. कार्यक्रमास बसवलिंग महास्वामी ज्ञान योगाश्रम बिदर, म.नि.प्र.गुरुपादलिंग महास्वामी विरक्त मठ पुरवण बळकवाड, अभिनव पुंडलिक महाराज पुंडलिक नगर गोधन, म.नि.प्र.अभिनव शिवलिंग महास्वामी विरक्त मठ शेळगी, प्र.शंकर शिवाचार्य हिरेमठ नागणसूर, प्र.म.शि.अभिनव शांतलिंग शिवाचार्य पंचगंगा हिरेमठ आलमेल, प्र.म.शि. रुद्रपशुपती शिवाचार्य पुरवत हिरेमठ आमसिद्ध, प्र.म.शि.शेषुल शिवाचार्य हिरेमठ जेऊर, अभिनव रेणुशरण पठदेवक मेटगी, गुळवंता महाराज सिद्धेश्वर हाळसंगी, करनिसिद्ध महाराज करनिसिद्धमठ हेटा व मंगूर, शिवाभिराम महाराज बु.विष्णू मंदिर ट्रस्ट पंढरपूर, हलक्या स्वामी हिरेमठ शिवपूर नगर, अमोघ सिद्ध महाराज संजरबा, शिवयोगी स्वामी महाराज हाळचिंचोली, म.नि.प्र.राजशेखर महास्वामी विरक्त मठ मंद्रूप, म.नि.प्र.शिवानंद महास्वामी विरक्त मठ करजनी, म.नि.प्र. विश्वेश्वरलिंग महास्वामी विरक्त मठ कडोली, म.नि.प्र. शांतलिंग महास्वामी विरक्त मठ दुधनी, सोमलिंग महाराज अमोघसिद्धेश्वर शिव मठ हिरेकुडी, चनप्पा महास्वामी नागरे हिरेमठ तोरणगाव, म.नि.प्र. अभिनव शिवलिंग महास्वामी विरक्त मठ हिप्परगा, म.प्र.म. प्रशांत महास्वामी विरक्त मठ हत्ती करगतक, म.नि.प्र. बसवराजेश्वर महाराज विरक्त मठ राईबाग, संगमेश्वर महास्वामी मोघे हालसंगी नरेंद्र, परमपूज्य पांडुरंग महाराज पांडुरंग महाराज मठ जेऊर, विश्वनिल महाराज परमनाथ शाळा, संदेश महाराज आश्रम उपलावडी, रेवणसिद्ध महाराज ज्योत, काशिलिंग गुरू महाराज आदींचे दिव्य सान्निध्य लाभेल.

सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार प्रणिती शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, आमदार सरपंचगौडा बी.पाटील, आमदार एम. वाय.पाटील, अमोलराजे भोसले, श्रीकांत खानापूरे, अध्यक्ष जागृत हनुमान मंदिर ट्रस्ट, निवृत्त जिल्हाधिकारी मल्लीनाथ कलशेट्टी, विरय्या स्वामी हिरेमठ, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, सोमेश्वर जमशेट्टी, अशपाक बळोरगी कांतू धनशेट्टी, अक्कन बळग, रमेश बाके, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पोलीस उपनिरीक्षक राजशेखर निंबाळे, माजी नगराध्यक्ष महेश हिंडोळे, मल्लीनाथ पाटील, बसलिंगप्पा खेडगी, मलिक जान शेख, महिबुब मुल्ला, बसवराज करूटे उपस्थित राहणार आहेत.



जरांगे तू सुपारी घेऊन एकनाथ शिंदेंना बदनाम करायला निघालास का? यापुढे गाठ मराठा समाज आणि शिवसैनिकाशी आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री, एकनाथ शिंदेंना एकेरी बोलणार तू आहेस कोण? ही मराठा समाजाची संस्कृती आहे का?

-रामदास कदम, नेते, शिवसेना


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार २२ ऑक्टोबर २०२६






उद्धव ठाकरे साहेब, तुम्हाला स्वतःचा पक्ष आणि आमदार सांभाळता आले नाहीत आणि गप्पा मारताय सत्तांतराच्या. भांडुपमध्ये नगरसेवक निवडून आणायची धमक नसलेल्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवाभाऊंवर भाष्य करू नये.

- चित्रा वाघ, आमदार, भाजपा

# व्यापारी शहर तैझवर ताबा

## हुथींचा दणका; संघर्षात प्रचंड विध्वंस, २४ लोकांचा मृत्यू, शेकडो जखमी

**सना, २१ ऑक्टोबर**

सौदी अरब आणि येमेनी सरकारविरोधात आक्रमक झालेल्या हुथी बंडखोरांनी आगेकूच करत बुधवारी व्यापारी मार्गासाठी महत्त्वाचे असलेल्या तैझ शहरावर ताबा मिळवला. यावेळी झालेल्या संघर्षात मोठा विध्वंस झाला असून, २४ लोकांचा मृत्यू तर शेकडो जखमी आहे.



हुथी बंडखोर आणि येमेनी सरकारी सैन्य यांच्यातील भीषण संघर्षामुळे तैझच्या दाट लोकवस्तीच्या निवासी भागात प्रचंड विध्वंस झाला. हुथींच्या प्राणघातक हल्ल्यात २४ जण ठार आणि इतर शेकडो जखमी झाले. वाढत्या संघर्षाच्या पृष्ठभूमीवर शहराला सतत हल्ले आणि वेढा यांचा सामना करावा लागत असताना बुधवारी हूथीने शहरावर ताबा मिळवल्याची घोषणा केली. संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार प्रमुख वोल्कर तुर्क यांनी हुथीच्या वाढत्या हल्ल्यावर चिंता व्यक्त करताना म्हटले की, तैझवर मिळवलेला ताबा प्रादेशित अशांततेसाठी धोकादायक आहे. येण्या-जाण्याचे बहुतांश मार्ग बंद झाले आहेत आणि नागरिकांचे प्रचंड हाल सुरू आहे. नैऋत्य येमेनमधील या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहराच्या वेढ्यामुळे अनेक रहिवाशांना अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तूंपासून वंचित राहावे लागले आहे, तर किमती गगनाला भिडल्या आहेत.

**लष्करी छावणीतील शस्त्रास्त्रे पळविली**

येमेनी सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, हुथी बंडखोरांनी एका सरकारी लष्करी छावणीवर हल्ला केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी तैझवर हल्ला चढवला. त्यांनी लष्करी तळावरील शस्त्रास्त्र पळवले.

**लाल समुद्राच्या बहुतांश भागावर नियंत्रण**

दक्षिण येमेनचे एक मोक्याचे प्रवेशद्वार असलेले तैझ शहर, दशकभरापूर्वी गृहयुद्ध सुरू झाल्यापासून लढाईचे प्रमुख केंद्र बनले आहे. हे येमेनच्या सर्वात महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केंद्रांपैकी एक आहे. लाला समुद्रावरील सागरी व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेले मोखा हे बंदर शहर ताब्यात घेतल्यानंतर आपली आगेकूच सुरू केली होती.

**सौदीला ब्रिटनची मदत**

हुथीविरुद्ध संघर्षात ब्रिटनने आपली टायफून लढाऊ विमाने सौदीत पाठवण्याची घोषणा केली आहे. ही विमाने हुथी बंडखोरांच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांपासून सौदी शहरांचे आणि तेल ठिकाणांचे संरक्षण करतील. ब्रिटनच्या संरक्षण मंत्रालयाने यासंदर्भात निवेदन जारी केले. टायफून हे लढाऊ विमान शत्रूच्या विमानांना रोखणे, हवाई क्षेत्राचे संरक्षण करणे आणि गरज पडल्यास जमिनीवर हल्ला करणे यासाठी सक्षम आहे. याचा रडार दूरवरून इतर विमानांचा शोध घेण्यास मदत करतो. गरज पडल्यास हे त्यांचा पाठलाग करू शकते आणि हवेतून क्षेपणास्त्र डागून त्यांना लक्ष्य करू शकते. (वृत्तसंस्था)

### क्षेपणास्त्रांच्या मारा, अनेक लोक बेपत्ता

शबवाचे गव्हर्नर अवद इब्न अल-वझीर यांनी सांगितले की, इराण-समर्थित बंडखोरांनी शबवाच्या दक्षिणेकडील प्रांतातील अल-आलम प्रशिक्षण शिबिरावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ला केल्यानंतर काही लोक अजूनही बेपत्ता आहेत. दुसरीकडे हुथींनी बुधवारी पहाटे सौदीच्या अनेक भागात क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्लेही केले.







# बांगलादेशमध्ये सत्तापालटासाठी अमेरिकेकडून अब्जावधी खर्च

## शेख हसीना यांच्या मुलाचा खळबळजनक दावा

**वॉशिंग्टन, २१ ऑक्टोबर**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या सरकारच्या पतनामागे अमेरिकेचा हात होता, असा खळबळजनक आरोप हसीना यांचे पुत्र साजीब वाजेद जॉय यांनी केला आहे. यासाठी बायडेन प्रशासन आणि यूएसएआयडीने ५० दशलक्ष डॉलर्सचा निधी पुरवला, असा दावाही त्यांनी केला आहे.

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार ऑगस्ट २०२४ मध्ये व्यापक आंदोलनांनंतर पायउतार झाले. आता, त्यांचे पुत्र, साजीब यांनी आरोप केला आहे की, त्यांच्या आईचे सरकार पाडण्यात अमेरिकेने भूमिका बजावली. तत्कालीन जो बायडेन प्रशासनाने अमेरिकन एजन्सी यूएसएआयडी मार्फत ५० दशलक्ष डॉलर्स निधी पुरवला होता, असा दावा त्यांनी केला आहे. साजीब यांनी वॉशिंग्टनमध्ये 'सेंटर फॉर यूएस-बांगलादेश रिलेशन्स'ने आयोजित केलेल्या पत्रपरिषदेत हे आरोप केले. तत्कालीन बायडेन प्रशासनाने ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना यांना सत्तेवरून हटवण्यास कारणीभूत ठरणाऱ्या कारवायांना पाठिंबा दिला होता, असा त्यांचा आरोप आहे. साजीब यांच्या मते, यूएस एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट आणि लोकशाहीला प्रोत्साहन देणाऱ्या अनेक संस्थांनी आंदोलनांमध्ये सहभागी झालेल्या गटांना संघटित करण्यास मदत केली. तसेच त्यांनी नॅशनल डेमोक्रॅटिक इन्स्टिट्यूट आणि इंटरनॅशनल रिपब्लिकन इन्स्टिट्यूट या संस्थांनी आंदोलने आणि अशांततेत सामील झालेल्या गटांना संघटित आणि प्रशिक्षित करण्यास मदत केली. या कार्यक्रमात शेख हसीना यांच्या पक्षाचे आवामी लीगचे समर्थक आणि माजी अधिकाऱ्यांचा समावेश होता, असा दावाही त्यांनी केला. (वृत्तसंस्था)

### दबावाखालीच युनूस यांच्याकडे सोपवली सत्ता

साजीब यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे माजी प्रमुख मुहम्मद युनूस यांच्याबाबतही दावे केले आहेत. बांगलादेशच्या लष्करी नेतृत्वावर अमेरिकेने राजनैतिक दबाव आणल्यानंतर युनूस यांची अंतरिम प्रशासनाचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. ढाक्यातील अमेरिकन राजदूताने युनूस यांना अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून नियुक्त करण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकला होता, असा आरोपही त्यांनी केला आहे.

# १३,७०० नागरिक ठरले नक्षलवादाचे बळी

## देशाच्या सुरक्षेसाठी ३,६०० जवानांचे बलिदान : शहा

**नवी दिल्ली, २१ ऑक्टोबर**

अनेक दशकांपर्यंत नक्षलवादामुळे देशातील अनेक जिल्हे प्रभावित झाले. या हिंसाचारात १३,७०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला, तर ३,६०० जवानांनी देशाच्या सुरक्षेसाठी बलिदान दिले. या जवानांच्या बलिदानामुळे देश पाच दशकांपासून सुरू असलेल्या समस्येतून बाहेर पडू शकला, असे मत व्यक्त करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी राष्ट्रीय पोलिस स्मृती दिनानिमित्त नक्षलवादाविरुद्धच्या लढाईत प्राण गमावलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.



शहीद जवानांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शहा पुढे म्हणाले, १९८१ पासून नक्षलवादाने देशातील अनेक जिल्ह्यांना खोल जखमा दिल्या. सुरक्षा दलांना आणि सामान्य नागरिकांना याची किंमत चुकवावी लागली. सुरक्षा दलाच्या जवानांचा सर्वाधिक मृत्यू छत्तीसगडमध्ये झाला. स्वातंत्र्यानंतर पोलिस आणि सुरक्षा दलांनी देशाची अंतर्गत सुरक्षा राखण्यात आणि सीमांचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या बलिदानामुळेच भारताला आज जगात सन्मानाचे स्थान मिळाले आहे, असेही ते म्हणाले.

**अमली पदार्थांविरोधी रॅली देशभ्रमणासाठी रवाना**

राष्ट्रीय पोलिस स्मृती दिनानिमित्त शाह यांनी दिल्लीतील राष्ट्रीय पोलिस स्मारकातून देशव्यापी बाईक रॅलीला हिरवी झेंडी दाखवली. 'अमली पदार्थांविरोधातील लढा' या विषयावर आयोजित या रॅलीत नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील सुमारे ९० रायडर्स सहभागी झाले आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### दीपिका-रणवीरची 'देवी'

**मुंबई :** बॉलिवूड कपल दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंह यांनी दुसऱ्या मुलीच्या नावाची घोषणा केली आहे. दोघांनी समाज माध्यमावर एक संयुक्त पोस्ट शेअर करून मुलीचे नाव 'देवी पादुकोण सिंह' ठेवले असल्याचे सांगितले. पोस्टसोबत कुटुंबाचा एक फोटोही शेअर केला आहे, ज्यामध्ये रणवीर, दीपिका आणि त्यांच्या दोन्ही मुली दिसत आहेत. फोटो शेअर करताना प्रेम आणि आनंदाने भरलेली, देवी पादुकोण सिंह, असे लिहिले. दीपिका आणि रणवीर यांच्या दुसऱ्या मुलीचा जन्म याच वर्षी १९ सप्टेंबर रोजी झाला होता. इन्स्टाग्राम पोस्टमध्ये नवजात मुलीच्या पावलांचे ठसे शेअर केले होते. या जोडप्याने १९ एप्रिल रोजी दुसऱ्यांदा पालक होणार असल्याची घोषणा केली होती.



### 'पोलिस कंपनी' प्रदर्शनाची तारीख जाहीर





**मुंबई :** बॉलिवूडमधील अंडरवर्ल्ड आणि गुन्हेगारी जगतावर अनेक चित्रपट तयार करणारे दिग्दर्शक राम गोपाल वर्मा पुन्हा एकदा हाच विषय हाताळत आहेत. त्यांच्या आगामी क्राईम ड्रामा 'पोलिस कंपनी'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली आहे. या चित्रपटात अभिनेता हर्षवर्धन राणेसोबत फरदीन खान, फातिमा सना शेख आणि परेश रावल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाची कथा सत्य घटना आणि वास्तविक पात्रांवर आधारित आहे. या चित्रपटात सौरभ शुक्ला, मकरंद देशपांडे आणि अश्विनी काळसेकर हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट दोन भागांमध्ये तयार केला जात आहे. दोन्ही भागांचे चित्रीकरण एकाच वेळी करण्याची योजना आहे. निर्माते २०२७ मध्ये काही महिन्यांच्या अंतराने दोन्ही भाग प्रदर्शित करण्याच्या तयारीत आहेत. पहिला भाग ४ जून, २०२७ ला प्रदर्शित करण्यात येणार आहे.

### 'रामायण'मधील रावणाचा व्हिडीओ प्रदर्शित

**मुंबई :** 'रामायण' चित्रपटाच्या निर्मात्यांनी अभिनेता यशला रावणाच्या रूपात सादर केले. भगवान शिवावरील रावणाच्या भक्तीवर आधारित असलेल्या या व्हिडीओमध्ये, चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी त्याच्या पात्राच्या विविध छटा दाखवण्यात आल्या आहेत. नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटात अभिनेता यश रावणाची भूमिका साकारत आहे. चित्रपट निर्मात्यांनी त्याच्या पात्राची एक नवीन झलक दिली आहे. हिंदीमध्ये 'राईज ऑफ असुरा' असे शीर्षक असलेल्या या व्हिडीओमध्ये यश पूर्णपणे वेगळ्या अवतारात दिसत आहे. या गाण्याचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, गीत डॉ. कुमार विश्वास यांनी लिहिले आहे आणि विशाल दादलानी यांनी ते गायले आहे. 'रामायण' चित्रपटाचा पहिला भाग रावण राजा होण्यापूर्वीची त्याची भक्ती आणि शौर्य दर्शवतो. भगवान शिवाप्रती रावणाची भक्ती दाखवण्यासाठी तो शिव तांडव स्तोत्राच्या तालावर नृत्य करतो, असे व्हिडीओमध्ये दाखविले आहे.

# २३ पाकिस्तानी सैनिक ठार

## बलुचिस्तानातील प्रमुख महामार्गांवर नियंत्रण

**क्वेट्टा, २१ ऑक्टोबर**

बलुचिस्तान प्रांतात बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) पाकिस्तानी लष्कराला लक्ष्य करत तीन दिवसांत विविध भागात केलेल्या हल्ल्यात २३ सैनिक ठार झाले, तर ३२ पेक्षा अधिक जखमी आहे. हल्ल्यानंतर प्रमुख महामार्गांवर नियंत्रण मिळवण्यात यश आल्याचा दावा त्यांनी केल्याने पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या अडचणी वाढल्या आहे.



आर्थिक नाकेबंदीचा भाग म्हणून महामार्गांवर बीएलए लढवय्ये तपासणी करून वाहनधारकांकडून टोल वसुली करत आहे. या भागात ३४ कारवाया केल्या आणि १४ पाकिस्तानी सैनिक व लष्करी गुप्तचर विभागाच्या नऊ सदस्यांसह २३ सुरक्षा कर्मचाऱ्यांना ठार केल्याचा दावा बीएलएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. पाकिस्तानी सैन्यासोबत झालेल्या थेट चकमकीत बीएलएचे सहा सदस्यही ठार झाले. बीएलएने या हल्ल्यांचा संपूर्ण घटनाक्रमही प्रसिद्ध केला आहे. बीएलएच्या लढवय्यांनी तुरबतच्या नसीराबादमध्ये पाकिस्तानी सैन्य आणि आयएसआय गुप्तचर संस्थेच्या सदस्यांवर हल्ला केला. याशिवाय हरनाईच्या शहरग भागातील साजो जवळ पाकिस्तानी लष्कराच्या वाहनाला लक्ष्य करून आयईडी स्फोट घडवण्यात आला, यात तीन सैनिक ठार झाले आणि इतर चार गंभीर जखमी झाले. बीएलएने बुलेदा येथील जमदानमध्ये लष्करी ताफ्याला संरक्षण देणाऱ्या पाकिस्तानी सैनिकांवर हल्ला केला, यामध्ये एक सैनिक ठार झाला आणि दुसरा जखमी झाला. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेचे पाच चिनी कंपन्यांवर निर्बंध

## गुगलच्या माजी अभियंत्याशी संबंध

**वॉशिंग्टन, २१ ऑक्टोबर**

एआय-संबंधित व्यापारी गुपिते चोरल्याचा आरोप असलेल्या गुगलचे माजी अभियंता लिनवेई डिंग यांच्याशी संबंधित पाच चिनी कंपन्यांवर अमेरिकेने निर्बंध लादले आहेत. चीनने या कारवाईचा तीव्र निषेध केला असून प्रत्युत्तरात्मक कारवाई करण्याची धमकी दिली आहे. या प्रकरणात डिंग, झिक्सुआन टेक्नॉलॉजी आणि मिरॅकलप्लस यांच्यात संबंध असल्याचा आरोप आहे.

ट्रम्प प्रशासनाने लादलेल्या या निर्बंधांचा चीनने मंगळवारी तीव्र निषेध केला आहे. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले की, या निर्णयामुळे चिनी कंपन्यांच्या कायदेशीर हक्कांना आणि हितांना गंभीर हानी पोहोचली आहे. या कारवाईचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. चिनी कंपन्या याचा विरोध करतात, असे सांगत मंत्रालयाने अमेरिकेला आपली चूक सुधारण्याचे आवाहनही केले.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागानुसार, डिंग यांनी शांघाय झिक्सुआन टेक्नॉलॉजीची स्थापना केली. त्यांनी गूगलमधील आपल्या अनुभवाचा प्रचार केला आणि दावा केला की, त्यांची कंपनी या अमेरिकन टेक जायंटच्या सुपरइंटेलिजन्समागील मूलभूत तंत्रज्ञानाची प्रतिकृती तयार करू शकते. त्यामुळे झिक्सुआनशी संलग्न असलेल्या मिरॅकलप्लस या स्टार्टअप कॅपिटल प्रोग्रामवरही निर्बंध लादण्यात आले आहेत. मिरॅकलप्लसने झिसुआनमधील हिस्सेदारीच्या बदल्यात सुरुवातीची गुंतवणूक केली होती. निर्बंधांच्या अधीन असलेल्या इतर तीन चिनी कंपन्याही मिरॅकलप्लसशी संबंधित आहेत. झिक्सुआनने पाच जानेवारी २०२३ रोजी किंवा त्यानंतर अमेरिकन नागरिकांच्या व्यावसायिक गुपितांच्या मोठ्या प्रमाणावरील चोरीत जाणीवपूर्वक सहभाग घेतला किंवा त्यातून फायदा मिळवला, असा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

### आर्थिक हेरगिरीच्या आरोपांखाली ठरवले दोषी

माजी अभियंता डिंग यांच्यावर २०२४ मध्ये गूगलमधून एआय-संबंधित व्यावसायिक गुपिते चोरल्याचा आरोप होता. ते चीनमधील दोन कंपन्यांसाठी गुप्तपणे काम करत असल्याचाही आरोप आहे. जानेवारीमध्ये सॅन फ्रान्सिस्को येथील एका फेडरल ज्युरीने त्याला आर्थिक हेरगिरी आणि व्यापारी गुपिते चोरल्याच्या अनेक आरोपांखाली दोषी ठरवले होते.

# अवकाशातील उपग्रहांचा कचरा होणार स्वच्छ

## भारत आणि जपान आले एकत्र

**नवी दिल्ली, २१ ऑक्टोबर**

अवकाशातील जुन्या उपग्रहांच्या कचऱ्यामुळे निर्माण होणारा धोका कमी करण्यासाठी भारत आणि जपानमधील दोन कंपन्या एकत्र काम करणार आहेत. भारताची 'सॅमटेल एव्हियोनिक्स' आणि जपानची 'बुल कंपनी' यांनी या दिशेने आपली भागीदारी वाढवली आहे. दोन्ही कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी या योजनेवर गुरुग्राममध्ये चर्चा केली. सध्याचा अवकाशातील कचरा नष्ट करण्यासाठी आणि त्याचा पुढील संचय रोखण्यासाठी मदत करू शकणारे तंत्रज्ञान विकसित करणे, हा यामागील उद्देश आहे.



अनेक उपग्रह अवकाशात कार्यरत असून, ते हवामानाची माहिती देतात आणि दळणवळणासारख्या अत्यावश्यक सेवांना आधार देतात. तथापि, जेव्हा एखादा उपग्रह निकामी होतो, तेव्हा त्याचा मलबा अवकाशात शिल्लक राहतो. त्याचे तुकडे इतर उपग्रहांना धडकून नुकसान पोहोचवू शकतात. ही समस्या सोडविण्यासाठी, दोन कंपन्या त्यांचे तंत्रज्ञान एकत्र आणण्याच्या योजनेवर काम करत आहेत. 'सॅमटेल एव्हिओनिक्स' आणि 'बुल कंपनी' यांच्यातील करारावर सप्टेंबर २०२६ मध्ये बंगळूरु 'स्पेस एक्स्पो' दरम्यान स्वाक्षरी करण्यात आली. आता, या दोन कंपन्या त्यांचे तंत्रज्ञान एकत्रित करून तसेच त्यात सुधारणा करून काम करत आहेत. भविष्यात याचा उपयोग कसा करता येईल, याचाही ते शोध घेत आहेत.

अंतराळ सुरक्षित ठेवणे हे एका कंपनीसाठी सोपे नाही. त्यासाठी विविध कंपन्यांच्या एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता असते, असे 'सॅमटेल एव्हिओनिक्स'चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, पुनीत कौरा म्हणाले. बुलच्या तंत्रज्ञानाला 'पोस्ट-मिशन डिस्पोजल' म्हणतात. मोहीम पूर्ण झाल्यानंतर उपग्रह अवकाशात निरुपयोगी होण्यापासून रोखण्यास मदत करणे, हे याचे उद्दिष्ट आहे. यामुळे नवीन अवकाश कचऱ्याची निर्मिती संभाव्यतः कमी होऊ शकते. तथापि, हे तंत्रज्ञान अवकाशात आधीच असलेला कचरा काढू शकत नाही. त्यामुळे, याला सॅमटेलच्या 'डेब्रिस रिमूव्हल व्हेईकल' सोबत एकत्रित करण्याच्या योजनांवर विचार सुरू आहे.

**बुलची उपकरणे अंतराळात**

आधीच असलेल्या कचरा नष्टण्यासाठी कशी मदत करू शकतील, याचाही दोन्ही कंपन्या शोध घेत आहेत. ही योजना सध्या विकासाधीन आहे. (वृत्तसंस्था)

### कचरा योग्यरित्या हटवणे आवश्यक

अवकाश संपूर्ण जगासाठी महत्त्वाचे आहे. त्यांच्या कंपनीचे तंत्रज्ञान भविष्यात नवीन कचरा तयार होण्यापासून रोखण्यास मदत करू शकते, असे 'बुल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक यासुहितो उटो म्हणाले. तथापि, जुना कचरा हटवण्यासाठी इतर तंत्रज्ञानाचीही गरज आहे. अवकाशातील कचऱ्यामुळे कार्यरत उपग्रहांचे नुकसान होऊ शकते. तसेच, त्यामुळे हवामान, दळणवळण आणि इतर सेवांवर परिणाम होण्याचा धोका असतो. म्हणून, उपग्रहाचे काम पूर्ण झाल्यावर त्याला योग्यरित्या हटवणे आवश्यक आहे.

# मंदिर हल्ल्याचा द्वेषपूर्ण गुन्हा म्हणून चौकशी करा

## १०५ अमेरिकी खासदारांचे एफबीआयला पत्र

**वॉशिंग्टन, २१ ऑक्टोबर**

इलिनॉयमधील अरोरा येथील हिंदू मंदिरावरील गोळीबाराच्या प्रयत्नाची द्वेषपूर्ण गुन्हा म्हणून चौकशी करावी, अशी मागणी करणारे पत्र १०५ अमेरिकी खासदारांनी एफबीआयचे संचालक काश पटेल यांना पाठवले आहे. खासदारांनी भारतीय-अमेरिकन लोकांविरुद्धच्या ऑनलाइन द्वेष आणि धमक्यांबद्दलही चिंता व्यक्त केली आहे.

शिकागो जवळील अरोरा येथील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात एका १९ वर्षीय तरुणाने गोळीबार करण्याचा प्रयत्न केल्यानंतर, खासदार राजा कृष्णमूर्ती यांच्या नेतृत्वाखालील १०५ खासदारांनी हे पत्र लिहिले आहे. आरोपीची बंदूक अडकल्याने त्याला गोळीबार करता आला नाही आणि एक मोठी दुर्घटना टळली. त्याच्याकडे सापडलेल्या संदेशांमुळे वांशिक आणि धार्मिक रूढीवादी कल्पनांना समर्थन मिळण्याचा धोका वाढला आहे. याप्रकरणी कथित वांशिक द्वेष, धार्मिक स्थळे आणि सामूहिक हिंसाचाराची तयारी यांच्यातील परस्परसंबंधासाठी व्यापक संघीय कारवाईची आवश्यकता आहे. आतापर्यंत पकडलेल्या आरोपींच्या समाज माध्यम खात्यावर दक्षिण आशियाई लोकांविरुद्ध द्वेष पसरवणाऱ्या ५४२,००० हून अधिक पोस्ट्स आढळून आल्या. जानेवारी २०२४ ते जून २०२६ दरम्यान अशा पोस्ट्सच्या मासिक संख्येत जवळपास २४० टक्के वाढ झाली आहे. याप्रकरणी जातीय आणि धार्मिक पूर्वग्रहांच्या पैलूंची चौकशी केली जात आहे का, असा प्रश्न खासदारांनी एफबीआयला विचारला आहे. तसेच, ऑनलाइन फोरम किंवा इतर व्यक्तींनी या कथित हल्ल्याचे आयोजन करण्यास मदत केली का आणि धार्मिक स्थळांच्या संरक्षणासाठी कोणती पावले उचलली जात आहेत, हे देखील त्यांना जाणून घ्यायचे आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## अग्रलेख

# चित्त नित्य सावध ठेवा...

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे यंदाच्या विजयादशमी उत्सवातील उद्बोधन म्हणजे भारताच्या वर्तमानातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीचे मार्मिक विश्लेषण आहे तसेच ते समाजाला सध्याच्या स्थितीच्या अनुषंगाने केलेले दिग्दर्शनही आहे आणि त्यामुळेच ते फार महत्त्वाचे ठरते. सद्यस्थितीत आंदोलनांच्या माध्यमातून देशात निर्माण केली जात असलेली चिंताजनक परिस्थिती, लहान-सहान कारणांवरून पेटणारा असंतोष आणि त्यामागे असणाऱ्या अदृश्य ताकदींविषयी त्यांनी दिलेला इशारा काळानुरूप आणि गंभीर चिंतन करायला लावणारा आहे. संघाचे कार्य शुद्ध सात्त्विक प्रेम तसेच स्वयंसेवकांचे समर्पण, सेवा आणि परिश्रमावर आधारित आहे. तरीही काही अवांछित आणि अकल्पित घटनांचा संबंध जोडून संघाच्या हेतूवर प्रश्न उपस्थित करण्याचे प्रयत्न सातत्याने होत असतात. संघाचा अशा कोणत्याही घटकांशी संबंध नाही आणि संघ त्याचे समर्थनही करीत नाही, हे या उद्बोधनातून स्पष्टपणे सांगितले गेले. राजकीय स्वार्थाची पोळी शेकण्यासाठी जगातील सर्वात मोठ्या सांस्कृतिक संघटनेला बदनाम करण्याचे कारस्थान काही ठरावीक घटक सतत करीत आहे, हे खरे तर अवघा देश जाणतो. संघाला स्वतःसाठी काहीच नको आहे. सत्याच्या प्रतिष्ठापनेचे लक्ष्य पूर्ण होईपर्यंत स्वयंसेवक विश्वासाने व चिकाटीने कार्य करीत राहतील, असा विश्वास सरसंघचालकांनी व्यक्त केला. हा विश्वास सवंग प्रसिद्धीचे राजकारण करणाऱ्यांसाठी चपराक ठरावा.

सरसंघचालकांनी त्यांच्या भाषणात अत्यंत स्पष्टपणे काही इशारेही दिले आहेत. ते प्रामुख्याने दोन घटकांना आहेत. एक म्हणजे बाह्य आसुरी शक्ती, ज्या भारताला जगात शक्तिशाली व निर्णायक भूमिका बजावण्यापासून रोखू इच्छितात. कारण त्यामुळे काही देशांच्या मोठेपणाला धक्का बसू शकतो. दुसरे, देशांतर्गत असलेले संधिसाधू व विवेकहीन नेतृत्व, जे क्षुद्र स्वार्थासाठी आणि मतांच्या राजकारणासाठी बाह्य ताकदींचे हस्तक म्हणून कार्य करीत आहे. भारत देश फार विशाल आहे. एवढ्या मोठ्या देशात समस्या असणे, व्यवस्थेत त्रुटी असणे स्वाभाविकच. परंतु, अगदी लहान-सहान गोष्टींचे भांडवल करून समाजात असंतोष पसरवणे, मतभेद अधिक गहिरे करणे आणि लोकांच्या मनात आपण अन्यायग्रस्त असल्याची भावना निर्माण करण्याचे काम करणे हा काही राजकीय प्रवृत्तींचा स्वभाव झाला आहे, हे सरसंघचालकांनी सांगितले. समाजाला चिथावणी देणारे आणि स्वार्थासाठी झगडे लावू इच्छिणारे लोक अचानकपणे पुढे आले आहेत. त्यांना साथ देणाऱ्यांना राजकीय लाभ हवा आहे. त्यासाठी ते संपूर्ण समाजाचे आणि देशाचे नुकसान करण्यासही मागेपुढे पाहत नसल्याचे चित्र वारंवार पुढे येत आहे. अशा घटकांना सरसंघचालकांच्या उद्बोधनातून समज दिली गेली आहे. आजकाल आंदोलने समाधानाचा मार्ग न ठरता संघर्षाचे साधन बनत चालली आहेत. ज्या आंदोलनात आत्मीयता आणि राष्ट्रहिताची प्रेरणा नसते, ते आंदोलन विरोध, द्वेष आणि शत्रुभाव वाढवण्याचे काम करते. त्यामुळे समाजात अशांतता, अविश्वास आणि अराजकतेचे वातावरण निर्माण होते. आंदोलनाच्या नावाखाली संविधानाची, भाषेची आणि व्यवहाराची मर्यादाही ओलांडली जाते. हे देशाच्या अखंडतेसाठी घातक ठरू शकते. अशी आंदोलने समस्यांचे कायमस्वरूपी समाधान असूच शकत नाहीत; उलट परस्पर संवादातून समस्येवर तोडगा निघू शकतो, याकडेही सरसंघचालकांनी लक्ष वेधले. याच पृष्ठभूमीवर, संघ स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात आणि सामाजिक विकासात केलेल्या प्रत्यक्ष कार्याचे उदाहरण देऊन सरसंघचालकांनी हे स्पष्ट केले की, एकत्र येऊन केलेले समाजकार्य खऱ्या बदलाचा आणि समाधानाचा मार्ग आहे. त्यांनी आपल्या भाषणात आणखी एका महत्त्वाच्या मुद्याला स्पर्श केला. तो असा की, सद्यस्थितीत देश सावरण्यासाठी व सुरक्षित ठेवण्यासाठी मोठी तपस्या आणि समर्पण लागणार आहे. स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांच्या रूपात शत्रू स्पष्ट दिसत होता. आज शत्रू आतून आणि बाहेरूनही छुप्या पद्धतीने वैचारिक व सांस्कृतिक हल्ला करीत आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रदेशाच्या नावाने समाजाला तुकड्या-तुकड्यांत वाटण्याचे प्रयत्न केले जात आहेत. देशाच्या व्यवस्थेविषयी, संस्कृतीविषयी व इतिहासाविषयी नागरिकांच्या मनात भ्रम पसरवला जात आहे. १९४७ मध्ये तुष्टीकरणाचे राजकारण, राजकीय वर्चस्वाची लालसा आणि विभाजनवादी मानसिकतेमुळे देशाची फाळणी झाली. आपण किरकोळ मतभेदांवर भांडलो आणि अखंडता गमावली. या अदृश्य शत्रूंशी लढा देण्यासाठी आणि राष्ट्रीय भाव जागृत ठेवण्यासाठी स्वातंत्र्यलढ्यापेक्षाही अधिक सतर्कता, समर्पण आणि निरंतर तपस्येची गरज सरसंघचालकांच्या भाषणात अधोरेखित केली गेली, जी अत्यंत रास्त आहे.

तंत्रज्ञान आणि इंटरनेटमुळे वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीत मानवी समाजासमोर उभी ठाकलेली अनेक नव्या आव्हानांकडेही सरसंघचालकांनी लक्ष वेधले. वर्तमानात कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींकडून, शाळेतील पाठ्यक्रमांतून आणि एकूणच सामाजिक वातावरणातून मिळणारे मूल्याधारित संस्कार कमी होत चालले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्व प्रकारची माहिती आणि घटना समाजमाध्यमांद्वारे प्रत्येकापर्यंत अतिशय जलद आणि सहज पोहोचते. नवमाध्यमांमधून मिळणारी माहिती योग्य की अयोग्य हे न पडताळता ती नव्या पिढींकडून स्वीकारण्याचा धोका आहे. अशा अनिर्बंध माहितीच्या वापरामुळे होणाऱ्या घातक दुष्परिणामांचा अनुभव घेतल्यानंतर जगातील अनेक देशांनी अशा माध्यमांवर काही प्रतिबंध लावले आहेत. शासन-प्रशासनाने यावर गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे. विवेकहीन आचरणामुळे अमली पदार्थांच्या सवयी जडत आहेत. व्यसनाधीनता ही अत्यंत गंभीर राष्ट्रीय समस्या बनली असून तिच्या निर्दालनासाठी शासन-प्रशासन आणि समाजाने वेळेत व संघटित प्रयत्न करणे आवश्यक आहे. वर्तमान पालक पिढीला हा नवीन पिढीमध्ये सारासार विवेक रुजवावा लागेल. या समस्येच्या निराकरणासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन एक देशव्यापी कार्य उभे केले जाईल आणि त्यात स्वयंसेवकही सक्रिय भाग घेतील, अशी घोषणाही सरसंघचालकांनी यावेळी केली. या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी सामाजिक सतर्कता आणि देशाच्या अखंडतेची जपणूक करावी लागेल. उद्बोधनाच्या समारोपाकडे जाताना सरसंघचालकांनी कवी पी. सावळाराम यांनी लिहिलेल्या आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी स्वरबद्ध केलेल्या अत्यंत अर्थपूर्ण मराठी गीताच्या ओळींचा संदर्भ दिला...

**वाढवीत भेदभावा दुष्टतेचा फिरतो कावा**
**गाठूनिया भोळ्या जीवा अंधारात घालिल घावा**
**चित्त नित्य सावध ठेवा एक लक्षिय लावून डोळे...**

समाजात निर्माण होणारा भेदभाव आणि कट-कारस्थान आपोआप घडत नसून, त्यामागे दुष्ट ताकदींचा 'कावा' असतो. या शक्ती समाजातील निष्पाप, भाबड्या लोकांना आणि तरुणांना जाळ्यात ओढतात. त्यांच्या भावना भडकवतात आणि अज्ञानाच्या व असंतोषाच्या गर्तेत ढकलून देशाच्या मुळांवर आघात करतात. अशा विघातक प्रवृत्तींपासून देशाला वाचवायचे असेल, तर समाजाने आपले 'चित्त नित्य सावध' ठेवले पाहिजे. चिथावणी, बुद्धिभेदाला बळी न पडता, राष्ट्रहित हे एकच ध्येय समोर ठेवून आपला मार्ग चोखाळला पाहिजे. आत्मभाव, शिस्त, संवैधानिक मर्यादा आणि परस्परांमधील आत्मीयता हाच या संकटांवर उपाय आहे, असेच सरसंघचालकांना म्हणायचे आहे हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे. ■

## आंतरराष्ट्रीय

# आकाशातील सुरक्षेला राष्ट्रीयत्वाची कसोटी ?

**प्रा. जयसिंग यादव**

विमानप्रवास हा आधुनिक जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या वाहतूक व्यवस्थांपैकी एक आहे. हजारो फूट उंचीवर वेगाने प्रवास करणाऱ्या विमानात शेकडो प्रवाशांची सुरक्षितता काही मोजक्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या निर्णयक्षमतेवर अवलंबून असते. वैमानिकाचे मानसिक संतुलन, तांत्रिक कौशल्य, आपत्कालीन परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता आणि सहवैमानिकाशी असलेला समन्वय या बाबी विमानाच्या सुरक्षित उड्डाणासाठी अत्यावश्यक असतात. त्यामुळे विमानातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षाविषयक पात्रतेचा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे; मात्र एखाद्या कर्मचाऱ्याचे राष्ट्रीयत्व हेच त्याच्या विश्वासार्हतेचे प्रमाण मानणे योग्य ठरेल का, हा या घटनेच्या निमित्ताने उपस्थित झालेला मूलभूत प्रश्न आहे. 'फ्लायदुबई'च्या विमानातील कथित हल्ल्याच्या घटनेनंतर इस्त्रायलने काही देशांमधील वैमानिक आणि केबिन कर्मचाऱ्यांच्या इस्त्रायलला जाणाऱ्या उड्डाणांवरील नियुक्त्यांबाबत निर्बंध घातले आहेत. 'एअर फ्रान्स'सह काही विमान कंपन्याही अशा बाबींचे पालन करत आहेत. या निर्बंधांमध्ये ३१ देशांचा समावेश आहे; मात्र या यादीची व्याप्ती, निर्बंधांचे नेमके स्वरूप आणि त्यामागील अधिकृत सुरक्षा निकष यांची स्वतंत्रपणे खातरजमा होणे आवश्यक आहे. सुरक्षेच्या कारणास्तव विमान कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत विशेष खबरदारी घेणे समजू शकते; परंतु प्रशिक्षण, पृष्ठभूमी तपासणी आणि विशिष्ट धोक्याचे मूल्यमापन यांना प्राधान्य दिले पाहिजे.

३० सप्टेंबर २०२६ रोजी दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या 'फ्लायदुबई'च्या विमानात ओमानी सहवैमानिक हमाम अल हम्मामी याने भारतीय वैमानिक स्मित मछार यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर विमानाची उंची झपाट्याने कमी झाली, मात्र वैमानिक स्मित मछार यांनी प्रसंगावधान राखून प्रवाशांचे प्राण वाचवले. विमानात १७० प्रवासी होते. विमान सुरक्षेच्या दृष्टीने हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. विमानाच्या कॉकपिटमध्येच सहवैमानिकाने वैमानिकावर हल्ला करणे ही केवळ वैयक्तिक हिंसाचाराची घटना ठरत नाही. त्यातून विमानातील सर्व प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. उड्डाणादरम्यान विमानाचे नियंत्रण सुटण्याची शक्यता, आपत्कालीन परिस्थितीत निर्णय घेण्यातील अडथळे आणि इतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण होणारी घबराट यांचे परिणाम अत्यंत गंभीर असू शकतात; मात्र अशा प्रकरणात आरोप आणि सिद्ध झालेले तथ्य यांमध्ये फरक करणे महत्त्वाचे आहे. संबंधित सहवैमानिकाचा हेतू विमान कोसळवण्याचा होता, असा दावा केला जात असेल, तर त्यासाठी तपासातील पुरावे, अधिकृत निवेदने आणि संबंधित यंत्रणांचे निष्कर्ष आवश्यक आहेत. विमानातील कथित हल्ल्याचे कारण काय होते, सुरक्षाव्यवस्थेत काही त्रुटी होत्या का आणि संबंधित व्यक्तीला उड्डाणासाठी परवानगी कशी मिळाली, या प्रश्नांची उत्तरे तपासातूनच मिळू शकतील.

या घटनेतील भारतीय वैमानिकाने प्रसंगावधान राखले असल्यास त्यांचे कौशल्य आणि धैर्य निश्चितच महत्त्वाचे आहे; मात्र एखाद्या व्यक्तीच्या धैर्यावर व्यवस्था अवलंबून राहणे पुरेसे नाही. अशा घटना घडूच नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक सुरक्षा उपाय अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. या पृष्ठभूमीवर इस्त्रायलने कथितरीत्या घातलेल्या निर्बंधांमध्ये अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण, इराक, बांगलादेश, मलेशिया, इंडोनेशिया, कतार, सौदी अरेबिया आणि अन्य देशांचा समावेश आहे. यामागे सुरक्षा परिस्थिती, गुप्तचर माहिती किंवा विशिष्ट धोक्यांचे मूल्यमापन असू शकते. प्रत्येक देशाची सुरक्षा यंत्रणा आपल्या नागरिकांचे आणि देशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यासाठी निर्णय घेते. इस्त्रायलसारख्या संघर्षग्रस्त परिस्थितीचा सामना करणाऱ्या देशासाठी विमानतळ आणि हवाई वाहतूक यांचे संरक्षण हा संवेदनशील विषय असणे स्वाभाविक आहे. तथापि, सुरक्षेच्या उपाययोजना ठोस धोक्यांवर आधारित असाव्यात, ही अपेक्षाही तितकीच महत्त्वाची आहे. एखाद्या देशाचा नागरिक असणे आणि त्या व्यक्तीकडून सुरक्षेबाबत धोका निर्माण होणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. राष्ट्रीयत्वाच्या आधारे सर्व व्यक्तींना एकाच गटात टाकल्यास निर्दोष कर्मचाऱ्यांनाही किंमत मोजावी लागू शकते. संबंधित व्यक्तीने आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केले असेल, तिची पृष्ठभूमी तपासण्यात आली असेल आणि ती आंतरराष्ट्रीय सुरक्षा नियमांचे पालन करत असेल, तर केवळ ठरावीक जन्मस्थानामुळे कामापासून दूर ठेवण्याचा निर्णय न्याय्यतेच्या कसोटीवर तपासला गेला पाहिजे. विमानातील कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक सुरक्षिततेचा प्रश्नही या घटनेच्या निमित्ताने चर्चेत आला पाहिजे. वैमानिक आणि सहवैमानिक यांची निवड करताना तांत्रिक कौशल्याबरोबरच पृष्ठभूमीची पडताळणी, आवश्यक वैद्यकीय तपासण्या, प्रशिक्षण आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रक्रियांचे पालन यांना महत्त्व दिले जाते, तरीही एखाद्या कर्मचाऱ्याच्या वर्तनातून अचानक धोका निर्माण होण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. त्यामुळे विमान कंपन्यांनी संभाव्य धोक्यांची ओळख पटवण्यासाठी नियमित मूल्यांकन करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांना संशयास्पद वर्तनाची माहिती सुरक्षितपणे देण्याची सुविधा, आपत्कालीन परिस्थितीतील प्रशिक्षण, कॉकपिटमधील सुरक्षेचे नियम आणि हल्ल्याच्या प्रसंगी करावयाच्या उपाययोजना यांचे पुनरावलोकन केले पाहिजे. सुरक्षा प्रक्रियांमध्ये मानवी घटकांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. थकवा, कामाचा ताण, संवादातील अडथळे आणि मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांकडे वेळेत लक्ष देणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना आणि राष्ट्रीय विमानपतन नियामकांनीही अशा घटनांमधून धडे घेत सुरक्षा मानकांचा आढावा घेणे गरजेचे आहे. कोणत्याही गंभीर घटनेची निष्पक्ष चौकशी करून मिळालेले धडे संबंधित विमान कंपन्यांपर्यंत पोहोचवले पाहिजेत. जागतिक विमान वाहतूक ही विविध देशांमधील लोक, कंपन्या आणि संस्थांना जोडणारी व्यवस्था आहे. वैमानिक एका देशाचा, विमान कंपनी दुसऱ्या देशाची आणि प्रवासी अनेक देशांतील असू शकतात. या व्यवस्थेचे यश परस्परविश्वास, समान नियम आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर अवलंबून असते. 'फ्लायदुबई'च्या घटनेने विमान सुरक्षेच्या व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले असले तरी या घटनेतून घेतला जाणारा धडा केवळ काही देशांमधील कर्मचाऱ्यांवर निर्बंध घालण्यापुरता मर्यादित राहू नये. संभाव्य धोक्यांची वेळेत ओळख, कठोर पडताळणी, कॉकपिटमधील सुरक्षितता, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि आंतरराष्ट्रीय समन्वय यांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# बदलत्या नात्यांची गोष्ट

मुलं मोठी झाली, जग बदललं; पण आई-वडिलांच्या वाट्याला आलेला एकटेपणा कोण समजून घेणार? एकेकाळी घर म्हणजे केवळ चार भिंतींची वास्तू नव्हती, तर माणसांनी भरलेले एक जिवंत जग होते. अंगणात आजी-आजोबांच्या गोष्टी रंगायच्या, आईच्या आवाजाने घर जागे व्हायचे आणि वडिलांच्या उपस्थितीने घराला आधार मिळायचा. घरात कितीही अडचणी असल्या, तरी एकमेकांच्या सहवासात दुःख हलके व्हायचे. आज काळ बदलला आहे. घरे मोठी झाली, सोयी वाढल्या, हातात मोबाईल आले; पण माणसांमधील संवाद मात्र कुठेतरी कमी होत चालला आहे. विशेषतः वृद्ध आई-वडील आणि त्यांच्यापासून दूर गेलेली मुले, यांच्यातील भावनिक अंतर हा आजच्या समाजासमोरील गंभीर प्रश्न बनत आहे.

ग्रामीण भागातील अनेक तरुण-तरुणी शिक्षण, नोकरी आणि चांगल्या भविष्याच्या शोधात पुणे, मुंबई, नागपूर, हैदराबाद, बंगळुरू यांसारख्या महानगरांकडे धाव घेत आहेत. ही धाव चुकीची नाही. गावात संधी मर्यादित असताना मुलांनी मोठी स्वप्ने पाहावीत, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारावी, ही प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते. मुलांच्या प्रगतीसाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट केलेले असतात. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा जमवलेला असतो. मुलं मोठी होतात. गाव सोडून शहरात जातात. नोकरी, व्यवसाय, संसार, मुलांचे शिक्षण आणि वाढत्या जबाबदाऱ्यांमध्ये त्यांचे आयुष्य गुंतत जाते. सुरुवातीला रोज होणारा फोन आठवड्यातून काही वेळा होतो आणि नंतर कधी कधी तोही केवळ औपचारिकतेपुरता उरतो. सणासुदीला गावाकडे येणे, आई-वडिलांची विचारपूस करणे आणि एखादी आर्थिक मदत पाठवणे म्हणजे आपली जबाबदारी पूर्ण झाली, अशी समजूत नकळत निर्माण होते. पण आई-वडिलांना केवळ पैशांची गरज असते का? त्यांच्या मनाला आधार देणारे दोन शब्द, आपुलकीने विचारलेली तब्येतीची चौकशी आणि समोर बसून केलेल्या गप्पा यांची किंमत कोण मोजणार?

वृद्धापकाळात माणसाच्या गरजा फार मोठ्या नसतात. शरीर थकतं, आजारपण वाढतं आणि मित्रपरिवार हळूहळू कमी होत जातो. अशा वेळी घरात मुलांची चाहूल असावी, नातवंडांचा आवाज ऐकू यावा आणि आपल्या अनुभवाला घरात महत्त्व मिळावे, एवढीच अपेक्षा असते. मुलगा किंवा मुलगी दूर शहरात असल्यामुळे आई-वडिलांना प्रत्येक वेळी आपली अडचण सांगावीशी वाटत नाही. आपल्यामुळे मुलांच्या कामात व्यत्यय येईल, त्यांना काळजी वाटेल, या विचाराने ते अनेक गोष्टी मनातच ठेवतात. फोनवर 'आम्ही ठीक आहोत, तुम्ही काळजी करू नका,' असं सांगणाऱ्या आई-वडिलांच्या मनात किती एकटेपणा दडलेला असतो, याचा विचार आपण किती वेळा करतो? आजची तरुण पिढीही अनेक अडचणींचा सामना करत आहे. महानगरांतील महागाई, कामाचा ताण, घरभाडे, मुलांचे शिक्षण आणि स्पर्धेच्या जगात टिकून राहण्याची धडपड यामुळे प्रत्येकाला पुरेसा वेळ मिळतोच असे नाही. त्यामुळे मुलांनी आई-वडिलांकडे दुर्लक्ष केले, असा सरसकट आरोप करणे योग्य ठरणार नाही. मात्र, व्यस्त असणे आणि नात्यांपासून दूर जाणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. दिवसातील काही मिनिटे मनापासून बोलण्यासाठी काढणे अशक्य नाही. प्रश्न वेळेचा कमी आणि प्राधान्यांचा अधिक आहे. दुसरीकडे, ग्रामीण भागात अनेक वृद्ध आई-वडील अजूनही आपल्या जुन्या घरात राहतात. त्यांना शहरात आणले, तरी तिथल्या बंदिस्त घरात, अपरिचित वातावरणात आणि मुलांच्या व्यस्त दिनक्रमात त्यांना आपलेपणा मिळेलच असे नाही. म्हणूनच प्रत्येक कुटुंबाने ज्येष्ठांच्या इच्छेचा, सवयींचा आणि स्वाभिमानाचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यांना सोबत ठेवणे महत्त्वाचे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांना आपण कुटुंबाचा अविभाज्य भाग आहोत, ही जाणीव देणे. मुलांनी आकाशाला गवसणी घालावी, मोठ्या शहरांत नाव कमवावे आणि प्रगती करावी. पण त्या उंच भरारीत आपल्या घरट्याची आठवण हरवू नये. कारण पैसा पुन्हा कमावता येतो, हरवलेल्या संधी पुन्हा मिळू शकतात; मात्र आई-वडिलांसोबत घालवण्यासाठी निघून गेलेला काळ परत आणता येत नाही. त्यांच्या आयुष्याच्या संध्याकाळी त्यांना महागड्या भेटवस्तूंपेक्षा आपला सहवास अधिक मोलाचा वाटतो. घर मोठे असण्यापेक्षा त्यात माणसांसाठी जागा असणे महत्त्वाचे आहे. प्रगतीच्या शर्यतीत आपण जग जिंकू; पण ज्या आई-वडिलांनी आपल्यासाठी आपले जग उभे केले, त्यांची मने हरवली, तर त्या विजयाला अर्थ उरणार नाही. ■

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# दिल्लीतील आंदोलनांचा इतिहास

**श्यामकांत जहागीरदार**

राजधानी दिल्लीतील जंतरमंतर मैदानाला आंदोलनास्थळाच्या अधिकृत यादीतून ११ ऑक्टोबर २०२६ ला वगळण्यात आले आहे. ३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९३ मध्ये दिल्ली पोलिसांनीच सर्वप्रथम जंतरमंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली होती. कालांतराने जंतरमंतरला आंदोलनस्थळाचा अधिकृत दर्जा मिळाला होता. देशातील अनेक आंदोलनांचा जंतरमंतर साक्षीदार राहिले, देशातील गाजलेली अनेक आंदोलने याच ठिकाणाहून सुरू झाली, येथे सुरू झालेल्या आंदोलनाने अनेक सरकारेही गडगडली. जून महिन्यात कॉक्रोच जनता पार्टीचे पहिले आंदोलन या मैदानावर झाले होते. दुसरे आंदोलनही जंतरमंतरवर करण्याचा इशारा सीजेपीने दिला होता, पण त्याला पोलिसांनी परवानगी नाकारली. 'परिंदा भी पर नहीं मार सकता' अशी अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था या परिसरात करण्यात आली. त्यामुळे जंतरमंतरवर कोणी घुसू शकले नाही. दुसऱ्याच दिवशी जंतरमंतरवर भविष्यात कोणालाच आंदोलन करता येणार नाही, अशी व्यवस्था केली गेली. दिल्लीत आंदोलनासाठी जी अधिकृत स्थाने होती, त्यातून जंतरमंतरला कायमस्वरूपी वगळण्यात आले. जंतरमंतरच्या ऐवजी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि सीबीडी मैदान शहादराला परवानगी देण्यात आली. ही तिन्ही मैदान मध्य दिल्लीपासून बरीच दूर आहेत. रामलीला मैदान संसद भवनापासून ४ किमीवर, सीबीडी मैदान शहादरा १२ किमी तर बुराडी मैदान १५ किमी आहे. जंतरमंतरपासून हाकेच्या अंतरावर संसद भवन, राष्ट्रपती भवन आणि केंद्र सरकारची विविध मंत्रालये आहेत.

मुळात जंतरमंतर हे काही मैदान नाही तर रस्त्यांचा चिंचोळका भाग आहे. महाराजा सवाई जयसिंह यांनी १७२४ मध्ये जंतरमंतर बांधले होते. त्या काळात घड्याळे नव्हती, त्यामुळे काळवेळ आणि ग्रह स्थिती समजावी म्हणून जंतरमंतर बांधण्यात आले. मथुरा, उज्जैन, जयपूर आणि वाराणसी या अन्य चार शहरातही सवाई जयसिंह यांनी जंतरमंतर उभारले होते. काळाच्या ओघात मथुरेतील जंतरमंतर नष्ट झाले. उज्जैन, जयपूर आणि वाराणसी येथे जंतरमंतर आहे, पण दिल्लीतील जंतरमंतर जेवढे प्रसिद्ध झाले, तेवढे या अन्य शहरातील झाले नाही. ३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९३ मध्ये तत्कालीन सरकारने जंतरमंतरवर आंदोलनाची परवानगी दिली. तोपर्यंत बोट क्लबवर आंदोलने होत होती.



१९८८ मध्ये बोट क्लबवर महेंद्रसिंह टिकैत यांनी आंदोलन केले. टिकैत यांच्या नेतृत्वात ५ लाखांवर शेतकऱ्यांनी इंडिया गेट आणि विजय चौक यांच्या मध्ये असलेल्या बोट क्लबवर ठिय्या मांडला होता. बोट क्लबचा परिसर राष्ट्रपती भवन, संसद भवन तसेच नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉकला लागून आहे, त्यामुळे या अति महत्त्वाच्या स्थळांच्या सुरक्षेसोबत कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. हे आंदोलन संपल्यानंतर सरकारने बोट क्लबवर यापुढे कोणतेही आंदोलन होणार नाही, असा निर्णय घेताना जंतरमंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली.

२०११ मध्ये अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची सुरुवात राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवरूनच झाली. पहिले पाच दिवस हे आंदोलन येथून सुरू होते. नंतर गर्दी वाढू लागल्यामुळे ते रामलीला मैदानावर हलवण्यात आले. देशात गाजलेले निर्भया आंदोलनही डिसेंबर २०१२ मध्ये जंतरमंतरवर झाले होते. हे आंदोलनही खूप दिवस चालले. तेव्हाच्या संपुआ सरकारच्या पतनाचा पाया या आंदोलनाने घातला होता. वन रँक वन पेन्शनसाठी माजी सैनिकांचे आंदोलन जून २०२५ मध्ये याच मैदानावर झाले. मार्च-एप्रिल २०१७ मध्ये तामिळनाडूतील शेतकऱ्यांनी आपल्या आंदोलनासाठी हेच मैदान निवडले होते. १९ डिसेंबर २०१९ ला सीएएविरोधातील आंदोलनही जंतरमंतरवर झाले. महिला पहेलवानांचे दोन टप्प्यातील आंदोलनही २०२३ मध्ये जानेवारी आणि एप्रिल या काळात जंतरमंतरवर झाले होते. जंतरमंतरवर झालेले शेवटचे आंदोलन कॉक्रोच जनता पार्टीचे नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या विरोधात होते. सव्वा महिना चाललेले हे आंदोलन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर थांबले. आतापर्यंत जंतरमंतरवर होणाऱ्या आंदोलनाला कोणत्याच सरकारने आडकाठी केली नाही; अगदी मोदी सरकारनेही आपल्याविरुद्ध होणारी सर्व आंदोलने जंतरमंतरवर होऊ दिली. मग कॉक्रोच जनता पार्टीच्या जंतरमंतरवर होणाऱ्या दुसऱ्या आंदोलनाला परवानगी का नाकारली तसेच आंदोलनस्थळांच्या अधिकृत यादीतून ते का वगळले, असा प्रश्न कोणालाही पडणे स्वाभाविक आहे आणि याचे उत्तर कॉक्रोच जनता पार्टीच्या पहिल्या आंदोलनाला लागलेले हिंसक वळण हे आहे. आतापर्यंत जंतरमंतरवर झालेली सर्व आंदोलने ही शांततापूर्ण होती, या आंदोलनांनी कधीच मर्यादाभंग केला नव्हता. पण १९ जुलैला आंदोलक कॉक्रोच आणि काही समाजकंटकांनी थेट संसद भवनाच्या प्रवेशद्वारापर्यंत धडक दिली होती. सुदैवाने हे आंदोलक संसद भवनात घुसू शकले नाही, अन्यथा काय दुरवस्था प्रसंग ओढवला असता, याची कल्पनाही करवत नाही. यापासून धडा घेत दिल्ली पोलिसांनी यापुढे जंतरमंतरवर कोणतेही आंदोलन होऊ देणार नाही, असा पवित्रा घेतला.

दिल्ली पोलिसांनी आंदोलनाचा कोणाचाच कोणताही अधिकार दडपला नाही तर मोठ्या मैदानात आणि मोकळ्या जागेत आंदोलने करण्याची व्यवस्था केली आहे. आतापर्यंत जंतरमंतरवर आंदोलन करण्यासाठी राजकीय पक्षांना आणि सामाजिक संघटनांना पैसे लागत नव्हते. फक्त पोलिसांची परवानगी घेतली की आंदोलन करता येत होते. रामलीला मैदानावर आता एक दिवस आंदोलन करण्यासाठी सव्वा लाख रुपये खर्च येणार आहे. सीबीडी मैदान शहादरा येथे आंदोलन करण्यासाठी दररोज एक लाखापेक्षा जास्त रुपये आंदोलनकांना भरावे लागणार आहे. बुराडी मैदानावर आंदोलन करणे तर सर्वांत महागात पडणार आहे. या मैदानावरील आंदोलनाचा खर्च दीड ते दोन लाख रुपये प्रतिदिवस राहणार आहे. बुराडीचे मैदान या तीन मैदानात सर्वात मोठे मैदान आहे. पाच-दहा हजार आंदोलक या मैदानाच्या एका कोपऱ्यातच सामावून जातील.

रामलीला मैदान आंदोलनासाठी मिळणे हे अतिशय कठीण आहे. कारण या मैदानात वर्षभर वेगवेगळे कार्यक्रम, प्रदर्शन, रामलीला यांचे आयोजन केले जात असते, त्यामुळे हे मैदान वर्षभर बुक असते. रामलीला मैदानावर काँग्रेस आणि इंडिया आघाडीची पहिली रॅली १ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यासाठी काँग्रेसला परवानगी मिळालीही आहे. जंतरमंतरवर होणाऱ्या आंदोलनाचा प्रभाव आणि परिणाम चांगला राहत होता, रामलीलावगळता अन्य दोन मैदानावर होणाऱ्या आंदोलनाला फारसा प्रतिसाद मिळू शकेल, असे वाटत नाही. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### महागाईने मोडले सामान्य नागरिकांचे कंबरडे !

'कमाई अठन्नी आणि खर्च रुपया' ही जुनी म्हण आजच्या काळात अगदी तंतोतंत लागू पडताना दिसत आहे. माणूस सकाळपासून संध्याकाळपर्यंत काबाडकष्ट करतो, घाम गाळतो, प्रामाणिकपणे पैसे कमावतो; परंतु महिनाअखेरीस त्याच्या हातात काहीच शिल्लक राहत नाही. उलट पुढचा महिना कसा काढायचा, हा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहतो. एकेकाळी शंभर रुपयांत भरून येणारी किराणा सामानाची पिशवी आज हजार रुपये खर्च करूनही पूर्ण भरत नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. महागाईने अक्षरशः सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे.

महागाई हा शब्द ऐकायला साधा वाटत असला तरी त्याचे परिणाम अत्यंत गंभीर आहेत. कारण महागाई केवळ वस्तूंच्या किमती वाढवत नाही, तर ती माणसाच्या जगण्यातील आनंद, समाधान आणि सुरक्षिततेची भावनाही हिरावून घेते. वाढत्या महागाईमुळे सामान्य नागरिकांच्या गरजा कमी होत नाहीत; मात्र त्या पूर्ण करण्याची त्यांची आर्थिक क्षमता दिवसेंदिवस कमी होत जाते. परिणामी अनेक कुटुंबांना आपल्या इच्छा, आकांक्षा आणि स्वप्नांना मुरड घालावी लागते. आज बाजारात गेल्यानंतर सर्वसामान्य माणसाची अवस्था पाहण्यासारखी असते. भाजीपाला, डाळी, खाद्यतेल, तांदूळ, गहू, दूध, साखर आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती पाहून त्याच्या कपाळावर आठ्या पडतात. पूर्वी किलोभर खरेदी करणारा ग्राहक आता अर्धा किलो किंवा पाव किलो खरेदी करून समाधान मानतो. दुकानदाराकडे वस्तूंची चौकशी करताना त्याचा पहिला प्रश्न असतो, 'भाव किती आहे?' आणि किंमत ऐकल्यानंतर तो विचार करतो, 'हे घ्यावे की नको?' ही परिस्थिती केवळ एखाद्या कुटुंबाची नसून असंख्य मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांची आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सामान्य नागरिकांना केवळ आश्वासनांचा आधार नको, तर प्रत्यक्ष दिलासा हवा आहे. त्यांच्या कष्टाला सन्मान, उत्पन्नाला स्थैर्य आणि जगण्याला सुरक्षितता मिळाली पाहिजे. कारण देशाचा खरा आधार हा कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिकच आहे. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले तरच देशाची प्रगती खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

**नासा येवतीकर**/९४२३६२५७६९

■■■

### संवैधानिक जबाबदाऱ्यांचे काय ?

आजकाल संविधानाचे पुस्तक दाखवत शांततापूर्ण निदर्शने करण्याचा नागरिकांना कसा अधिकार आहे, हे सांगण्याची फॅशन निर्माण झालेली आहे. पण हे अधिकार अनिर्बंध नाहीत. नागरिकांच्या काही जबाबदाऱ्या देखील असतात हे कोणीच सांगत नाही. या पृष्ठभूमीवर काही मुद्दे मनात येतात :

१. शांततापूर्ण निदर्शने म्हणजे काय? अर्वाच्य भाषा वापरणे, विकृत हावभाव करणे, शिवीगाळ करणे, पोलिसांवर हल्ला करणे, जबरदस्तीने कार्यालयात घुसणे, देशविरोधी घोषणा करणे, तोडफोड करणे, जाळपोळ करणे... या सर्व गोष्टी शांततापूर्ण निदर्शनात समाविष्ट असतात काय?

२. निदर्शने करण्यासाठी परवानगी नसलेल्या ठिकाणी उग्र निदर्शने करून वाहतूक अडवून ठेवणे, तिथल्या कार्यालयांचे, व्यापाऱ्यांचे कामकाज बंद पाडणे, हे पण संवैधानिक अधिकार आहेत का?

३. निदर्शने करताना जेव्हा सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचे जाणीवपूर्वक नुकसान कले जाते, तेव्हा निदर्शकांच्या नेत्यांवर काय उत्तरदायित्व असते? हे नुकसान कोणी भरून द्यायचे?

४. जेव्हा निदर्शकांद्वारे तोडफोड वगैरे होते तेव्हा त्यांचे नेते हे सांगून नामानिराळे होतात की ते लोक आमच्यापैकी नव्हतेच. ते आमची बदनामी करण्यासाठी बाहेरून घुसलेले गुंड होते. आणि त्याचवेळेस हे नेते मागणी करतात की या तोडफोड करणाऱ्यांसकट कुणावरही कायदेशीर कारवाई केली जाऊ नये. ही दुटप्पीपणाची मागणी कशी काय मान्य होऊ शकते?

५. आजकाल बांगलादेश, नेपाळ, व युरोपातील अराजकाचे दाखले देत भारतातही तसाच उत्पात घडवण्यासाठी खुलेआम चिथावणीखोर वक्तव्ये केली जात आहेत. हे करणारे राजकीय पुढारी व वकील 'संविधान, संविधान' करत असतात. त्या संविधानात कुठले असे कलम आहे, जे त्यांना असे अराजक पसरवण्याचा अधिकार देते?

सनदशीर मार्गाने त्यांना जो लढा द्यायचा आहे तो त्यांनी जरूर द्यावा. पण 'हम करे सो कायदा' हे जे धोरण त्यांनी अवलंबिले आहे त्याचा बीमोड होणे अतिशय आवश्यक झालेले आहे. ही समज त्यांना कोण देणार? माननीय न्यायाधीशांमार्फतच ही समज दिली गेली तर कदाचित नागरिकांना व नेत्यांना ही जाणीव होईल की संविधान आपल्याला काही अधिकार देते तसेच जबाबदाऱ्यापण देते. बेकायदेशीर वर्तणूक करणारे लोक उजळ माथ्याने फिरत असतात, त्यांना शिक्षा होताना दिसत नाही. हे लवकर बदलले पाहिजे. ■

**रवींद्र पंडित**/नागपूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**मंगळवेढा दि. २१ ऑक्टोबर -** मंगळवेढा शहरातील एका १६ वर्षीय तरुण मुलाने अज्ञात कारणावरुन घराच्या वाशाला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.खबर देणारे सचिन साळुंखे (रा.बुरुड गल्ली) यांच्या मामाचा लहान मुलगा सुमित पवार (वय १६) हा इयत्ता ५ वीतून शाळा सोडून तो सध्या घरीच राहण्यास होता. तो काहीही कामधंदा करत नव्हता. दि.२० ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजता सुमितने घराचा दरवाजा बंद करुन पत्र्याच्या लाकडी वाशाला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. याबाबतची माहिती मिळताच कुटूंबियाने घराचा दरवाजा व कडी कोयंडा उचकटून आता जावून डब्यावर चढून गळफा घेतलेली दोरी कापून त्यास खाली घेतले. तो बेशुध्द अवस्थेत असल्याने त्याला ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, मात्र तेथील डॉक्टरांनी तपासून तो उपचारापुर्वीच मयत झाला असल्याचे सांगितले.

## जावयाचा खून; तिघांवर गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि. २१ ऑक्टोबर-** मेहुणीशी दुसरे लग्न केल्याच्या रागातून सासऱ्यासह तिघांनी जावयास तलवार आणि दगडाने मारुन खून केल्याची घटना बुधवार सकाळी ०९:३० वाजता खडकी येथे घडली. तिघांविरूध्द खूनाचा गून्हा दाखल झाला आहे. फिर्यादी मशीखान गडहिरे (वय ३५, रा. सांगोला) यांचा भाऊ मयत किसन गडहिरे (वय ३५, रा. आलेगाव, ता. सांगोला) याने त्याची पत्नी हयात असताना तिच्याच बहिणीला पळवून नेऊन तिच्याशी दुसरे लग्न केले होते. याचाच राग मनात धरून आरोपी अतुल धोंडीबा कसबे (वय ४८), सुशील कसबे (वय ३५) आणि एका अल्पवयीनसह तिघांनी हा खून केला.


# विद्यार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, सोलापूर
## न्यास नोंदणी क्रमांक एफ-७६२३ (सोलापूर)
## निवडणूक कार्यक्रम-२०२६

जा.क्र./नि.वि.अ./०७/२०२६
दि.२१/१०/२०२६

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग सोलापूर यांचे कोर्टातील किरकोळ अर्ज क्रमांक ६०६/२०२६ मधील दिनांक १७/०७/२०२६ रोजीच्या आदेशानुसार विद्याची उत्कर्ष प्रतिष्ठान, सोलापूर नोदणी क्रमांक एफ-७६२३ (सोलापूर) या न्यासाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक घेणेसाठी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी श्री. बी.ए. फुलसुंदर निरीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांची नियुक्ती केलेली आहे.

सदरील नियुक्ती आदेशानुसार विद्यार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, सोलापूर नोंदणी क्रमांक एक-७६२३ (सोलापूर) या न्यासाचा निवडणूक निर्णय अधिकारी तथा निरीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर या नात्याने मी पुढीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहिर करीत आहे. याची न्यासाचे सर्व वैध सभासद यांनी नोंद घ्यावी,

| अ.क्र. | तपशिल | दिनांक/वार | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मतदारांची प्राथमिक यादी प्रसिध्द करणे | २६/१०/२०२६ सोमवार | ११:०० ते १६:३० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर व विधार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, द्वारा - प्रा. महेश महादेव माने, ४१अ, माकंडेय नगर, सोलापूर |
| २ | प्राथमिक मतदार यादीवरील आक्षेप स्विकारणे | २७/१०/२०२६ मंगळवार | ११:०० ते १४:०० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर |
| ३ | मतदार यादीवरील आक्षेपाची सुनावणी | २८/१०/२०२६ बुधवार | ११:०० ते १६:०० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर |
| ४ | मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे | २९/१०/२०२६ गुरूवार | ११:०० ते १६:३० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर व विधार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, द्वारा - प्रा. महेश महादेव माने, ४१अ, मार्कंडेय नगर, सोलापूर |
| ५ | उमेदवारी अर्ज विक्री करणे | ३०/१०/२०२६ शुक्रवार | ११:०० ते १४:०० | कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सार्वजनिक न्यास नोंदणी सदर बाझार, सोलापूर |
| ६ | उमेदवारी अर्ज स्विकारणे | ०२/११/२०२६ सोमवार | ११:०० ते १४:०० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर |
| ७ | उमेदवारी अर्जांची छाननी करणे | ०३/११/२०२६ मंगळवार | ११:०० ते १६:३० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर |
| ८ | उमेदवारी अर्ज मागे घेणे | ०४/११/२०२६ बुधवार | ११:०० ते १६:३० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर |
| ९ | उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे | ०५/११/२०२६ गुरूवार | ११:०० ते १६:३० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर व विधार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, द्वारा - प्रा. महेश महादेव माने, ४१अ, मार्कंडेय नगर, सोलापूर |
| १० | चिन्ह वाटप करणे | १२/११/२०२६ गुरूवार | ११:०० ते १४:०० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर |
| ११ | चिन्हांकित उमेदवाराची अंतिम यादी प्रसिध्द करणे | १३/११/२०२६ शुक्रवार | ११:०० ते १६:३० | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर व विधार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, द्वारा - प्रा. महेश महादेव माने, ४१अ, मार्कंडेय नगर, सोलापूर |
| १२ | गुप्त मतदान / केंद्राचे नाव व पत्ता | १५/११/२०२६ रविवार | १०:३० ते १२:३० | छत्रपती शिवस्मारक मंडळ, नवी पेठ, सोलापूर |
| १३ | मतमोजणी व निकाल | १५/११/२०२६ रविवार | १३:२० पासून पुढे | छत्रपती शिवस्मारक मंडळ, नवी पेठ, सोलापूर |

**उमेदवार व मतदारांसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना**

**१.** न्यासाचे कार्यकारी मंडळात अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सेक्रेटरी-१, कोषाध्यक्ष-१. सभासद ३ किवा ७ अशा कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ११ जणांची गुप्त निवडणूक पदध्दतीने निवड करण्यात येईल, त्यामुळे मतदारांनी मतपत्रिकेवरील उमेदवाराचे नाव किया चिन्ह यावर ७ किंवा ११ शिक्के मारून संबंधित उमेदवारास मतदान करावे, **२.** सभासद मतदार यादी हवी असल्यास कार्यालयीन वेळेत विहित शुल्क भरून सदर यादी निवडणूक निर्णय अधिकारी तथा निरीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, उत्तर सदर बाझार, सोलापूर यांचेकडून घेता येईल. **३.** किरकोळ दुरूस्तीपात्र नाव वगळता सभासद यांचे नावात बदल असेल तर संबंधित सभासदाने नावात बदल केल्याचे राजपत्र किंवा शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे अनिवार्य असेल. **४.** जे व्यक्ती सदर न्यासाचे सभासद असतील त्यांनाच मागणीप्रमाणे उमेदवारी अर्ज दिला जाईल. सदर अर्ज उमेदवाराने स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी यांचे समोर हजर राहून दाखल करावा. परंतु एका उमेदवाराचा एकच उमेदवारी अर्ज निवडणूकीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. **५.** उमेदवाराने एकापेक्षा अधिक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला असेल तर ज्या पदासाठी निवडणूक लढवायची असेल ते पद वगळता इतर पदासाठी दाखल केलेले अर्ज विहित मुदतीत मागे न घेतल्यास सर्व अर्ज बाद समजण्यात येतील. **६.** उमेदवारास पॅनल पध्दत अवलंबवयाची असल्यास त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे तसा अर्ज केल्यानंतर सदर पॅनलला मंजूरीअंती एकच चिन्ह देण्यात येईल. तसेच स्वतंत्र उभे राहणाऱ्या उमेदवारास स्वतंत्र चिन्ह देण्यात येईल. **७.** सूचक व अनुमोदक एकाच पॅनलमधील एक किंवा अधिक वेळा सूचक व अनुमोदक राहू शकेल परंतु तो सदर न्यासाचा वैध सभासद असावा. **८.** सबळ पुराव्यासह लेखी आक्षेप नोंदविण्यात आला असेल तरच सदर आक्षेपाची दखल घेण्यात येईल, तसेच सदरील आक्षेप सामंजस्याने निकाली काढण्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांना सहकार्य करावे. **९.** उमेदवारांस मतदान प्रतिनिधी दयावयाचा असल्यास प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर मतदान प्रतिनिधीची नेमणूक करून नियुक्तीचे पत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे द्यावे लागेल. **१०.** मतदारांनी मतदानाच्यावेळी ओळखीचा पुरावा म्हणून कोणतेही एक मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्राशिवाय मतदान करता येणार नाही. (मतदान कार्ड, वाहन परवाना, राष्ट्रीयकृत बैंक पासबुक, आधारकॉर्ड इत्यादी) **११.** मतदार यादीची किंमत रू.५०/- व उमेदवारी अर्जाची किंमत रू.५०/- इतकी राहील. **१२.** सदर न्यासाच्या निवडणूक प्रक्रियेसंबंधी निवडणूक निर्णय अधिकारी तथा निरीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांचा निर्णय अंतीम राहील. **१३.** प्रचलित कायदे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर उचित कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. **१४.** संबंधितांनी वर नमुद सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांचे पालन करून निवडणूक प्रक्रिया सुरळित व शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.

(शिक्का)

**सही/-**
**(बी.ए. फुलसुंदर)**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**विधार्थी उत्कर्ष प्रतिष्ठान, सोलापूर तथा निरीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर**



# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली.

प्रधान कार्यालय: 404, खणभाग, सांगली 416 416 फोन: (0233) 2376236/37/38 (Scheduled Co-Op. Bank)
sublegal@sangliurban.bank.in | subsachiv@sangliurban.bank.in | www.sangliurban.bank.in

परिशिष्ट - २०
शाखा : कुर्डुवाडी

## स्थावर मिळकतीचा फेर जाहीर लिलाव

**ज्याअर्थी, सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली, शाखा : कुर्डुवाडी** या धनको बँकेने खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द मे. उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन यांचेकडून महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये दावा क्र. १०१/३३१/२०२१-२२ व १०१/३२८/२०२१-२२ नुसार अनुक्रमे दिनांक ०६/१२/२०२१ व दिनांक २५/०१/२०२२ रोजीचे हुकूमनामा मिळविले आहेत.

त्याअर्थी, नोटीस देणेत येते की, मी **महावीर अनंत चौगुले, विक्री व वसूली अधिकारी,** मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार यापूर्वी तीन वेळेस मार्केट व्हॅल्यूप्रमाणे लिलाव ठेवण्यात आले होते, त्यामध्ये लिलाव बोली बोलण्यास कोणीही बीडर न आल्याने पुनःश्च खालील तपशीलाप्रमाणे त्रास मूल्यास (Distress Values), मिळकतीचा/शेतजमीनीचा फेर जाहीर लिलाव खाली नमूद केलेल्या ठिकाणी नेमलेल्या तारखेस करीत आहे. तरी इच्छुकांनी संधीचा फायदा घ्यावा.

| थकबाकीदारांचे नांव | गांव | स्थावर मिळकतीचा तपशील (शेतजमीन) | फेर लिलाव वार व तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| **श्री. कार्तिक उर्फ कार्तिकस्वामी बळीराम पाटील** | सोलापूर | मौजे सांगवी बुद्रुक, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं. ११३/३/ ड क्षेत्र १.९५ हे. आर. व पो.ख. 0.0९ हे. आर. | शनिवार ३१/१०/२०२६ | दुपारी १२.00 वा. | सांगली अर्बन को-ऑप. बँक लि.,सांगली. प्रधान कार्यालय, ४०४, खणभाग, सांगली. (वसुली विभाग) |
| **श्री. प्रसाद ज्ञानदेव जाधव** | सोलापूर | मौजे दहिटणे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं. ६ / ३ /ब/२ क्षेत्र २.00.00 हे. आर. | शनिवार ३१/१०/२०२६ | दुपारी १.00 वा. | |

**टीप :** १) लिलावाच्या शर्ती व अटी वसुली अधिकारी प्रधान कार्यालय, वसुली विभाग, सांगली व शाखाधिकारी, सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली, शाखा : कुर्डुवाडी यांचेकडे कार्यालयीन वेळेत (सार्वजनिक सुट्टी सोडून) पहावयास मिळतील वरील तारखेस अथवा त्यापूर्वी बाकीदाराने कर्जबाकी पूर्णपणे भरलेंस फेर लिलाव रद्द करणेत येईल. २) लिलावात भाग घेणेसाठी डिपॉझिट रक्कम रु. ५,००,०००/- आर.टी.जी.एस.ने बँकेच्या खाली दिलेल्या खातेवर दिनांक ३०/१०/२०२६ पूर्वी जमा करणेची आहे. तसेच ज्यांनी दिनांक ३०/१०/२०२६ पूर्वी डिपॉझिट भरले असेल त्यांनाच लिलावामध्ये सहभाग घेता येईल. ३) ज्यांची बोली मंजूर होईल त्यांनी मंजूर बोलीपैकी २५% रक्कम दिनांक ३१/१०/२०२६ रोजीच भरावी लागेल व ती न भरल्यास डिपॉझिटपोटी भरलेली रक्कम रु. ५.00 लाख जप्त (Forfit) करणेत येईल.

**Beneficiary Name: Sangli Urban Co-op. Bank ltd., Sangli., C/Account No.: 00070380003940**
**IFSC : HDFC0000007, Bank Name : HDFC Bank Ltd., Branch : Bhandarkar Road, Pune.**

ठिकाण : सांगली
तारीख :२१-१०-२०२६

(शिक्का)

सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली करिता,
**सही- (एम. ए. चौगुले) विक्री व वसुली अधिकारी**
**मो. +91 78880 09771**

Sun Advertising



# श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को. ऑप. बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

## ताबा सूचना

**सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**
**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) पंकज फॅब्रिकेशन प्रोप : चंद्रकांत मल्हारी खाडे (कर्जदार) रा : २५१७, राऊत चाळ, जुने रेल्वे स्टेशनजवळ, दत्त नगर, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१<br>२) राजेंद्र दत्तात्रय गुंड (जामीनदार) रा : ३८०९, राऊत चाळ, जुने रेल्वे स्टेशन जवळ, दत्त नगर, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१<br>३) सुरेश मल्हारी खाडे (जामीनदार) रा : २५१७, राऊत चाळ, जुने रेल्वे स्टेशन जवळ, दत्त नगर, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२१७०००००१५ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ६,०९,५०३/- (रु. सहा लाख नऊ हजार पाचशे तीन फक्त) अधिक दि. ०१/०७/२०२६ पासून १५% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | १३/०७/२०२६ व दि. २२/०७/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १९/१०/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. सोलापूर, सब डी. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्युन्सिपल हद्दीतील घर जागा मिळकत याचा गट नं. ६ आहे. याचे क्षेत्र ३८ आर ३२ चौ.मी. आहे. त्यापैकी जागा त्याचे क्षेत्र ४२३ चौ.फु. म्हणजेच ३९.०३ चौ. मी असून या मिळकतीचे चतुःसिमा :- पूर्वेस - युवराज चव्हाण व जाणेचा बोळ, पश्चिमेस - श्री शहा यांची जागा, उत्तरेस पारूबाई माळवे यांची जागा, दक्षिणेस - आबा खरसडे |
| २ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव पत्ता | १) नवकार ट्रेडर्स प्रोप : सोनाली संजय बलदोटा (कर्जदार) रा : १०८, बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१<br>२) ऋषभ संजय बलदोटा (जामीनदार) रा : १०८, बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२०७००००००६ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रु. ७६,६३,९१६.३९ (रुपये शहात्तर लाख त्रेसष्ठ हजार नऊशे सोळा रुपये एकोनचाळीस पैसे) अधिक दि. ०१/०७/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २०/०७/२०२६ व दि. २८/०७/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १९/१०/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. सोलापूर, सब डी. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्युन्सिपल हद्दीतील बिनशेती प्लॉट त्याचा गट नं. १४१०/६/अ/१४०१०/७/१३६४/३/२/९३, (प्लॉट नं. ९३) याचे क्षेत्रफळ २०७.०५ चौ.मी. त्याचा आकार रु. १३७.०० पैसे असून या मिळकतीचे चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. ९२, पश्चिमेस ९ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ९४ |
| ३ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) स्काय हाय रिसॉर्ट प्रोपः नेहा राकेश किलचे (कर्जदार) रा : वाणी प्लॉट, कॅन्सर हॉस्पिटलजवळ, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१<br>२) राकेश रामलिंग किलचे (जामीनदार) रा : वाणी प्लॉट, कॅन्सर हॉस्पिटलजवळ, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२०७००००४३ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये १,१३,७२,८८३/- (रु. एक कोटी तेरा लाख बाहत्तर हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) अधिक दि. ०१/०७/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | १४/०७/२०२६ |
| | प्रतिकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १९/१०/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. सोलापूर, सब डी. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील जुना गट नं. १२६९/२अ याचा नवीन गट नं. १२७५/२अ पैकी प्लॉट नं. २४ याचे क्षेत्र १५०.०० चौ. मी. याचे चौ. फुट १६१४ असा गुंठेवारी विकास नियमाधीन झालेला प्लॉट व त्यावरील बांधकामासाहित. या मिळकतीचे चतुःसिमा : पूर्वेस ९.०० मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. २२, उत्तरेस - प्लॉट नं. २५, दक्षिणेस ६.०० मीटर रुंदीचा रस्ता. |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पुर्वग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

दिनांक : १९/१०/२०२६
स्थळ : बार्शी

(सील)

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर



## दाखला हरवला आहे

**सचिन भीमाशंकर कळके**, रा. काटगाव, ता. तुळजापूर यांचा इयत्ता ७ वी पासचा शाळा सोडल्याचा दाखला काटगाव ते नळदुर्ग प्रवासादरम्यान हरवला आहे. कोणास सापडल्यास ७०२०१७६५१० या मोबाईल नंबरवर संपर्क करावा, ही विनंती.



## जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की विशेष करून मौजे कामोणे ता. करमाळा जिल्हा सोलापूर हद्दीतील जि. सोलापूर हे मौजे कामोणे येथील जमीन गट नंबर १५१/२ पैकी ०० हे ९० आर एवढे क्षेत्र श्री ज्ञानेश्वर उर्फ एकनाथ माने, रा. बिटरगाव (श्री) ता. करमाळा, सदरचे वर्ग-२ असल्याने वर्ग-१ ची परवानगी कामी मा. तहसीलदार साहेब तहसील कार्यालय करमाळा यांच्याकडे प्रस्ताव सादर करणार आहे. तरी सदर वर्ग-१ ची परवानगी कामी कोणाची काही हरकत, अडथळा अथवा तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीकरणापासून ३० दिवांच्या आत आपली लेखी व तोंडी तक्रार तहसील कार्यालय करमाळा यांच्याकडे कळवावे अन्यथा आमचे अशिल हे कोणाची काहीही तक्रार नाही असे समजून पुढील योग्य ती कारवाई कायदेशीर प्रक्रिया पार पाडतील

**सही/-**
**ॲड. हेमंत देवराव जाधव**
**बी.ए., एल.एल.बी.**
**बडगाव (उ), ता. करमाळा, जि. सोलापूर**
**मो. ९४२०३१८९८७**



फॉर्म नं. ३
नियम-१३ (१)(अ) पहा

## कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे

**युनिट क्र. ३०७ ते ३१०, तिसरा मजला, काकडे बीज**
**आयकॉन बिल्डिंग, शिवाजीनगर, पुणे - ४११००५**
**खटला क्र.: एओ/१६२/२०२६**

कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) अंतर्गत समन्स, कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२अ) सह वाचले जावे.

प्रदर्श क्र.: १६५१२

**बँक ऑफ महाराष्ट्र**
विरुध्द
**महेश शिवण्णा म्हेत्रे**
प्रति,
(१) महेश शिवण्णा म्हेत्रे
वडील/पती/इतर नातेवाईक - शिवण्णा
ब्लॉक नं. २०, योगीराजेंद्र नगर, नूतन हायस्कूलजवळ,
नेहरू नगर, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३००४
(२) सौ. राजश्री महेश म्हेत्रे
ब्लॉक नं. २०, योगीराजेंद्र नगर, नूतन हायस्कूलजवळ,
नेहरू नगर, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३००४

**समन्स**

जसे की, अर्ज क्र. ज/१६२/२०२६ हे प्रकरण दिनांक २९/०७/२०२६ रोजी माननीय पिठासीन अधिकारी / निबंधक (ठशसर्ळींीरी) यांच्यासमक्ष सूचीबद्ध करण्यात आले होते. आणि जसे की, या माननीय ट्रिब्युनलला (न्यायाधिकरणाला), तुमच्याविरुद्ध ३१,६५,८३९/- रुपयांच्या कर्जाच्या वसुलीसाठी दाखल केलेल्या मुळ अर्जावरील (ज) कायद्याच्या कलम १९(४) अंतर्गत समन्स / नोटीस जारी करण्यास आनंद झाला आहे (अर्जाची प्रत आणि कागदपत्रांच्या प्रती इत्यादी जोडल्या आहेत).

कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) नुसार, तुम्ही प्रतिवाद्यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारण दाखवावे की, अर्जात मागितलेला दिलासा का मंजूर केला जाऊ नये;
(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३अ मध्ये अर्जदाराने नमूद केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तांव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तांचे तपशील उघड करावेत;
(iii) मालमत्ता जप्त करण्याच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असेपर्यंत, तुम्हाला मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३अ मध्ये नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्ता किंवा अशा इतर मालमत्ता आणि संपत्तीची विल्हेवाट लावण्यापासून किंवा त्याबाबत व्यवहार करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे;
(iv) ट्रिब्युनलच्या पूर्वपरवानगीशिवाय, ज्या मालमत्तांवर सुरक्षा हित निर्माण केले आहे आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३अ मध्ये निर्दिष्ट किंवा उघड केलेल्या इतर मालमत्ता आणि संपत्ती, तुम्ही तुमच्या व्यवसायाच्या साध्या प्रक्रियेत असल्याशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करणार नाही;
(v) सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि संपत्तीच्या व्यवसायाच्या साध्या प्रक्रियेतील विक्रीद्वारे प्राप्त झालेल्या विक्री आगमनाचा हिशोब ठेवण्यास तुम्ही जबाबदार असाल आणि अशी विक्री रक्कम अशा मालमत्तांवर सुरक्षा हित ठेवणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थांकडे असलेल्या खात्यात जमा करावी लागेल.

तुम्हाला लिखित प्रतिज्ञापत्र दाखल करून त्याची एक प्रत अर्जदाराला देण्याचे आणि दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता निबंधकांसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा तुमच्या अनुपस्थितीत प्रकरणाची सुनावणी घेऊन निर्णय घेतला जाईल.

माझ्या स्वाक्षरीने आणि या ट्रिब्युनलच्या शिक्क्यासह आज दिनांक: ०४/०८/२०२६ रोजी दिले.

**टीपः जे लागू नसेल ते खोडून टाकावे.**

(शिक्का)

**समन्स जारी करण्यासाठी**
**अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी**



# श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**नमुना झेड**
**(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)**

## स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर c/o श्री महावीर अर्बन को. ऑप बँक ली., सोलापूर ही संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजि. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली व जप्ती आदेशाने जप्त केलेली यापुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्याऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबंधी कोणतेही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को. ऑप. बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील याची नोंद घ्यावी.

| अं. क्र. | कर्जदार / जामिनदाराचे / मिळकतदाराचे पत्ता | मिळकतीचे वर्णन | सि.स.न./ गट नं./ क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस प्रतिकात्मक ताबा दि. ३१/०८/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | युवराज सुधारकर कुरुलकर | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे कारंबा हद्दीतील बालाजी सिटी येथील | १. गट नं. १४७/२/१४८/२/१५१ प्लॉट नं. १५१, क्षेत्र ०.९२.९६ आर.चौ.मी.<br>२. गट नं. १४७/२/१४८/२/१५१ प्लॉट नं. १५२ क्षेत्र १.९१.५४ आर.चौ.मी.<br>३. गट नं. १४७/२/१४८/२/१५१ प्लॉट नं. १५३ क्षेत्र २.२८.६२ आर.चौ.मी.<br>४. गट नं. १४७/२/१४८/२/१५१ प्लॉट नं. १५४ क्षेत्र ०.९२.९६ आर.चौ.मी.<br>५. गट नं. १४७/२/१४८/२/१५१ प्लॉट नं. १५५ क्षेत्र ०.९२.९६ आर.चौ.मी<br>(एकूण एकत्रित क्षेत्र ६९९.०४ चौ.मी.)<br>एकत्रित चतुःसीमा :- पूर्वेस - शिव रस्ता, दक्षिणेस- रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. १५० व १५६, उत्तरेस - रस्ता व प्लॉट नं. १५० | १०/०८/२०२६<br>०६/१०/२०२६<br>रु. १०,९६,४६०/- |
| २ | लक्ष्मण शिवपुत्रप्पा पाटील (न्यू स्वस्तिक सेल्स प्रोप्रा. लक्ष्मण शिवपुत्रप्पा पाटील) | डि सोलापूर व सब डि अक्कलकोट पैकी मौजे कुमठे | गट क्र. १०/१/ब याचे क्षेत्र १.३३.०० हे. आर. चौ.मी. आकार ३.५८ पो.ख. ०.०३.०० चतुःसीमाः- पूर्वेस - गट नं. ०९, दक्षिणेस- सीना नदी, पश्चिमेस - गट नं. १०/४ व गट नं. १०/५, उत्तरेस - औराद ते कुमठा रोड. | १०/०८/२०२६<br>०७/१०/२०२६<br>रु. ५२,८४,६७३/- |
| ३ | आवेज केटरर्स प्रो.प्रा. इम्तियाज रुकमोद्दीन शाब्दी | डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर सोम पा हद्दतील तेलंगी पाच्छा पेठ येथील | सि.स.नं. १०३८०/२०० पैकी फा. प्लॉट नं. २४७ म्यु. घर नं. १९८ पैकी उत्तरेकडील (मालमत्ता पत्रकप्रमाणे पश्चिमेकडील) क्षेत्र ५६.१५ चौ.मी. चतुःसीमा :- पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - फा. प्लॉट नं. ५६/१, उत्तरेस - सि.स.नं. १०३८०/१८२, दक्षिणेस - सदर सि.स.नं. १०३८०/२०० पैकी मयत - धाकटा रामचंद्र यलप्पा सिडगिद्दी यांची हिश्याची जागा. | १०/०८/२०२६<br>०५/१०/२०२६<br>रु. ५,०२,७५२/- |
| ४ | एजाज रुकमोद्दीन शाब्दी (आवेज केटरर्स प्रोप्रा. इम्तियाज रुकमोद्दीन शाब्दी) | डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर सोम पा हद्दीतील तेलंगी पाच्छा पेठ येथील | सि.स.नं. १०३८०/२०० पैकी फा. प्लॉट नं. २४७ म्यु. घर नं.१९८ पैकी मधली भागाचे क्षेत्र ५६.१५ चौ.मी. चतुसिमा :- पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - फा.प्लॉट नं.५६/१, उत्तरेस - सि.स.न. १०३८०/२०० पैकी जागा, दक्षिणेस - सि.स.नं. १०३८०/२०० पैकी जागा | |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिध्दीकरण दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत घ्यावा अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २१/१०/२०२६**

(सील)

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





## नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे गोचडे व गायकवाड अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**
नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे रिषभ गोचडे व मृण्मयी गायकवाड यांनी शालेय शहर सॉफ्ट टेनिस स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना क्रीडा विभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा वर्षाताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कूलच्या मार्गदर्शीका मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सचिन खिलारीचे विक्रमासह सुवर्ण, भाग्यश्री जाधवला रौप्य





**नागोया-जपान, दि. २१ ऑक्टोबर-**
मराठमोळे पॅरा खेळाडू सचिन खिलारी व भाग्यश्री जाधवने नागोया-जपानमधील आशियाई पॅरा स्पर्धेतील गोळाफेकीत अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदके जिंकण्याचा पराक्रम केला आहे.

अपेक्षेप्रमाणे ऑलिम्पिक सांगलीचा रौप्यपदक विजेता सचिन खिलारीने आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णयशाचा आपला डंका वाजविला आहे. गोळाफेक एफ ४६ प्रकारात सचिनसह रूपेरी व कांस्य पदकही भारतीय खेळाडूंनी जिंकून आपले वर्चस्व प्रस्थापित केले. आपल्या पहिल्याच प्रयत्नात सचिनने १५.७९ ही विक्रमी फेकी करून आपले सुवर्णपदक निश्चित केले. पाठोपाठ मोहम्मद यासरने रूपेरी तर प्रविणकुमारने कांस्य पदकावर आपले नाव कोरले.

पॅरीस ऑलिम्पिकनंतर दुखापतीमुळे जागतिक स्पर्धेत सचिनला पदकापासून वंचित रहावे लागले होते. त्यानंतर अमेरिकन प्रशिक्षक पॉल विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सचिनने पुन्हा उभारी घेतली. अमेरिकेत सराव केल्यामुळेच माझी कामगिरी सुधारली त्यामुळेच मी विक्रम करू शकलो असे सांगून सचिन म्हणाला की, जागतिक स्पर्धा, ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदकाचे माझे ध्येय आहे. पुण्यातही बालेवाडीत प्रशिक्षक पॉल विल्सनने माझ्याकडून सराव घेतला. महाराष्ट्र शासन, ओजीक्यूने सुविधा दिल्यामुळेच मी हा पल्ला गाठू शकलो आहे.

महिलांच्या गोळाफेक एफ ३४ प्रकारात नांदेडच्या भाग्यश्री जाधवनेही सलग दुसऱ्यांदा रौप्यपदक जिंकले. वैयक्तिक सर्वोत्तम कामिगिरी ८.१९ मीटरची फेकी करीत भाग्यश्रीने रूपेरी यश कमवले. आपल्या दुसऱ्या प्रयत्नात तिने पदक निश्चित केले. गत चीनमधील स्पर्धेतही भाग्यश्रीने रौप्यपदक जिंकले होते. पदक जिंकल्यानंतर भाग्यश्री

म्हणाले की, हे पदक मला ऑलिम्पिक पदक जिंकण्यासाठी नवी उर्जा देणारे आहे. आई पुष्पा जाधव यांच्या साक्षीने पदक जिंकण्याचा आनंद मोठा आहे.



## राज्य खुल्या तायक्वांदो स्पर्धेत जिजाऊ गुरुकुल खांडवीच्या तिघांना सुवर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ ऑक्टोबर-**
टॅलेंट तायक्वांदो असोसिएशन, कुर्डूवाडी यांच्या वतीने आयोजित राज्य खुल्या तायक्वांदो स्पर्धेत जिजाऊ गुरुकुल सैनिकी पॅटर्न निवासी शाळा व कॉलेज खांडवी येथील ३ विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदके पटकाविली.

यात प्रतीक बोराडे याने प्रथम क्रमांक पटकावित बेस्ट फायटरचा मान मिळविला. दानिश शेख आणि विराज बोराडे यांनी सुवर्ण पटकाविले. याशिवाय श्रीयश जगताप, सिद्धार्थ बोराडे, अंश पावणे आणि स्वप्निल अंधारे व समर्थ गुंजाळ यांनी रौप्य तर तसेच साईनाथ माने, श्रेयस लिमकर, आर्यन मुसळे आणि नितांत कवडे यांनी ब्राँझ पदक संपादिले. त्याना जे. बी. शिंदे, आयाज शेख, क्रीडा शिक्षक वडेकर, निहार, प्रतीक आणि मेजर कदम यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षाताई घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम यांनी अभिनंदन केले.

## सेंट जोसेफ स्कूलचा देवांश सरवदे स्केटिंग स्पर्धेत प्रथम

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**



सेंट जोसेफ हायस्कूलचा देवांश सरवदे याने आंतरशालेय स्केटिंग स्पर्धेत ११ वर्षांखालील वयोगटात प्रथम क्रमांक पटकाविला. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. देवांशला क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे प्राचार्य रेव्ह. फादर आनंद गायकवाड यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.



## कल्याणशेट्टी प्रशालेच्या जमादारची विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

**अक्कलकोट, दि. २१ ऑक्टोबर-**
पंढरपूर येथे झालेल्या जिल्हा मैदानी स्पर्धेतून सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सिद्धाराम भोजण्णा जमादार याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सिद्धाराम याने १४ वर्षाखालील वयोगटातून १०० व २०० मीटर धावणे या दोन्ही प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला. सद्धाराम हा विद्यार्थी हसापूर सारख्या ग्रामीण भागातील आहे. त्यास क्रीडाशिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

## ह. दे. प्रशालेच्या यशवंतराजे पवार याची महाराष्ट्र लॉन टेनिस संघात निवड

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
वाशिम येथे पार पडलेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या राज्य शालेय लॉन टेनिस स्पर्धेत येथील यशवंतराजे पवार याने अजिंक्यपद पटकाविल्या मुळे त्याची महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड झाली.



नवी दिल्ली येथे २२ ऑक्टोबर पासून सुरू होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ रवाना झाला.यशवंतराजे हा येथील हरीभाई देवकरण प्रशालेचा विद्यार्थी असून त्याला क्रीडा शिक्षक माणिक साळसकर व मुख्याध्यापक प्रा.प्रकाश कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सुधीर सालगुडे हे त्याचे प्रशिक्षक आहेत. त्याच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा लॉन संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी तसेच मानद सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले व राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## शहर मैदानी स्पर्धेत स्वामी विवेकानंद प्रशालेस ६ पदके

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**
शासकीय क्रीडांगण, नेहरूनगर येथे झालेल्या शालेय मैदानी स्पर्धेत एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद प्रशालेने ६ पदकांची कमाई केली. या यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक सुभाष माने, गणपती कोळी, खंडू शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम व द्वितीय क्रमांकाचे विद्यार्थ्यांचे बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या सर्व खेळाडूंचे नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार प्रकाशजी यलगुलवार, जनरल सेक्रेटरी के.डी. पाटील, जनरल सेक्रेटरी शशीभूषण, उपाध्यक्ष अनुगीता पवार, सहसेक्रेटरी सीमा श्रीगोंदेकर, मुख्याध्यापक डॉ.हणमंत नारायणकर यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी : १७ वर्षाखालील मुली :** सृष्टी विटकर (तिहेरी उडी, द्वितीय), नेहा बेशकराव (हातोडा फेक, प्रथम ), अमृता परकीपंडला (तृतीय). **मुले :** ईश्वर चारगुंडी (हातोडा फेक, तृतीय).

**१९ वर्षाखालील मुली :** उत्कर्षा चौगुले(तिहेरी उडी, द्वितीय). **मुले :** साई अष्टेकर (तिहेरी उडी, तृतीय).



## शालेय कबड्डी स्पर्धेत जागृती प्रशालेस विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**
येथील राजीव गांधी इंडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय कबड्डी स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात जागृती प्रशालेने अजिंक्यपद पटकावले.

उपांत्य फेरीमध्ये त्यांनी आंबेडकर प्रशालेवर विजय मिळवून, अंतिम सामन्यात युनिक इंग्लिश मिडियम स्कूल या संघावरही एकतर्फी मात केली. या स्पर्धेत जागृती प्रशालेकडून मोनिका चव्हाण, पवित्रा पुजारी, आदिती गायकवाड, धोंडावा कोळी, ज्योती चव्हाण यांनी उत्कृष्ट खेळ केला. या सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक संतोष जाधव व रफिक गारे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व खेळाडूंचे प्राचार्य विजय रत्न चव्हाण यांनी अभिनंदन केले. यावेळी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आई फाउंडेशनचे अध्यक्ष मोहन डांगरे व श्री. स्वामी उपस्थित होते. यावेळी त्यांनी सर्व खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी खेळाचे गणवेश किट देण्याचे जाहीर केले.

## जिल्हा नेटबॉल स्पर्धेत नृसिंह विद्यालय पाकणीला दुहेरी मुकुट



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**
जिल्हा नेटबॉल स्पर्धेत पाकणीच्या नृसिंह विद्यालयाने १७ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादला.

पाकणी (ता. उत्तर सोलापूर) येथे झालेल्या या स्पर्धेत १७ वर्षे मुलींच्या अंतिम सामन्यात पाकणीने श्री गणेश विद्यालय बी.बी. दारफळचा ५-२ने पराभव केला, १७ वर्षे मुलांच्या अंतिम सामन्यात सिंहगड पब्लिक स्कूल पंढरपूरचा ६-२ने धुव्वा उडवविला. दोन्ही संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र झाले. तसेच पाकणीने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात द्वितीय व मुलांच्या गटात तृतीय क्रमांक संपादला. त्यांना क्रीडा शिक्षक किशोर गुंड, गोरखनाथ घोडके, श्रीधर देशमुख, नागनाथ लोंढे व अब्दुल चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या संघाचे संस्थेचे सचिव सुबोध शिंदे व मुख्याध्यापक म्हाळप्पा कोकरे, तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड, नेटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष खुद्दूस शेख यांनी अभिनंदन केले.



# संगमेश्वर कॉलेज व श्रीराम इन्स्टिट्यूट पानीव चॅम्पियन

### आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत पुरुष गटात संगमेश्वर कॉलेजने व महिला गटात श्रीराम इन्स्टिट्यूट पानीव संघाने विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धांचे आयोजन नेहरूनगर येथील श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या वतीने करण्यात आले होते.

या स्पर्धेची पारितोषिके जय जवान जय किसान सैनिक स्कूलचे प्राचार्य रवींद्र चव्हाण व मागास समाज सेवा मंडळाचे संचालक विवेक चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आली.

यावेळी विद्यापीठ निवड समितीचे डॉ. शिवानंद तोरवी, विजय पवार, सुभाष मारकड तसेच शारीरिक शिक्षण संचालक किरण चोकाककर, प्रा. नागनाथ पुदे, विजय तरंगे,बाळासाहेब वाघचवरे, डॉ. आनंद चव्हाण, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, पंच मंडळ अध्यक्ष शरद व्हनकडे, सचिव मोहन रजपूत, सहसचिव अजित शिंदे आदी उपस्थित होते.

**अंतिम चार महाविद्यालये : पुरुष गट :** संगमेश्वर कॉलेज, वसुंधरा महाविद्यालय, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप, एन. बी. नवले महाविद्यालय केगाव.

**महिला गट:** श्रीराम इन्स्टिट्यूट पानीव, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप, सांगोला कॉलेज,एन. बी. नवले महाविद्यालय केगाव.



## महाराष्ट्र विद्यालयाच्या पंढरे व मेहेर यांची विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ ऑक्टोबर-**
पंढरपूर येथे झालेल्या जिल्हा मैदानी स्पर्धेतून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महाराष्ट्र विद्यालय, बार्शीच्या आकाश संतोष पंढरे व ओवी अजय मेहेर यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.आकाश याने १७ वर्षे गटात भालाफेकमध्ये प्रथम तर ओवी याने १९ वर्षांखालील गटात थाळीफेकमध्ये द्वितीय स्थान संपालिले. त्यांना क्रीडा शिक्षक पी. डी. पाटील, योगेश उपळकर आणि विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव तथा शाळा समिती अध्यक्ष पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. मीराताई यादव, एस. बी. शेळवणे, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## बेगम कमरुन्निसा कारीगर गर्ल्स हायस्कूलला उपविजेतेपद



### शहर बास्केटबॉल स्पर्धेतील कामगिरी : दोघींची पुणे विभागीय चाचणीसाठी निवड

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
शालेय शहर बास्केटबॉल स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात बेगम कमरुन्निसा कारीगर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने उपविजेते संपादिले.

सेलिब्रेशन स्पोर्ट्स अकॅडमी येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. या स्पर्धेतून सांगोला येथे होणाऱ्या पुणे विभागीय बास्केटबॉल चाचणीसाठी हाजरा इरफान शेख व हादिया फारुक मुल्ला यांची निवड झाली.

या संघास क्रीडा शिक्षिका सईदा दारूवाले, अनिसा नालबंद, वसीम बागवान, मोईम सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्या तहसीना शेख, आरिफ पठाण व सर्व स्टाफने विजयी संघाचे कौतुक केले.

**उपविजयी संघ :** कायनात शेख, हादिया मुल्ला, हाजरा शेख, समीम शेख, अरशा शिकलकर, तह्मीन शेख, अक्सा पठाण तहरीम पठाण, नुजहत शेख, अलिना नदाफ.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# तामलवाडी औद्योगिक वसाहतीत अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर व ३३ केव्ही वाहिनीचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील औद्योगिक वसाहतीतील वीजपुरवठा सक्षम करण्यासाठी ३३/११ केव्ही तामलवाडी वीज उपकेंद्र येथे DB योजनेअंतर्गत मंजूर अतिरिक्त ५ MV पॉवर ट्रान्सफॉर्मर आणि स्वतंत्र ३३ केव्ही वीजवाहिनीच्या कामाचा शुभारंभ बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी करण्यात आला.

या सुविधांमुळे वीजपुरवठ्यातील अडथळे कमी होऊन औद्योगिक उत्पादनात सातत्य राहण्यास आणि भविष्यातील विस्ताराला चालना मिळण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमास महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता बुलबुले, धाराशिव मंडळाचे अधीक्षक अभियंता दानी, लातूर परिमंडलाच्या पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता चव्हाण, तुळजापूर विभागाचे कार्यकारी अभियंता काळे, NCC कंत्राटदार मिश्रा तसेच तामलवाडी इंडस्ट्रीज असोसिएशनचे उपाध्यक्ष किशोर कटारे, संजीव पतंगे, संजय पतंगे व परिसरातील उद्योजक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### उद्योजकांच्या वीज समस्यांवर बैठक

शुभारंभानंतर तामलवाडी एमआयडीसी येथे धाराशिव जिल्ह्यातील उद्योजकांच्या वीजविषयक समस्यांवर बैठक झाली. लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता, धाराशिव मंडळाचे अधीक्षक अभियंता आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत वीजपुरवठ्याची गुणवत्ता, वारंवार होणारे बिघाड, वीजवाहिन्यांची स्थिती, औद्योगिक वीज मागणी आणि भविष्यातील पायाभूत सुविधांवर चर्चा करण्यात आली. यावेळी उद्योजकांनी मांडलेल्या समस्यांवर महावितरण प्रशासन आणि तामलवाडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या समन्वयाने कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला. औद्योगिक विकासासाठी महावितरणने घेतलेला हा पुढाकार स्वागतार्ह असल्याचे असोसिएशनने नमूद केले.

# पाण्याचा अपव्यय; पाच जणांना प्रत्येकी २०० रुपयांचा दंड

### मजरेवाडी, कुमठे गावातील नाले व डीपी रोडची पाहणी

### नळांना तोट्या बसविण्याचे नागरिकांना केले आवाहन

### महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे 'ॲक्शन मोड'वर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

शहरात पाणीटंचाईची परिस्थिती असताना नळांना तोट्या न बसविता पाण्याचा अपव्यय करणाऱ्या पाच नागरिकांवर महापालिका प्रशासनाने प्रत्येकी २०० रुपयांचा दंड ठोठावला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बुधवारी कुमठे गावातील मड्डी वस्ती परिसराची पाहणी केली असता पाण्याची नासाडी होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर ही दंडात्मक कारवाई करण्यात आली.

आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी युगंधर हॉस्पिटल परिसरातील नाला, डीपी रोड, मजरेवाडी येथील नाला तसेच कुमठे गावातील मड्डी वस्ती परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप करंजे, नगर अभियंता नीलकंठ मठपती, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, मुख्य आरोग्य निरीक्षक लोखंडे, आरोग्य निरीक्षक, कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता, नाल्यांच्या कामाशी संबंधित सल्लागार आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नाल्यांची सद्यस्थिती, पाण्याचा निचरा, परिसरातील स्वच्छता आणि रस्त्यांशी संबंधित कामांचा आढावा घेण्यात आला. नाल्यांमधील अडथळे दूर करून पाण्याचा प्रवाह सुरळीत ठेवावा तसेच नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

कुमठे गावात पाणीपुरवठ्याचा दिवस असल्याने पाहणी दरम्यान काही नळजोडण्यांना तोट्या नसल्याचे आढळले. त्यामुळे नळांमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून रस्त्यावर येत होते. पाणीटंचाईच्या काळात अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय करणे गंभीर बाब असल्याने पाच नागरिकांवर प्रत्येकी २०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

### पाणी रस्त्यावर वाहून जाणार नसल्याची दक्षता घ्यावी

शहरातील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करून सर्व नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. नळांना योग्य तोट्या बसवाव्यात, विनाकारण नळ सुरू ठेवू नयेत आणि पाणी रस्त्यावर वाहून जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. पिण्याचे पाणी वाहन धुणे, रस्ते धुणे किंवा अन्य अनावश्यक कामांसाठी वापरणे टाळावे, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही तपासणी करून नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेणारा आरोपी जेरबंद

**मंगळवेढा, दि. २१ ऑक्टोबर -**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी महेश भागवत जाधव (वय २४,रा.परांडा जि.धाराशिव) याला पोलीसांनी अटक करुन पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने ३ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.आरोपीने १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस ४ जुल रोजी पळवून नेले. या प्रकरणी मुलीच्या आईने मंगळवेढा पोलीसात तक्रार दाखल केली होती. दरम्यान घटना घडल्यापासून तब्बल ४ महिने आरोपी सदर मुलीस घेवून फरार होता. या घटनेचा सुरुवातीला तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर यांच्याकडे होता. तपासाधिकारी बदलून सहाय्यक पोलीस निरीक्षक कुमार ढेरे यांच्याकडे दिल्याने त्यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे कसून शोध घेतला असता सदरचा आरोपी हा अल्पवयीन मुलीला घेवून इंदापूर येथे असल्याची माहिती मिळाली. त्यांनी तेथे जावून त्याला मुलीसह ताब्यात घेतले. आरोपीला पंढरपूर जिल्हा सत्र न्यायालयात उभे केले. आरोपी अल्पवयीन मुलीस कोठे कोठे घेवून गेला होता? तसेच त्याला मदत करणारे अन्य कोणी साथीदार आहेत का? याचा शोध घेण्यासाठी पाच दिवसाची पोलीस कोठडी न्यायालयाने मागितल्यानंतर न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या गुन्ह्यात बाललैंगिक अत्याचार व जातीवाचक कलमात वाढ केल्याने हा तपास सध्या डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे यांच्याकडे वर्ग केला आहे.

# उजनीतून भीमेत २२ ऑक्टोबरला पाणी सोडणार

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आश्वासन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ ऑक्टोबर-**

पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या प्रचार दौऱ्यानिमित्त सोमवार दि. १९ ऑक्टोबर रोजी पंढरपूर येथे बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उजनी धरणातून भीमा नदीत २२ ऑक्टोबरला पाणी सोडणार असल्याचे सांगितले.

सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या संपर्क कार्यालय पंढरपूर येथे पालकमंत्री गोरे यांच्या उपस्थितीत संवाद बैठक झाली. यावेळी उमेदवार कौस्तुभ गावडे व डॉ. स्मिता जाधव यांच्या प्रचारासंदर्भात चर्चा झाली. बैठकीस आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, कल्याणराव काळे, विठ्ठल हॉस्पिटलचे अध्यक्ष युवराज पाटील, माजी आमदार कुणाल पाटील, व्हा.चेअरमन मोहन नागटिळक, माजी व्हा.चेअरमन भारत कोळेकर, कारखान्याचे सर्व संचालक, निशिगंधा बँकेचे चेअरमन आर.बी.जाधव, संचालक अनिल खिस्ते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे, शहराध्यक्ष महमद उस्ताद, प्रतिभादेवी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन विलास काळे व सर्व संचालक, श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व शिक्षक, वसंतराव काळे आयटीआय धोंडेवाडी येथील सर्व शिक्षक, यशवंत नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन शहाजी साळुंखे व सर्व संचालक आदींसह शिक्षक व पदवीधर मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरवातीस चेअरमन कल्याणराव काळे यांनी दोन्ही उमेदवार पहिल्या पसंतीच्या मताने विजयी होतील अशी ग्वाही दिली. उशिरा निरोप देऊन मोठ्या संख्याने मतदार उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले. पालकमंत्र्यांना भीमा नदीत पाणी सोडण्याची आणि ८ तास वीज देण्याचे लेखी निवेदन दिले.

पालकमंत्री गोरे यांनी उपस्थित मतदारांना उमेदवार कौस्तुभ गावडे व डॉ. स्मिता जाधव यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन निवडून आणावे असे आवाहन केले. तसेच २२ ऑक्टोबरला उजनीतून नदीला पाणी सोडले जाईल व नदीकाठचा विद्युत पुरवठा ८ तास मागणीचा विचार करु असे आश्वासन दिले. संवाद बैठकीमुळे पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या प्रचाराला पंढरपूर परिसरात गती मिळाली. आभार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष अनिल नागटिळक यांनी मानले.



# थकीत ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

### संध्याकाळपर्यंत पाण्यात उभे

**तभा वृत्तसेवा,**
**उमरगा, दि. २१ ऑक्टोबर -**

भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखान्याकडून २०२५-२६ हंगामातील थकीत ऊस बिल मिळण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला बुधवारी तीव्र वळण मिळाले. शेतकऱ्यांनी जकेकूर येथील साठवण तलावात उतरून जलसमाधी आंदोलन सुरू केले. संध्याकाळपर्यंतही शेतकरी पाण्यातच ठाण मांडून होते.

थकीत ऊस बिल मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी उमरगा तहसीलसमोर आंदोलन सुरू केले होते. मात्र, अनेक दिवस उलटूनही ठोस तोडगा निघाला नाही. शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून संतप्त शेतकऱ्यांनी जकेकूर तलावात उतरून जलसमाधी आंदोलन सुरू केले. आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत हक्काचे ऊस बिल थकल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. नऊ दिवसांपासून आंदोलन करूनही प्रश्न सुटत नसल्याने शेतकऱ्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. केवळ आश्वासनांवर समाधान न मानता थकीत ऊस बिलाची रक्कम प्रत्यक्ष खात्यावर जमा करावी, अशी त्यांची मागणी आहे.



# फॅबटेक पॉलिटेक्निकला राष्ट्रीय स्तरावरील २ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ ऑक्टोबर-**

सांगोल्यातील फॅबटेक पॉलिटेक्निकला दोन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.महाराष्ट्रातील पॉलिटेक्निक स्तरावरील पहिला संघ म्हणून फॅबटेक पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी मान पटकवला आहे.

फॅबटेक पॉलिटेक्निकच्या टीम कायनेटिक झिरो रेसिंग या विद्यार्थी संघाने इंडियन कार्टींग रेसिंग यांच्या वतीने नवी दिल्ली येथे आयोजित गो-कार्ट स्पर्धेत देशभरातील ४६ संघांशी स्पर्धा करत बेस्ट इंजिनिअरिंग एक्सलन्स आणि आयएसआयई फ्युचर अवॉर्ड हे मानाचे दोन पुरस्कार प्राप्त केले. राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर या संघाने सर्वप्रथम गो-कार्टची तांत्रिक तपासणी आणि ब्रेकिंग टेस्ट यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यानंतर ऑटोक्रॉस, स्किडपॅड आणि बुद्ध इंटरनॅशनल सर्किट (बीआयसी), नवी दिल्ली येथे झालेल्या एन्ड्युरन्स स्पर्धेत प्रभावी कामगिरी करत संघाने स्पर्धेतील गुणवत्ता सिद्ध केली.

हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यासाठी प्रा.बिरा वगरे, प्रा.स्वप्निल बंडगर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशाबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, प्राचार्य तानाजी बुरूंगले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### विद्यार्थ्यांच्या यशाचा अभिमान

फॅबटेक संस्थेचे उद्दिष्ट केवळ पुरस्कार मिळवणे नसून विद्यार्थ्यांनी सैद्धांतिक ज्ञान प्रत्यक्षात उतरवून, नवनिर्मिती करावी आणि त्यांच्या कौशल्यात प्रगती साधावी हे आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाचा आम्हाला मनापासून अभिमान आहे.

**-डॉ.अमित रुपनर.**

# सांगोला नगरपरिषदेच्या प्रशासकीय अधिकाऱ्याला शिवीगाळ



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ ऑक्टोबर-**

माहिती अधिकाराच्या अर्जाच्या विरोधात मुख्याधिकाऱ्यांनी निर्णय दिल्याने अर्जदाराने सांगोला नगरपरिषदेच्या प्रशासकीय अधिकाऱ्याला शिवीगाळ करत शासकीय कामात अडथळा आणला. ही घटना सोमवार दि.१९ ऑक्टोबर रोजी घडली.

अर्जदार सुशांत गावडे रा.चिंचोली रोड, सांगोला याने दि.५ ऑगस्ट रोजी सांगोला नगरपरिषद येथे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत हालचाल रजिस्टरबाबत माहिती मिळणेकामी लेखी अर्ज केला होता. त्या अर्जाची सुनावणी दि.१५ ऑक्टोबर रोजी होऊन त्याबाबतचा निर्णय त्याला लेखी पत्राने कळवला होता. दरम्यान सोमवार दि.१९ ऑक्टोबर रोजी सांगोला नगरपरिषदचे प्रशासकीय अधिकारी सचिन पाडे हे नेहमीप्रमाणे सायंकाळी ५ वा.

आपले कार्यालयात काम करीत असताना सुशांत गावडेने मी दिलेल्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जा विरोधात तुमचे मुख्याधिकाऱ्यांनी माझ्या विरोधात निर्णय दिलेला आहे असे म्हणून त्यांच्याशी वाद घातला. तसेच शिवीगाळ करुन शासकीय कामात अडथळा आणला. याबाबत सचिन पाडे यांनी सुशांत गावडेविरुध्द सांगोला पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# आमदार राऊत यांचा भाजप उमेदवारांसाठी प्रचार

### वैरागमधील शाळा, कनिष्ठ व आयुर्वेदिक महाविद्यालयांमध्ये मतदारांशी संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २१ ऑक्टोबर -**

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप-महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आमदार राजेंद्र राऊत यांनी वैरागमध्ये प्रचार दौरा केला. शहरातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये तसेच आयुर्वेदिक कॉलेजला भेटी देऊन शिक्षक आणि पदवीधर मतदारांना महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

आमदार राऊत यांनी, भाजप-महायुतीच्या पदवीधर मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार डॉ. स्मिता जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ गावडे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. 'पदवीधर आणि शिक्षकांचे प्रश्न सभागृहात सक्षमपणे मांडून सोडवण्यासाठी भाजप-महायुतीचे उमेदवार अत्यंत अभ्यासू व कार्यक्षम आहेत.

सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक व पदवीधर मतदारांनी एकजुटीने प्रयत्न करून महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना विजयी करावे,' असे त्यांनी सांगितले.

सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, शारदादेवी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, डॅफोडिल्स इंग्लिश मीडियम स्कूल, अर्णव इंग्लिश मीडियम स्कूल, तुळशीदास प्रशाला, तुळशीदासनगर, साई आयुर्वेदिक कॉलेज आदी ठिकाणी त्यांनी प्रचार केला. प्रत्येक ठिकाणी शिक्षक व पदवीधर मतदारांनी आमदार राऊत यांचे स्वागत केले.

निवडणुकीतील विविध मुद्यांवर सकारात्मक चर्चा केली. दौऱ्यात वैराग भागातील प्रमुख राजकीय नेते, पंचायत समितीचे आजी-माजी सदस्य, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शिक्षक व पदवीधर मतदार उपस्थित होते.

# चंद्रभागा वाळवंटातून २३ टन कचरा संकलित




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ ऑक्टोबर -**

शहरातील चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ, सुंदर व निर्मळ ठेवण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषदेच्या पुढाकाराने आज बुधवार दि.२१ रोजी चंद्रभागा वाळवंट परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबवले. अभियानास विविध सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत २३ टन करा उचलला.

पंढरपूर नगरपरिषद, पालवी संस्था, कवठेकर प्रशाला नाथ चौक, विठ्ठल रुक्मिणी अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था, वेदांत गुरुकुल, क्रेडाई पंढरपूर, तिरूपती कन्ट्रक्शन पंढरपूर, श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, त्याचबरोबर जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले. अभियानामध्ये संबंधित संस्थांचे पदाधिकारी व स्वयंसेवक, शाळांचे विद्यार्थी पंढरपूर नगरपरिषदेचे सर्व विभागाचे कर्मचारी, विविध विभागांचे प्रमुख व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी, मुख्याधिकारी महेश रोकडे, नगराध्यक्षा प्रणिता भालके, नगरसेवक ओंकार जोशी यांनी सहभाग घेतला.

चंद्रभागा वाळवंट परिसरात अभियानादरम्यान तब्बल २३ टन कचरा संकलित करून त्याची विल्हेवाट लावली. स्वयंसेवक, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांनी श्रमदानातून परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ केला. या अभियानाच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली. दर बुधवारी आयोजित श्रमदान व स्वच्छता अभियानात शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्थांनी सहभागी व्हावे, याबाबत उपमुख्याधिकारी रविंद्र सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. पंढरपूर शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी ठेवण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून 'स्वच्छ पंढरपूर - सुंदर पंढरपूर' या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन नगराध्यक्षा प्रणिता भालके तसेच मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले. यावेळी स्वच्छता हीच विठ्ठल सेवा, श्रम दानातून भक्ती आणि सहभागातून स्वच्छता' हा संदेश देण्यात आला.

### अभियान कायमस्वरुपी राबवावे

या वाळवंटामध्ये अवघ्या महाराष्ट्राची क्रांती झालेली आहे. अशा या वाळवंटामध्ये काही अपप्रवृत्ती व अंधश्रध्देमूळे वाळवंट अस्वच्छ होत आहे. परंतू, चंद्रभागा वाळवंट स्वच्छ रहावे यासाठी पंढरपूर नगरपरिषद, वारकरी संघटना व संस्थांनी सहभागातून स्वच्छता अभियान राबवले हे कौतूकास्पद आहे. या अभियानात आमच्याही वारकरी संस्थेचे वारकरी सहभागी होऊन स्वच्छता करणार आहोत. हे स्वच्छता अभियान कायमस्वरुपी राबत राहो.

**- ह.भ.प.बंडातात्या कराडकर,**
अध्यक्ष, वारकरी शिक्षण संस्था.

## निधन वृत्त...

### अशोक घाटे



**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**

मूळचे बार्शीचे व सध्या राजस्व नगर, विजापूर रस्ता येथील रहिवासी अशोक गणपतराव घाटे, (वय ९१) यांचे २० ऑक्टोबर रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. डॉ. हेडगेवार रक्तपेढीतील कर्मचारी नभा घाटे यांचे ते सासरे होत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापुरात कोजागिरीला पंडित शौनक, अभेद अभिषेकी यांच्या सुरांची मैफल



## 'वारसा चांदणसुरांचा' कार्यक्रमात रंगणार सुरांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

दुर्वांकुर चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर आणि तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे 'वारसा चांदणसुरांचा' या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती दुर्वांकुर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दीपक कलढोणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोजागिरी पौर्णिमेच्या चांदण्यात शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावसंगीत आणि अभंगांच्या सुरांची मेजवानी सोलापूरकरांना अनुभवता येणार आहे, गुरुवर्य पद्मश्री पं. जितेंद्र अभिषेकी यांचे सुपुत्र, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक पं. शौनक अभिषेकी आणि त्यांचे नातू अभेद अभिषेकी हे या मैफलीत गायन सादर करणार आहेत. अभिजात संगीत कलेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात विविध संगीतप्रकारांतील निवडक रचनांची सुरेल अनुभूती रसिकांना घेता येणार आहे.

या मैफलीला संवादिनीवर माधव लिमये, तबल्यावर पं. सुभाष कामत आणि कार्तिक स्वामी, मृदंगावर ज्ञानेश्वर दुधाणे, तर टाळांवर दिलीप पोतदार साथसंगत करणार आहेत. नामवंत कलाकारांच्या सहभागामुळे ही मैफल रंगतदार ठरणार आहे. उद्योजक राहुल बुऱ्हाणपुरे आणि वैभव सुरवसे यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ही मैफल सर्व रसिकांसाठी खुली असून, संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'वारसा चांदणसुरांचा' या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन दीपक कलढोणे आणि वर्धराज मिर्जी यांनी केले. या पत्रकार परिषदेला राहुल बुऱ्हाणपुरे, वैभव सुरवसे, डॉ. जगदीश पाटील आदी उपस्थित होते.

# गोविंदश्री मंगल कार्यालय चौकात अतिक्रमणावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून बुधवारी गोविंदश्री मंगल कार्यालय चौक परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत चार लोखंडी खोके जप्त करण्यात आले तर दोन खोके जागेवरच निष्कासित करण्यात आले.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता अविनाश वाघमारे यांच्या नियंत्रणाखाली आणि अतिक्रमण प्रतिबंधक विभागप्रमुख सोपान कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कनिष्ठ अभियंता गणेश काकडे यांच्यासह अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही मोहीम राबविली. यावेळी चार लोखंडी खोके जप्त करण्यात आले तर दोन खोके जागेवरच निष्कासित करण्यात आले. शहरातील नागरिक व व्यावसायिकांनी सार्वजनिक रस्ते, पदपथ तसेच महापालिकेच्या जागांवर अनधिकृतपणे हातगाड्या, खोके किंवा अन्य साहित्य ठेवून अतिक्रमण करू नये. अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्यासह पादचाऱ्यांची गैरसोय होते. अनधिकृत अतिक्रमण केल्याचे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने देण्यात आला.

## ▶▶ महत्वाचे...

### 'हरिभाई देवकरण'च्या शिक्षकांना आयकॉन ऑफ महाराष्ट्र पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

टी. व्ही. महाराष्ट्र न्यूजतर्फे दिला जाणारा आयकॉन ऑफ महाराष्ट्र पुरस्कार २०२६' शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित हरिभाई देवकरण प्रशालेतील संस्कृत शिक्षक निखिल बडवे व पर्यवेक्षक डॉ. मारुती शहाणे यांना जाहीर झाला आहे. संस्कृत विषयातील उल्लेखनीय कार्य तसेच संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळीचे सदस्य व शाळा समितीचे अध्यक्ष सुरेश मंकणी, मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रकाश कांबळे, उपमुख्याध्यापक रवींद्र पानसरे तसेच पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, गणेश नेवरे आणि महेंद्र रणधीर यांनी निखिल बडवे व डॉ.मारुती शहाणे यांचे अभिनंदन केले. सदर पुरस्कार सरकारी विधिज्ञ उज्ज्वल निकम यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

### दुष्काळ व शेतकरी आत्महत्या या विषयावर १०० कीर्तनातून जागृती करणार

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

सध्या दुष्काळ हा खूप भयंकर असून प्रत्येक व्यक्तीने जागृत राहणे काळाची गरज आहे. या दुष्काळात शेती सहित जनावरांना सांभाळणे खूपच कठीण असून प्राप्त परिस्थिती स्वीकारली पाहिजे. या परिस्थितीला धैर्याने सामोर जाण्यासाठी प्रबोधनाची खूप गरज आहे. त्यामुळे ह भ प सुधाकर इंगळे महाराज यांनी १०० कीर्तनातून गावागावात जागृती करण्याचा विजया दशमी (दसरा ) निमित्त संकल्प केला आहे. शेतकरी हा सहिष्णू असून सहनशील आहे. शेतकरी हा निसर्ग व परिस्थिती ओळखून धैर्याने राहणारा आहे. परंतु एखाद्या व्यक्तीने अविचार करून जीवन संपवू नये, आत्महत्या करु नये. प्रत्येक व्यक्तीची त्यांच्या परिवाराला खूपच गरज असते म्हणून कीर्तन श्रावणातून मन सबळ करून धैर्यशील वृत्ती वाढवणे व टिकवणे हा प्रयत्न करण्याचा संकल्प श्री संत मुक्ताई मंदिर, सोलापूर येथे केला आहे. याप्रसंगी तानाजी महाराज बेलेराव, शंकर भोसले, प्रभाकर ताटे, इ. पदाधिकारी उपस्थित होते.



### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्या आठवडा बाजार बंद

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६च्या अनुषंगाने शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच मतदान केंद्रांच्या परिसरात सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील १२ गावांमधील आठवडा बाजार भरविण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आदेश जारी केला आहे.




# 'आई राजा उदे उदे'च्या जयघोषाने भवानी पेठ दुमदुमली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

भवानी पेठेतील जेमिनी मातेच्या मिरवणुकीत भक्ती, शिस्त आणि परंपरेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. गेल्या ५५ वर्षांपासून सुरू असलेली मिरवणुकीची परंपरा यंदाही उत्साहात जपण्यात आली. 'आई राजा उदे उदे, सदानंदीचा उदो उदो'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला.

माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मिरवणुकीचा प्रारंभ जेमिनी मातेच्या पूजनाने झाला. यावेळी भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, अतिरिक्त आयुक्त संदीप करंजे, नगरसेवक प्रथमेश कोठे, बिजू प्रधाने, अक्षय अंजीखाने, ज्ञानेश्वर म्याकल, नगरसेविका उज्ज्वला दासरी, बाबुराव जमादार, शशी थोरात, सचिन मेत्रस, अप्पी जमादार आणि बिपिन पाटील उपस्थित होते.ढोल-ताशांचा गजर, लेझीमचा ठेका आणि देवीच्या जयघोषात भवानी पेठ व घोंगडे वस्ती परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. मान्यवरांनीही लेझीम खेळत उत्साह वाढविला. सिद्धरामय्या पुराणीक, सायबण्णा मुडल, हणमंतु मंदकल, विजय साळुंखे, संजय होमकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, मंडळाचे पदाधिकारी आणि भाविक सहभागी झाले. दरम्यान, श्री समर्थ मित्र गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सिद्धरामेश्वर मंदिर परिसरात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# श्री रूपाभवानीची सीमोल्लंघन पालखी मिरवणूक भक्तिभावात

## उदंड उत्साहात शमीपूजन; भाविकांची मोठी उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

सोलापूरची कुलस्वामिनी श्री रूपाभवानी मातेचा सीमोल्लंघन पालखी सोहळा विजयादशमीनिमित्त मंगळवारी उत्साहात आणि भक्तिभावात पार पडला. 'आई राजा उदो... उदो'च्या जयघोषात निघालेल्या सवाद्य पालखी मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक पद्धतीने शमीपूजन आणि सीमोल्लंघन करून दसरा सण साजरा करण्यात आला.

विजयादशमीनिमित्त सकाळी श्री रूपाभवानी मातेची काकड आरती व अलंकार महापूजा करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी देवीची पालखी सीमोल्लंघनासाठी मंदिरातून बाहेर पडली. तुळजापूर वेसमार्गे पार्क चौकातून हुतात्मा पुतळ्याजवळील शमी वृक्षापर्यंत पालखी मिरवणूक वाजत-गाजत काढण्यात आली. या वेळी पारंपरिक वाद्यांच्या गजराने आणि देवीच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. या सोहळ्यासाठी मंदिराचे विश्वस्त, वहिवाटदार व पुजारी मल्लिनाथ मसरे, सुनील मसरे, अनिल मसरे, श्री सिध्देश्वर बँकेचे माजी अध्यक्ष प्रकाश वाले, राजशेखर हिरेहब्बू, सुधीर थोबडे, सोमनाथ मेंगाणे, संदेश भोगडे, मनीष मसरे, सारंग मसरे, प्रतीक मसरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



छायाचित्र : चेतन लिगाडे CK

हुतात्मा पुतळ्याजवळील शमी वृक्षाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर वृक्षाला पाच प्रदक्षिणा घालून सीमोल्लंघनाची धार्मिक परंपरा पार पाडण्यात आली. त्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

शमीपूजनानंतर पालखी मिरवणूक मसरे गल्ली येथे पोहोचली. तेथे अंबिका देवीची आरती करण्यात आली. त्यानंतर भोगडे गल्ली येथील कसबा देवी (फिरकी अंबाबाई) मंदिरात जाऊन देवीची मनोभावे पूजा करण्यात आली. मिरवणुकीच्या मार्गावर ठिकठिकाणी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. विविध धार्मिक विधी आणि आरतीनंतर पालखी पुन्हा श्री रूपाभवानी माता मंदिरात आणण्यात आली.

# पदवीधराचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबध्द

## महायुतीचे उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजप महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांनी दयानंद कॉलेज आणि श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये पदवीधर व शिक्षक मतदारांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी उपस्थित पदवीधरांसमोर आपले व्हिजन मांडले. शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्यावतीने त्यांचे वडील मुरलीधर गावडे उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाल्या, शिक्षण क्षेत्रात २५ वर्षे काम करण्याचा मला अनुभव आहे. पदवीधर आणि शिक्षकांच्या प्रश्नांची जाणीव आहे. मतदारसंघातील ५८ तालुक्यांमधील पदवीधरांचा कौशल्य विकास, रोजगार वाढीसाठी, उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक आणि करिअर कॅम्पस उभारणीवर भर देणार आहे. पदवीधर तरुणींसाठी लेडीज हॉस्टेल आणि घरातून ग्राफिक डिझाइनसारखी कामे करू इच्छिणाऱ्यांसाठी वर्क फ्रॉम होमच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्यही महत्त्वाचे आहे. पदवीधरांचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहे. पदवीधर आणि शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी २४ तास उपलब्ध राहून, समस्या सुटेपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांनी व्यक्त केला. तसेच त्यांनी दर तीन महिन्याला आपण केलेली कामे डिजीटलच्या माध्यमातून सर्वांसमोर ठेवणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी मुरलीधर गावडे यांनी, उमेदवार कौस्तुभ गावडे हे युवा उमेदवार आहेत. तसेच त्यांना शिक्षकांच्या प्रश्नाची जाण आहे. त्यामुळे शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कौस्तुभ गावडे व डॉ. स्मिता जाधव यांना पहिल्या पसंतीची मते द्यावी, असे आवाहन केले.

दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक डॉ. व्ही. पी. उबाळे, प्राचार्य, डॉ. बी. एच. दामजी, प्रप्राचार्य, डॉ. एस. व्ही. शिंदे, डॉ. एस. एस. गायकवाड, डॉ. भोजे मॅडम, डॉ. एस. बी. क्षीरसागर, श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीचे विश्वस्त राजशेखर येळीकर, सिद्धेश्वर वूमन्स पॉलिटेक्निक्सचे प्राचार्य गजानन धरणे, तुकाराम चव्हाण यांची उपस्थिती होती.



### मित्रपक्षांची भक्कम साथ

भाजप महायुतीमधील मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी महायुतीच्या उमेदवार डॉ. जाधव यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देत आमच्या पक्षाची तुम्हाला भक्कम साथ असल्याचे सांगितले. यावेळी शहराध्यक्ष पवार यांनी उमेदवार डॉ. जाधव यांचा सत्कार केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष जुबेर बागवान, अजित बनसोडे यांची उपस्थिती होती.

### महायुतीच्या उमेदवारासाठी झंजावती प्रचार दौरा

दोन्ही उमेदवाराच्या झंझावाती प्रचार दौऱ्याला बुधवारी (दि.२१) सोलापुरात उदंड प्रतिसाद मिळाला. धार्मिक स्थळांचे दर्शन, विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या गाठीभेटी आणि पदवीधर मतदारांशी थेट संवाद साधत त्यांनी प्रचार केला. प्रारंभी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर आणि पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत श्री मार्कंडेय महामुनींच्या मंदिरात नतमस्तक होऊन डॉ. जाधव यांनी प्रचार दौऱ्याला सुरुवात केली.

### आ. सुभाष देशमुख यांच्याशी चर्चा

डॉ. जाधव यांनी दक्षिण सोलापूरचे आ. सुभाष देशमुख यांच्या कार्यालयात भेट घेतली. यावेळी पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन, बूथनिहाय तयारी आणि मतदानाच्या दिवशी करावयाच्या व्यवस्थेबाबत यावेळी आ. देशमुख आणि उमेदवार डॉ. जाधव यांच्यात चर्चा झाली. यावेळी श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख यांनी पदवीधर मतदार नोंदणीसंदर्भातील माहिती दिली. मंडल अध्यक्ष अर्जुन जाधव आणि महेश देवकर उपस्थित होते.

### काडादी यांच्या निवासस्थानी भेट

डॉ. जाधव यांनी श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुष्कराज काडादी, तेजश्री काडादी, प्राचार्य गजानन धरणे, गिरीश बुगडे, संजय मंठाळे, शांतय्या स्वामी, संजय कुलकर्णी, डॉ. शैलेश पाटील आणि अमोल पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### वालचंद समूहच्या डॉ. गांधींकडून शुभेच्छा

उमेदवार डॉ. जाधव यांनी वालचंद शिक्षण समूहाचे सेक्रेटरी डॉ. रणजित गांधी यांची भेट घेतली. यावेळी पृथ्वीराज गांधी, माया गांधी, वालचंद शिक्षण समूहाचे व्यवस्थापन समिती सदस्य पराग शहा आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माया गांधी यांनी उमेदवार डॉ. स्मिता यांचा सत्कार केला.

### पद्मशाली शिक्षण संस्थेस भेट

उमेदवरा डॉ. स्मिता जाधव यांनी प्रचारदौऱ्या दरम्यान पद्मशीली शिक्षण संस्थस भेट दिली. याप्रसंगी संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी डॉ. स्मिता जाधव यांचा गौरव केला. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्रीधर चिट्याल आणि अनिल निंबाळकर यांची उपस्थिती होती.

### माजी आ. दिलीप माने यांच्याशी संवाद

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, माजी आ. दिलीप माने यांची उमेदवार डॉ. जाधव यांनी भेट घेतली. यावेळी माने यांनी प्रचार सुरू असल्याचे डॉ. जाधव यांना सांगितले. तसेच आमच्या भागातून आपल्याला पहिली पसंती मिळेल, असे आश्वासन दिले.

### काशी पीठ जगद्गुरूंचे शुभाशीर्वाद

अक्कलकोट रस्त्यावरील बृहन्मठ होटगी मठास उमेदवार डॉ. जाधव यांनी भेट दिली. मठात काशीपिठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामींचे दर्शन घेतले. यावेळी यशस्वी भवः असा आशीर्वाद महास्वामींनी उमेदवार डॉ. जाधव यांना दिला.

### दौऱ्यात यांचा होता सहभाग

या दौऱ्यात भाजप हराध्यक्षा रोहिणी तडवळकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल,भाजपा पश्चिम महाराष्ट्र वैद्यकीय आघाडीचे प्रमुख डॉ. शैलेश पाटील, भाजप शहर उपाध्यक्षा साधना संगवे, डॉ. अमोल पाटील, उमेश कोळेकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पदवीधर मतदार उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा 20% पर्यंत सूट
हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०

## लेझीमच्या तालावर नवरात्रोत्सवाचा दिमाखदार समारोप

### सोलापूर शहरात शिस्तबद्ध मिरवणुका उत्साहात

### ३१६ हून अधिक मंडळांची जागेवरच महाआरती

**विविध धार्मिक देखावे पाहण्यासाठी नागरिकांची रस्त्याच्या दुतर्फा गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

विजयादशमीच्या मुहूर्तावर सोलापूर शहरातील सार्वजनिक नवरात्र मंडळांनी लेझीमच्या तालावर आणि ढोलांच्या गजरात शिस्तबद्ध, दिमाखदार मिरवणुका काढत नवरात्रोत्सवाचा समारोप केला. मध्यवर्ती नवरात्रोत्सव महामंडळांतर्गत २५हून अधिक मंडळांच्या मिरवणुका निघाल्या तर ८० हून अधिक मंडळांनी परिसरातून मिरवणुका काढल्या. ३१६ हून अधिक मंडळांनी जागेवरच महाआरती केली. नंदीवर आरूढ महादेव, परशुधारी शिवांचा रुद्रावतार आणि अघोरींचा दरबार अशा धार्मिक देखाव्यांनी मिरवणुकांचे आकर्षण वाढविले.

मंगळवारी दुपारी चार वाजल्यापासून सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांच्या मिरवणुकांना सुरुवात झाली. लेझीम पथकांचा ताल, ढोलपथकांचा गजर, पारंपरिक वेशभूषा आणि फुलांची आकर्षक सजावट यामुळे मिरवणुकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. विविध धार्मिक देखावे पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती.

जयभवानी नवरात्रोत्सव मंडळाच्या १२० जणांच्या ढोलपथकात नीलकंठ भगवान महादेवांची वेशभूषा केलेले कलाकार नंदीवर





आरूढ झाले होते. प्रताप तालीम मंडळाने गळ्यात कंकाळमाला आणि हातात भव्य परशू घेतलेल्या शिवांचा रुद्रावतार साकारला होता. त्यासोबत अघोरींचा दरबारही लक्षवेधी ठरला. बुरूड शक्ती मंडळाने कोल्हापूरच्या अंबाबाईची प्रतिकृती साकारली, तर जागृती माता मंडळाने भगवान अय्यप्पा स्वामी आणि कार्तिक स्वामींच्या प्रतिमांसह फुलांची मनमोहक आरास केली होती. दाळगे प्लॉट मंडळाने दोन देवींच्या मूर्तींसह छत्रपती शिवराय आशीर्वाद घेतानाची मूर्ती साकारली होती. आकाश गंगा, उदयमुखी माता आणि शिवगौरी माता मंडळांच्या लेझीम पथकांनी तालबद्ध सादरीकरण करत मिरवणुकांची रंगत वाढवली.प्रारंभी शिवानुभव मंगल कार्यालय येथे श्री कामेश्वर गणपती आणि श्री तुळजाभवानी देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दुपारी ४ वाजता क्रांती चौक येथून 'जय भवानी' मंडळाच्या मानाच्या आग्रमानीनि देवीच्या मूर्तीची विधिवत पूजन पोलीस आयुक्त एम. राजकुमार, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, नगरसेवक चेतन नरोटे, माजी उपमहापौर दिलीपभाऊ कोल्हे, ट्रस्टी सुनील रसाळे, जगदीश मुनाळे, श्रीशैल बनशेट्टी आदी मान्यवर हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मध्यवर्ती नवरात्र मंडळाचे उत्सव अध्यक्ष विजय पुकाळे व सचिव दत्तात्रय मेनकुदळे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार केला. मिरवणुकीच्या शेवटच्या टप्प्यावर आझाद हिंद चौक येथील मंडळाच्या श्री देवीच्या मूर्तीची मध्यवर्ती मंडळाच्या वतीने पूजा करून श्रीफळ अर्पण करण्यात आले. हा सोहळा यशस्वीतेसाठी मध्यवर्ती मंडळाचे सर्वश्री बसवराज येरटे, मल्लिनाथ याळगी, ॲड प्रशांत कांबळे, किसन गर्जे, दिलीप चौधरी, मल्लिनाथ सोलापूरे, निलेश शिंदे, चक्रपाणी गज्जम, गणेश चिंचोळी, गिरीश शहाणे, दिलीप पाटील, संतोष फताटे, शिवानंद सावळगी, दत्तात्रय भोसले, बाबा शेख, आशिष उपाध्ये, आतिश देशट्टी, श्रीनिवास पुकाळे, सुरज सोलापुरे आदींनी परिश्रम घेतले.

**देवींच्या पालख्या शमीपूजनासाठी**

ग्रामदेवता रूपाभवानी मंदिरासह शिवगंगा, श्री अंबाबाई, हिंगुलांबिका देवी आणि इंद्रभवानी देवी आदी मंदिराच्या पालख्या शमीपूजनासाठी सहभागी झाल्या. अन्य मंडळांनीही या सोहळ्यात सहभाग घेतला. बलिदान चौकातून मध्यवर्ती नवरात्रोत्सव महामंडळाच्या मिरवणुकीला सुरुवात झाली. पार्क चौकातील शमी वृक्षाजवळ सीमोल्लंघन आणि शमीपूजनाचा सोहळा पार पडला.

**मिरवणुका अन् महाआरतीने सांगता**

मध्यवर्ती मंडळांतर्गत २५हून अधिक मंडळांनी मिरवणुका काढल्या, तर ८०हून अधिक मंडळांनी आपापल्या परिसरात मिरवणुका काढून उत्सव साजरा केला. ३१६ हून अधिक मंडळांनी जागेवरच महाआरती करून नवरात्रोत्सवाची सांगता केली. पारंपरिक वाद्यांचा निनाद, लेझीम पथकांचे सादरीकरण आणि धार्मिक देखाव्यांनी विजयादशमीच्या उत्सवात रंग भरला. शिस्तबद्ध मिरवणुका आणि भक्तिमय वातावरणामुळे नवरात्रोत्सवाचा समारोप दिमाखात झाला.

## संघशक्तीचा विराट सोहळा!

### शताब्दी वर्षानिमित्त शिस्तबध्द पथसंचलने; राष्ट्रभक्तीच्या जयघोषाने शहर दुमदुमले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या ऐतिहासिक पर्वावर मंगळवारी सोलापूरने संघशक्तीचे विराट आणि अंगावर शहारे आणणारे दर्शन घडवले. सात नगरे व अण्णाभाऊ साठे नगरातील देगाव या एका वस्तीतून मिळून सुमारे ४ हजार स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात शिस्तबद्ध पावले टाकत काढलेल्या पथसंचलनाने अवघे शहर राष्ट्रभक्तीच्या जयघोषाने दुमदुमून सोडले; तर शिस्त, एकजूट आणि तेजोमय भगव्या ध्वजाच्या साक्षीने सोलापूरकरांनी या देशभक्तीच्या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेत स्वयंसेवकांवर पुष्पांचा वर्षाव केला. मध्यभागी चार ध्वजरक्षक स्वयंसेवकांसह परम पवित्र भगवा ध्वज आणि त्याच्या पाठीमागे घोष पथक या दोन्हींच्या पुढे व पाठीमागे शिस्तीत चालणाऱ्या स्वयंसेवकांच्या तुकड्या, असे या संचलनाचे विहंगम दृश्य होते. या यशस्वी आयोजनामुळे संपूर्ण सोलापूर शहरात देशभक्तीमय व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

**पंचसूत्रीचा संदेश आणि सामाजिक बांधिलकीचा निर्धार**

शताब्दी वर्षानिमित्त आयोजित या संचलनाद्वारे सामाजिक बांधिलकी व मूल्यांचा प्रसार देशातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला. आगामी काळात सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, स्वबोध आणि नागरी शिष्टाचार या पंचसूत्रीच्या माध्यमातून अविरत कर्तव्य बजावण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. 'प्रत्येक स्वयंसेवकाने आपापल्या क्षेत्रात सक्रिय राहून समाज परिवर्तनाचे कार्य करावे,' असा महत्त्वपूर्ण संदेश विविध वक्त्यांनी उत्सवातून मांडला.

**देगाव येथे शहरातील पहिले वस्तीशा संचलन**

संघदृष्ट्या अण्णाभाऊ साठे नगरातील देगाव गावठाण येथील मारुती मंदिर परिसरात शहरातील एकमेव 'वस्तीशा संचलन' पार पडले. घोषपथकाच्या तालावर झालेल्या या शिस्तबद्ध संचलनाचे देगाव ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले. मंगळवारी पार पडलेल्या पथसंचलनाचे प्रमुख मार्ग या प्रमाणे होते. अशोक नगर: स्वातंत्र्यसैनिक चौक, केशव नगर: ई-ग्रुप परमेश्वरी देवी मंदिर, रेवणसिद्धेश्वर नगर: छत्रपती संभाजी महाराज तलाव, विक्रमादित्य नगर: मन्मथस्वामी मंदिर, हनुमान नगर: श्री समर्थ भैरव देवस्थान (सकाळी ७ वा.), दयानंद नगर: ५१ फुटी हनुमान मूर्ती (सकाळी ७:१५ वा.), संभाजी नगर: जगदंबा चौक, देगाव वस्ती (अण्णाभाऊ साठे नगर): गावठाण मारुती मंदिर (सकाळी ९ वा.).



## बार्शीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने पथसंचलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २१ ऑक्टोबर-**

बार्शी शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यावतीने पथ आयोजन करण्यात आले होते.संचलनासाठी बार्शी शहर आणि ग्रामीण भागातील बाल, तरुण आणि जेष्ठ स्वयंसेवक बांधवाची उत्साहाने उपस्थित राहून संचलानामध्ये सहभाग नोंदवला. मॉडेल हायस्कूलच्या मैदानावरून संचलन निघाले. याप्रसंगी प्रथम भगव्या ध्वजाचे पूजन रेणुका जाधव, पुजा बुडूख व किरण ढाळे यांच्या हस्ते करण्यात आले तदनंतर संचलानाचा आरंभ करण्यात आला. शहरातील महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, आझाद चौक, टिळक चौक, आडवा रस्ता, पांडे चौक या प्रमुख मार्गावरून संचलन सोहळा मार्गस्थ झाला. याप्रसंगी शहरातील महिलाभगिनी यांनी रांगोळी काढून आणि नागरीकांनी पुष्पवृष्टी करुन सदर संचलन सोहळ्याचे मोठ्या उत्साहात स्वागत केले संचलन पाहण्यासाठी नागरिकांची दुतर्फा गर्दी होती संचलनाचा समारोप मॉडेल हायस्कूल येथे करण्यात आला. या प्रसंगी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर डॉक्टर, वकील, व्यापारी प्रतिष्ठीत नागरिक व्यावसायिक आणि महिला उपस्थित होते. जिल्हा कार्यवाह ऋषिकेश कुलकर्णी मा.तालुका संघचालक आनंद सोमाणी तालुका कार्यवाह अरुण ग्रामोपाध्ये यांचे उपस्थितित व मार्गदर्शनाखाली सर्व स्वयंसेवकांनी मेहनत घेऊन सदर संचलन यशस्वीपणे संपन्न केले समारोपन तर उपस्थितांनी एकमेकांना दसरा आणि विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या



## श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानची दुर्गामाता दौड उत्साहात

### भगवे फेटे बांधून धारकऱ्यांचा शिस्तबद्ध सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

अग्रभागी मानाचा भगवा ध्वज.... त्यामागे मानाचे शस्त्र पथक... आणि त्यामागे भगवे फेटे परिधान केलेले धारकरी अशी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे मंगळवारी विजयादशमीच्या मुहूर्तावर श्री दुर्गामाता दौड मोठ्या उत्साहात झाली

नवरात्रीनिमित्त घटस्थापनेपासून शहरातून विविध भागांतून दररोज निघालेल्या श्री दुर्गामाता दौडीचा समारोप गुरूवारी विजयादशमीनिमित्त झाला. प्रारंभी भगव्या ध्वजाचे पूजन महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते आणि भारतीय सैन्य दलातील निवृत्त सैनिक महेश करकंटी यांच्या हस्ते छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथे झाले. यानंतर श्री दुर्गामाता दौडीस प्रारंभ झाला.यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी मानाचा भगवा ध्वज घेऊन श्री दुर्गामाता दौडीत सहभाग घेतला. देशासाठी जगायचं रं शिवबानं सांगावा धाडलाय रं, भारत हिंदुस्थान है हिंदूओंकी शान है, जय भवानी जय शिवराय आदी गीते, श्लोक म्हणत श्री दुर्गामाता दौड निघाली. वाटेत हिंदू बांधवांनी श्री दुर्गामाता दौडीचे रांगोळीच्या पायघड्या घालून, पुष्पवृष्टी करत स्वागत केले. छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकातून सुरु झालेली दौड बाळीवेस, कसबा गणपती, मसरे गल्ली, चौपाड श्री बालाजी मंदिर, चौपाड श्री विठ्ठल मंदिर, राजवाडे चौक, दत्त चौक, पाणीवेस, झुंजे बोळ, अनंत दूध डेअरी, माणिक चौक, श्री आजोबा गणपती मंदिरमार्गे श्री चौडेश्वरी मंदिरात विसर्जित झाली. या ठिकाणी आरती आणि ध्येयमंत्राने श्री दुर्गामाता दौडीचा समारोप झाला. यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी उपस्थित होते.

## प्रबुध्द भारत तरुण मंडळाची लक्षवेधक मिरवणूक

### राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी खेळले लेझीमचे डाव; शिस्तबध्दतेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या (पीबी ग्रुप) वतीने भव्य लेझीम ताफ्यासह शिस्तबद्ध आणि दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. आकर्षक सजावटीसह तथागत गौतम बुद्ध आणि बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचा मनोहारी देखावा मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्यासह हजारो गणवेशधारी कार्यकर्त्यांनी सादर केलेल्या लेझीमच्या बहारदार खेळाने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. तथागत गौतम बुद्ध आणि विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मिरवणुकीला उत्साहात प्रारंभ झाला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, सीए सुशील बंदपट्टे, उमर शेख, पी.बी. ग्रुपचे प्रमुख गौतम चंदनशिवे, प्रतीक चंदनशिवे, एस. के. फाउंडेशनचे रविकांत कोळेकर, ॲड. विशाल मस्के, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण शिंदे, विश्वनाथ बिडवे, धम्मपाल मैंदर्गीकर आणि चंद्रकांत सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या नेतृत्वाखाली ही मिरवणूक काढण्यात आली.गणवेशातील हजारो कार्यकर्त्यांनी एकसुरात आणि तालबद्ध पद्धतीने लेझीमचा खेळ सादर केला. विशेष म्हणजे आनंद चंदनशिवे आणि गणेश पुजारी यांनीही कार्यकर्त्यांसोबत लेझीमचा डाव खेळत मिरवणुकीत रंगत आणली. शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडलेल्या या मिरवणुकीतून बुद्ध-भीम विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी मनोज थोरात, अनिष सय्यद, गोपीनाथ जाधव, संजय इंगळे, आदित्य चंदनशिवे, विनायक मस्के, अभिजीत कापुरे, अक्षय मस्के, लखन चंदनशिवे, अमित माने, अजय इंगळे, बाबा गायकवाड, बंटी सरवदे आणि संतोष चंदनशिवे, गौतम शिंदे,सतीश अडाकुल, अनिल ठोबरे, प्रथमेश इंगळे, अमर सुरवसे पिंटू वाघमोडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**मिरवणुकीतून बुद्ध-भीम विचारांचा संदेश : चंदनशिवे**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीतून तथागत गौतम बुद्धांच्या शांती आणि अहिंसेच्या धम्माचा संदेश देण्यात आला. या मिरवणुकीत सर्व जाती-धर्मातील नागरिक सहभागी होतात. आज जगाला तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची नितांत गरज आहे, अशी भावना मंडळाचे मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांनी व्यक्त केली.





**धार्मिक सहिष्णुतेचा संदेश; ॲम्बुलन्सला तातडीने दिली वाट**

भागवत थिएटरसमोर प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचा लेझीम ताफा सुरू असताना बाजूने आझाद हिंद चौक नवरात्र महोत्सव मंडळाची देवी मातेची मूर्ती पुढे जात होती. त्यावेळी आनंद चंदनशिवे आणि गणेश पुजारी यांनी देवी मातेचे मनोभावे दर्शन घेतले. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देण्यात आला. दरम्यान, मिरवणुकीदरम्यान अचानक आलेल्या ॲम्बुलन्सलाही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तातडीने वाट मोकळी करून दिली.

## महत्वाचे...

### वाहनात पत्रा लागून जखमी इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-** वाहनात पत्रा पायास लागून जखमी झालेल्या शहाबाद गावच्या इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे मृत्यू झाला. मोहम्मद युसुफ सौदागर (वय ५५ वर्ष, रा. शहाबाद , जिल्हा गुलबर्गा) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. ते १४ ऑक्टोबर रोजी रात्री अक्कलकोट बायपास रोड जवळ एका मालवाहतूक गाडीमध्ये पत्रे भरून गाडीमध्ये बसून जात असताना त्यांच्या पायाला पत्रा लागला होता. त्यामुळे त्यांना अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मोहम्मद रफीक यांनी मध्यरात्री दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज पहाटे सव्वा एक वाजता मृत्यू झाला.



### शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-** म्हैस मेल्याच्या ेन्शनमध्ये एका तरुण शेतकऱ्याने रोगर औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील निलेगाव येथे आज मंगळवारी सकाळी ११ वाजता घडली. शकलीन फकरुद्दीन पठाण (वय २२ वर्ष, रा. निलेगाव) असे त्या तरुणाचे नाव आहे. म्हैस मेल्याच्या टेन्शनमध्ये वरील तरुणाने आज मंगळवारी सकाळी स्वतःच्या शेतामध्ये पिकावर फवारणी करण्याचे औषध पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्याला नळदुर्ग येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात वसीम मुजावर यांनी दुपारी चार वाजता दाखल केले.



### बाप-लेकास रॉड व पाईपने मारहाण

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-** जागेच्या वादातून एका बाप लेकाला लोखंडी रॉड ,पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना करमाळा तालुक्यातील बोरगाव येथे सोमवारी घडली. अनिरुद्ध विश्वनाथ ढवळे (वय ६५ वर्ष) आणि त्रिंबक अनिरुद्ध ढवळे (वय ३५ वर्ष, दोघे रा. बोरगाव) असे मारहाण झालेल्या वडील मुलाचे नाव आहे. ते दोघे सोमवारी दुपारी कामाला जात असताना जागेच्या वादातून त्यांना नागनाथ भोगल व इतर चार जणांनी मिळून मारहाण केली. त्यामुळे त्यांना करमाळा येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री नातेवाईकांनी दाखल केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१५७१

**करिती होय होय ।**
**परि नव्हे कोणी साह्य ।**

जगाच्या पाठीवर मनुष्य देहात वावरणाऱ्या प्रत्येक जीवाला कोणाची ना कोणाची गरज ही असतेच. प्रत्येक जीवाला कोणाचे साह्य, कोणाचा सहवास हा लाभावाच वाटत असतो. आनंद, सुख, समाधान मिळिवण्यासाठी असो किंवा ध्येय, उद्दिष्ट गाठण्यासाठी असो, पण प्रत्येकाला कोणाच्यातरी साह्याची गरज ही असतेच. हे साह्य प्रत्यक्ष स्वरुपाचे असू शकते किंवा अप्रत्यक्ष स्वरुपाचे असू शकते. आपण जेवढ्या आपुलकीने उत्कठतेने, अपेक्षेने समोरच्याकडून साह्याची अपेक्षा करतो, तेवढ्याच आपुलकीने, उत्कटतेने समोरचा साह्य करेलच असे नाही. कधी कधी आपणाला समोरच्याने फक्त मी तुझ्या पाटीशी आहे असे मन:पूर्वक म्हणावे वाटते. पण प्रत्यक्षात हृदयातून पाठिंबा देणारी किंवा धैर्य वाढविणारी माणसं खूप कमी पहायला मिळतात. केवळ वरकरणी मी आहे ना किंवा काळजी करू नकोस म्हणणारी माणसं बऱ्याचवेळा प्रसंगाच्या वेळी अंग काढून घेतात. आपला जणू त्या माणसाशी, कार्याशी, घटनेशी कसलाच संबंध नाही असा अविर्भाव आणून वागतात. या अनुषंगाने बोलताना तुकाराम महाराज म्हणतात,

**करिती होय होय ।**
**परी नव्हे कोणी साह्य ।**

समाजात आज असे एकही क्षेत्र सापडणार नाही की जेथे लोक प्रसंगाच्या वेळी अंग काढून घेत नाहीत. परके तर सोडाच पण बऱ्याचवेळा कुटुंबातील सदस्यही आपल्या पाठीशी उभी राहात नाहीत. म्हणूनच आपल्यांच्या अंग काढून घेण्यामुळे नुकसानीला किंवा बदनामीला सामोरे जाण्याची वेळ अनेकांवर आल्याचे आपण पहातो किंवा बऱ्याचवेळा आपणही अनुभवतो. आपल्या जीवनात असे अनेक प्रसंग, घटना असतात की जेथे आपणाला दुसऱ्याच्या पाठिंब्याची, सहाय्याची गरज असते. समोरचा आपणाला या प्रसंगी खरोखर हृदयातून पाठिंबा, सहाय्य देत आहे का? किंवा



देईल का? याचा आपणाला अंदाज बांधता आला पाहिजे. पटकन विश्वास टाकून कृती केली तर धोका होऊ शकतो. होय, होय म्हणणे किंवा पाठिंबा दर्शविणे आणि प्रत्यक्ष प्रसंगी अंग काढून घेणे म्हणजे एक प्रकारचा विश्वासघात आहे. असा विश्वासघात होऊ नये म्हणून आपण आपली कुवत, आत्मविश्वास, कौशल्य आदी बाबी विचारात घेऊनच संबंधित कृतीच्या अनुषंगाने पाऊल टाकायला हवे. ऐनवेळी समोरच्याने विश्वासघात केला तर त्याचा काय परिणाम होईल किंवा आपणाला त्या कृतीतून किंवा परीणामातून योग्य तो मार्ग कसा काढता येईल किंवा कसे तरूण जाता येईल याचाही विचार आपण करायला हवा. ऐनवेळी अंग काढून घेणे समोरच्यासाठी अत्यंत क्लेशकारक, धोकादायक असल्याने आपल्याकडून अशी कृती कोणाबाबतही होणार नाही याची दक्षता आपण घेऊ या. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार,**
**दि. २२ सप्टेंबर २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अश्विन**
**तिथी - शु. एकादशी**
**ऋतु - शरद(दक्षिणायन)**
**नक्षत्र- शततारका (११.५२)**
**योग - वृद्धि (२३.३८)**
**करण - बव (२६.४७)**
**राहू काल : गुरुवार**
**दु. ०१.३० ते ०३.००**

**दिनविशेष : १८७३: जगप्रसिद्ध तत्त्वज्ञानी व कवी स्वामी रामतीर्थ यांचे निधन.**
**१९४२: छायाचित्रकार पद्मश्री विजेते रघूबीर सिंह यांचे निधन.**
**१९७८: नारायण फडके ङ्ख साहित्यिक व वक्ते**
**१९८८: भारतीय अभिनेत्री परिणीती चोप्रा यांचा जन्म.**
**२०२५: भारतीय अवकाश वैज्ञानिक, SAC चे माजी संचालक एकनाथ चिटणीस यांचा जन्म.**



## जी.एम. संस्थेतर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सालाबादप्रमाणे यंदाही जी.एम. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बुधवार पेठ, मिलिंद नगर, जी.एम. चौक येथे तथागत गौतम बुध्द यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी तथागत गौतम बुध्द व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांच्या हस्ते मूर्तिस, पुष्पफुले अर्पण करून व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जी.एम. संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमरे, जी.एम. संस्थेचे आधारस्तंभ दत्ता वाघमारे, जी.एम. संस्थेचे विश्वस्त शशिकांत उर्फ पप्पू गायकवाड, जी.एम. संस्थेचे उत्सव अध्यक्ष अभी क्षीरसागर, आप्पासाहेब बागले, मुकेश सोनवणे, नरेंद्र शिंदे, आप्पासाहेब गायकवाड, गौरव पात्रे, रवी कांबळे, कनिष्क वाघमारे, उमेश लोंढे, सौरभ चवरे, रघुराज बनसोडे, संतोष जगताप, संकेत जगताप, सोहेल शिरसे, हर्षवर्धन बाबरे, अनिकेत तळभंडारे, आकाश जमादार, नेहाल क्षीरसागर, चंद्रकांत सुरवसे, मेडी दुपारगुडे, सेहवाग चलवदे, रुपेश उबाळे, अविनाश क्षीरसागर, कुणाल काळे, अक्षय वाघमारे, विकी सोनवणे, यशपाल वाघमारे, यशपाल कांबळे, उमेश गायकवाड, गंगाधर शिंदे, डॅनी रामगल, सागर वाघमारे, बुद्धभूषण वाघमारे, मिलिंद तळभंडारे, सिद्धार्थ बनसोडे, निशांत वाघमारे, ऋषिकेश वाघमारे, सचिन उबाळे, लखन जाधव, पिंटू मेटकरी, शुभम कसबे, बालाजी डावरे, अमित डोळसे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा समताधिष्ठित समाज घडवूया

**डॉ. शिवाजी शिंदे; धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त समता सैनिक दलाची मानवंदना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

आज ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आपण सात संकल्प करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समताधिष्ठित समाज घडूवूया, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

समता सैनिक दल, सोलापूर जिल्ह्याच्या वतीने आयोजित धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ते मंचावर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नोर्थकोट प्रशालेच्या मैदानावर ध्वजारोहण झाले. त्यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सर्व अनुयायांना शुभेच्छा दिल्या. यानंतर समता सैनिक दलाचे संचलन संपन झाले.

नॉर्थकोट प्रशाला ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत संचलन होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.



यावेळी समता सैनिक दलाचे जी ओ सी शांतिकुमार कांबळे, रमेश सुतकर,बाळासाहेब भोसले, अण्णासाहेब भालशंकर, विठ्ठल थोरे, अंगद जेटीथोर, महासचिव बाळासाहेब मस्के, कार्याध्यक्ष अनिल जगझाप, वसिष्ठ सोनकांबळे, मुकुंद चंदनशिवे, सुनिल डांगे, सुमित्रा केरु जाधव, सुनिता गायकवाड, सुचित्रा थोरे, चंदकांत कोळेकर, सुधीर चंदनशिवे, अरुण गायकवाड,संभाजी तळभंडारे, आनंद शिंदे, प्रमोद जाधव, विनोद जाधव, रत्नदीप कांबळे, कुणाल जानराव, शाहू दावणे, अंकुश बनसोडे, पायाळ, ज्ञानेश्वर प्रक्षाळे, बाळू शिवशरण, मारूती शिवशरण, संभाजी जौंजट, दिपक नागटिळक, बाळासाहेब थोरात, चित्तरंजन सातपुते, सूरज प्रक्षाले, सम्राट प्रक्षाले, प्रा.वनिता चंदनशिवे,वर्षा जाधव, प्रिती जाधव, आशालता आव्हाड, वैशाली उबाळे उपस्थित होते.

प्रास्तविक जीओसी शांतिकुमर कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन वसिष्ठ सोनकांबळे यांनी केले तर अण्णासाहेब भालशंकर यांनी आभार मानले.

## वेळेचे नियोजन करा




आपल्याकडे असलेल्या वेळेचे नियोजन करा आणि वेळ नीट वापरा. वेळ अधिक परिणामकारकरीत्या व योग्यरीत्या वापरा. वेळेचा नीट वापर करणे हे एक कौशल्य आहे आणि ते शिकता येते. कोणत्याही परिस्थितीत वेळ वाया घालवू नका. कारण एकदा गेलेली वेळ परत येत नाही, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात बोलताना त्या म्हणाल्या, जेव्हा आपण थकलेले अथवा तणावाखाली असतो तेव्हा स्वाभाविकपणे आपल्या कामातल्या आणि आयुष्यातल्या समस्या आपल्याला मोठ्या भासू लागतात. तणावाला ओळखून उपयुक्त मार्गाला लावता यावे. यासाठी आयुष्यात साधेपणा आणा. लहानसहान क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष देऊ नका. छोट्या छोट्या गोष्टींवर फार विचार करू नका. भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींबद्दलच्या किंवा भविष्यकाळाच्या चिंतेत स्वतःच्या बहुमोल आयुष्यातला वेळ वाया घालवू नका. आपले चित्त वर्तमानात ठेवा. राग,द्वेष भावना,आक्रमकता या गोष्टींमुळे संतुलन बिघडते, त्याचा आरोग्यावर परिणाम होतो. आपले इतरांशी असलेले संबंध आणि आरोग्य या दोन्ही गोष्टींवर संतापाचा विपरीत परिणाम होऊ शकतो. म्हणून क्रोधावर नियंत्रण ठेवा.

**- मल्लेश पुरवंत**



## 'कुचन'मध्ये ब्रतुकम्मा व गरबा महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभाग, सोलापूर येथे नवरात्र महोत्सवानिमित्त ब्रतुकम्मा व गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते ब्रतुकम्मा देवीची आरती करून करण्यात आले.

कार्यक्रमास आमदार देवेंद्र कोठे, भाजप शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, सुधा अळीमोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, विश्वस्त श्रीधर चिट्याल, श्रीनिवास गड्डम, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यकौशल्यातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि लोककलेचे सुंदर दर्शन घडविले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख शीतल कुलकर्णी यांनी ब्रतुकम्मा या विषयी सर्वांना माहिती व त्याचे महत्त्व सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## वळसंग सुत मिल जवळ अपघात; दुचाकीस्वार ठार

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

रस्ते अपघातात हसापूरचा दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना सोलापूर अक्कलकोट मार्गावर वळसंग सूत मिल जवळ आज मंगळवारी दुपारी अडीच वाजता घडली.

शिवाजी मारुती वाघमारे (वय ४६ वर्ष, रा. हसापूर ,ता. अक्कलकोट) असे मयत दुचाकी स्वराचे नाव आहे. ते आज मंगळवारी दुपारी अक्कलकोट कडून सोलापूर कडे मोटारसायकल वरून निघाले असताना वळसंग येथील सूत मिल समोर त्यांच्या मोटरसायकलला अपघात झाला. यात मार लागून ते जागीच मृत्यू होऊन पडले. ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता पोलीस हवलदार एस व्ही कुंवर यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी साडेतीन वाजता दाखल केला.




## मुस्लिम मावळ्यांकडून एकता रॅलीचे पुष्पवृष्टी करून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, पुद्दुचरी येथील पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या एकता रॅलीचे सोलापूर शहरात मार्केट यार्ड गेटवर मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडकडून पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. रॅलीचे नेतृत्व करणाऱ्या दक्षिण भारतातील पोलिस अधिकाऱ्यांचा सत्कार पोलिस उपायुक्त व मुस्लिम ब्रिगेड पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले.

यावेळी शहर पोलीस दलातील उपायुक्त डॉ. अशिवनी पाटील, प्रितम यावलकर, एस.आर.पी. समादेशक दिपाली काळे, सहा. पोलीस आयुक्त मनोजकुमार यादव, अरुण देवकर, प्रताप पोमण, विजय पवार, विजयालक्ष्मी कुर्री, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, अरविंद माने, सुरज मुलाण, बिराजदार, वैष्णवी पाटील यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मराठा सेवा संघ दक्षिण भारत सचिव राम गायकवाड, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे, माजी नगरसेवक हारुण शेख आदी उपस्थित होते.

## नूमवि शिशु शाळेत नवरात्र उत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

नूमवि शिशु शाळेत मुख्याध्यापिका अर्चनाताई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सव उत्साहात साजरा झाला.

भूपाली व जास्वंद गटाने तुळजाभवानीकडून शिवरायांना तलवार प्रदान, बागेश्री व निशिगंध गटाने पृथ्वी प्रदक्षिणा व मातृ-पितृ भक्तीचा संदेश, रागेश्री गटाने भाज्यांच्या सजावटीसह बनशंकरी देवी, सारंग गटाने सरस्वती रूप व नर्सरी गटाने सरस्वती प्रार्थना, तर केदार गटाने अष्टभुजा देवीचा



राक्षसवध देखावा सादर करून दुष्टशक्तीवर विजयाचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. उत्सव यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी, सांस्कृतिक प्रमुख अलका ओक, मृणाल देशपांडे, स्नेहा गजेंद्रगडकर, सारिका कुलकर्णी व सर्व शिक्षक-शिक्षकेतर वृंदांनी परिश्रम घेतले.

## वंदे मातरम्च्या जागराने संभाजी आरमारचा दसरा दरबार साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

संभाजी आरमारच्यावतीने यंदाचा १९ वा दसरा दरबार डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे पार पडला. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, डॉ. वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, सुप्रसिद्ध पोटविकारतज्ञ डॉ. श्रीकांत माकम, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. संतोष पाटील, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

विविध क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी बजावणाऱ्या गुणिजनांचा सन्मान या दरबारात केला जातो. यंदा प्रा. डॉ. पंकज सुतकर, शिल्पकार नितीन जाधव, विपुल



मिरजकर, विजय छचूरे, आदित्य कोडमुर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाने महापालिका शाळा क्र. १० च्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत यशस्वी करणाऱ्या महापालिका शाळा क्र १० यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

पत्रकार सिद्धाराम पाटील यांचे यावेळी 'वंदे मातरम : २५० वर्षांचा धगधगता इतिहास' या विषयावर भाषण संपन्न झाले. यावेळी संभाजी आरमार जिल्हाप्रमुख पदी ज्ञानेश्वर डोंबाळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. गीता पवार, संपर्कप्रमुख सोमनाथ मस्के, शहर उपप्रमुख गुरुनाथ औरंगे, दक्षिण तालुका उपप्रमुख विकिराज माने, प्रभाग क्र. १७ प्रमुख पदी मनोज पंगुडवाले, सोशल मीडियाप्रमुख पदी राज येमूल यांची यावेळी निवड करण्यात आली. कार्यक्रमासाठी संभाजी आरमारचे प्रदेश संघटक प्रकाश डांगे, गजानन जमदाडे, शशिकांत शिंदे, सागर ढगे, सागर संगवे, उमा रजपूत, संध्या हेब्बाळकर, शोभा घंटे, भाग्यश्री काळे, जान्हवी पतंगे, अमित कदम, राज जगताप, रेवण कोळी, द्वारकेश बबलादीकर, सागर दासी, गुरुनाथ निंबाळे, अर्जुन शिवसिंगवाले, अजिंक्य पाटील, राजाभाऊ आखाडे, शिवानंद कटके, श्रीकांत कदम, बालाजी पवार, ओम भोसले, संदीप मोटे, तेजस चौधरी, राजू रच्चा, अविनाश विटकर, संतोष आरशीद, ॲड. महेश जगताप, ॲड. सागर पवार उपस्थित होते. प्रास्ताविक कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रवक्ते मनीष काळे यांनी केले.

## साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या ब्रतुकम्मा महोत्सवात १,२०० महिलांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

सत्तर फूट रोड जवळ, माधवनगर येथील श्री साईबाबा मंदिर परिसरात श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने ब्रतुकम्मा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला आहे. मंडळाच्या वतीने झालेल्या या महोत्सवात सुमारे १२०० महिलांनी सहभागी नोंदवला होता.

ब्रतुकम्मा महोत्सवाला आधुनिकतेची जोड देत आकर्षक लायटिंग तसेच नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात येते. उत्कृष्ट ब्रतुकम्मा सजावट करणाऱ्या ५१ महिलांना साडी भेट देण्यात आली तर स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक महिलेला आकर्षक भेट वस्तू देण्यात आले.

या कार्यक्रमास चाटला पैठणी साडी सेंटरच्या संस्थापिका अश्विनी चाटला, संस्थेचे अध्यक्ष अनिल कोंडूर, माधवी अंदे, नंदिनी कोंडूर, सविता गजरे, शालिनी जल्ला, विजयालक्ष्मी कोळा यांची उपस्थिती होती.

पारंपरिक वेशभूषा, लोकगीते, फुलांची



आकर्षक सजावट आणि सामूहिक नृत्याच्या माध्यमातून तेलंगणा येथील सांप्रदायिक संस्कृतीचे दर्शन घडले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अनिल कोंडूर यांनी दिली आहे.

तेलंगणामध्ये ब्रतुकम्माचे नदी किंवा तलावामध्ये विसर्जन करण्याची परंपरा आहे. मात्र, शहरी भागात नदी-तलाव लांब असल्याने महिलांची गैरसोय होऊ नये आणि पर्यावरणाचेही संरक्षण व्हावे, यासाठी मंडळाच्या वतीने कृत्रिम विसर्जन कुंड तयार करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांना सोयीस्कररीत्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करता आली आहे.

यावेळी सुदर्शन बोल्लम, राजशेखर येमुल, बाळकृष्ण जाधव, आनंद श्रीपुरम, रमेश पेंडम, अनिल आडम, अमर बोलबत्तीन, राजशेखर बत्तुल, अरविंद यनगंदुल, व्यंकटेश अप्पम, नागनाथ बोलाबत्तीन, दशरथ पेंटी, वेंकटरमण कोंडूर, रमेश बत्तुल, लक्ष्मण येमूल, गोवर्धन चिप्पा उपस्थित होते.



## दिवाळी सणानिमित्त भराडिया सारीजमध्ये खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**

दसरा आणि दिवाळी सणानिमित्त सोलापुरातील प्रसिद्ध भराडिया सारीजमध्ये महिलांची मोठी गर्दी होत आहे.

भारतातील सर्व बाजारपेठांमधील फॅन्सी साड्या, सिल्क डिझायनर शालूचे प्रमुख होलसेल व रिटेल विक्री करणारे वातानुकूलित शोरूम म्हणजे भराडिया सारीज. २३४, पूर्व मंगळवार पेठ, कुंभार वेस, सोलापूर येथे हे शोरूम आहे. सोलापुरातील सर्वात मोठे साडी डेपो म्हणून 'भराडिया सारीज' हे नाव ग्राहकांचा विश्वास, ग्राहकांचे समाधान, दर्जेदार क्वालिटी आणि फ्रेश स्टॉक यामुळे ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. आमच्या भव्य दालनात डिझायनर सिल्क शालू, पैठणी, डिझायनर घागरा-लाचा, फॅन्सी साड्या, फॅन्सी इरकल साडी, फॅन्सी कॉटन साडी, तसेच फॅन्सी ड्रेस मटेरियल आणि नामांकित मिलचे सुटिंग-शर्टिंग योग्य दरात मिळेल.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### एन. बी. नवले सिंहगड महाविद्यालयात इल्युमिनेट' उपक्रम

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव-सोलापूर येथील उद्योजकता विकास कक्षाच्या (ई-सेल) वतीने आयआयटी बॉम्बेच्या ई-सेलच्या सहकार्याने 'इल्युमिनेट' या विशेष उद्योजकता मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विविध अभियांत्रिकी शाखांतील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमात आयआयटी बॉम्बेच्या ई-सेलचे प्रतिनिधी यासीन शेख यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकीय मानसिकता, नाविन्यपूर्ण कल्पनांचे स्टार्टअपमध्ये रूपांतर, व्यवसाय नियोजन, आर्थिक व्यवस्थापन आणि निधी उभारणीच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच आयआयटी बॉम्बेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'युरेका!' आणि नॅशनल एंटरप्रेन्योरशिप चॅलेंज या उपक्रमांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना उद्योजकीय संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण व्यावसायिक संकल्पना मांडल्या. प्रश्नोत्तरांच्या सत्रात स्टार्टअपची उभारणी, व्यवसायातील आव्हाने आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातील उपलब्ध संधी यासंदर्भातील विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या व्यावहारिक पैलूंची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधी शोधण्यापुरते मर्यादित न राहता रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक बनावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी केले. या उपक्रमाला संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. ई-सेलचे प्राध्यापक समन्वयक प्रा. एम. आर. सपाळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी टीमने कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन यशस्वीरीत्या केले.



### धम्मचक्र प्रवर्तनदिन मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात साजरा

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये अशोक विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सोलापूर भारतीय बौद्ध च्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हाध्यक्ष सत्यजित जानराव यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व बुध्दवंदना घेऊन मोठ्या उत्सवाने साजरा करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांची प्रमुख उपस्थित होती. याप्रसंगी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ, आनंद हिरेमठ, सोलापूर महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक अशोक इंगळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा चिटणीस बाबासाहेब क्षीरसागर, बार्शी तालुका अध्यक्ष सचिन फालखे, बार्शी तालुका संस्कार सचिव मनोज ओव्हाळ, शहर संघटक प्रसाद लांबतुरे, संकेत ओव्हाळ, भालचंद्र साखरे आदी उपस्थित होते.



### ५१ सुवासिनींची ओटी भरुन नवरात्रौत्सव साजरा

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
अभिनव सामाजिक संस्थेच्या वतीने नवरात्रीच्या नवमीचे औचित्य साधून जय भवानी सोसायटी, अंत्रोळीकर नगर येथील देवीच्या मंदिरात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मीनल दास यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली ५१ सुवासिनींची महिलांची ब्लाउज पीस देऊन पारंपारिक पद्धतीने ओटी भरण्यात आली. तसेच, कुमारिकांचे पूजन करून त्यांनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय भवानी मंदिर समितीचे अध्यक्ष भोसले दाम्पत्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सोहळ्याला अभिनव सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मीनल दास, जिल्हा संघटक अनिता वाघमारे, प्राजक्ता कुलकर्णी, जय भवानी सोसायटीतील प्रियंका भोसले,चंदाराणी भोसले, अनुजा माळवदकर, दिपाली हळकुंदे, सोनाबाई शिंदे, विद्या गोणे, स्नेहल गोरे उपस्थित होत्या.

## मनोरमा महाभोंडल्यातून संस्कृती अन् स्त्रीशक्तीचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा सोलापूर पश्चिम, मनोरमा साहित्य मंडळी सोलापूर तसेच मनोरमा बँक परिवार व मनोरमा मल्टी स्टेट परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मनोरमा महाभोंडला हा पारंपरिक लोकसंस्कृतीचा जागर करणारा कार्यक्रम संपन्न झाला.



मनोरमा सांस्कृतिक भवन, बेन्नूर नगर, नवीन आरटीओ कार्यालयाजवळील मनोरमा बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दीपप्रज्वलन तसेच देवी आणि हत्तीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या शेकडो महिलांनी हत्तीभोवती भोंडल्याचा फेर धरत ऐलमा पैलमापासून विविध पारंपरिक व आधुनिक देवीगीतांचे सादरीकरण केले. भारती विद्यापीठातील नेताजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींच्या समूहाने तायक्कांदोचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच मानस करकंटी व त्यांच्या विद्यार्थिनींनी लाठी-काठीचे प्रात्यक्षिक दाखविले.

सध्याच्या डिजिटल युगात महिलांना कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) माहिती असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर उत्तरा बर्डे यांनी महिलांना कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन करून जनजागृती केली. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'नवदुर्गा' म्हणून सन्मान करण्यात आला. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, एकल महिला धोरण कार्यकारिणी महाराष्ट्र राज्य सदस्य, डॉ. प्रीती देशमुख, डॉ. संध्या रघोजी, डॉ. दिपाली गोरे, डॉ. अश्विनी धोंड, डॉ. प्राजक्ता पोपटानी, डॉ. वर्तिका अगरवाल, लॉन टेनिस राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्या संध्याराणी बंडगर आणि सामाजिक कार्यकर्त्या उमा देगीनाळ यांचा शाल, रोप, पुस्तके व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक मनोरमा बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी यांनी केले. मनोरमा मल्टी स्टेटच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कविता कुलकर्णी यांनी आभार मानले. विद्या भगरे-भोसले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संचालिका, डॉ. ऋचा पाटील, डॉ. मिताली मोरे उपस्थित होते.

## आदमापूरच्या धर्तीवर बेलाटीत उद्या संत बाळूमामा जन्मोत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
श्रीक्षेत्र आदमापूर या संत बाळूमामांच्या मूळ पीठाच्या धर्तीवर, उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील संत बाळूमामा मंदिरात यंदाचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा केला जाणार आहे.



या महोत्सवाच्या मुख्य दिवसाचे विधीवत धार्मिक वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, मंदिराचे प्रमुख समन्वयक श्रीराम पाटील बेलाटीकर यांनी या नियोजनाची अधिकृत माहिती दिली आहे.

आदमापूर येथील पारंपरिक पद्धतीनुसारच बेलाटीमध्येही जन्मोत्सवाच्या मुख्य दिवशी पहाटे वाजता मंगलमयी वातावरणात काकड आरती आणि विधीवत महापूजा संपन्न होणार आहे. बाळूमामांच्या मूळ परंपरेचे रक्षण करत या पूजेनंतर सकाळी पवित्र मेंढीपूजन सोहळा पार पडेल. दिवसभर मंदिरात अखंड हरीनाम सप्ताह, नामांकित कीर्तनकारांचे कीर्तन आणि भजन मंडळांचे कार्यक्रम रंगणार आहेत.

सोहळ्याचे मुख्य आकर्षण असलेला संत बाळूमामांचा भव्य पाळणा कार्यक्रम दुपारी ठीक ४:३० वाजता पार पडेल. यावेळी बाळूमामाच्या नावानं चांगभलं' च्या गगनभेदी जयघोषात आणि अंगावर पिवळ्याधमक भंडाऱ्याची उधळण करत जन्मोत्सव सोहळा साजरा केला जाईल. या ऐतिहासिक उत्सवासाठी सोलापूर शहर व संपूर्ण जिल्ह्यातून येणाऱ्या हजारो भाविकांसाठी दिवसभर दासोह अन्नछत्र (महाप्रसाद) आणि पाण्याचा बंदोबस्त करण्यात आला आहे.

## हिंदू जनजागृती समितीतर्फे सामूहिक शस्त्र पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
विजयादशमीचा दिवस म्हणजे वाईटावर चांगल्याचा गोष्टीचा विजय. हे पर्व अधर्मावर धर्माची, असत्यावर सत्याच्या विजयाचे प्रतीक मानले जाते. विजयादशमीच्या दिवशी श्रीरामांनी रावणाचा वध करून अधर्म संपवला, तर प्रभु श्रीरामचंद्रांनी रावणाचा वध करून अधर्म संपवला. याच दिवशी पांडवांनी अज्ञातवास संपवून पुन्हा एकदा शस्त्र हाती घेतले होते. तीच उद्दिष्टे ठेवून हिंदूंच्या मनातील शौर्याची भावना पुन्हा प्रज्वलित होण्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात १७ ठिकाणी सामूहिक शस्त्रपूजन आयोजित करण्यात आले होते.

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने समितीच्या शाखा, धर्मशिक्षणवर्ग आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्गात शास्त्र पूजनाचे आयोजन केले. देशभरात १५० हून अधिक ठिकाणी असे आयोजन करण्यात आले होते.




समितीच्या रणरागिणी शाखेच्या महिला आणि मुलींनी देखील या उपक्रमात उल्लेखनीय सहभाग नोंदवला. श्री दुर्गादेव्यै नमः हा सामूहिक नामजप केल्यानंतर हिंदू राष्ट्राची प्रतिज्ञा घेण्यात आली. या शस्त्रपूजनाच्या माध्यमातून आम्ही सर्वधर्मीयांशी शौर्य जागृत होऊन हिंदू राष्ट्राच्या स्थापनेसाठी समर्पित होतोच राहू दे', अशी श्री दुर्गादेवीच्या चरणी प्रार्थना करण्यात आली. या उपाक्रमाला सोलापूर शहर तसेच अक्कलकोट तालुक्यातील शेकडो देवी भक्तांनी भावपूर्ण आणि शौर्यपूर्ण उपस्थिती लावली.



## पानगल प्रशालेस इस्लामिक एक्झिब्यूशनमध्ये यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
अश्फाकउल्ला खान हॉलमध्ये स्टुडन्ट इस्लामिक ऑर्गनायझेशन सोलापूर यांच्या वतीने पहिल्यांदाच इस्लाम धर्मवर आधारित आंतरशालेय इस्लामिक एक्जीबिशन एक्झिब्यूशन स्पर्धा घेण्यात आली. त्यात सोलापूर शहरातून सर्व प्रशालेने भाग घेतला होता. एम.ए.पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्याने आपले मॉडेल सादर केले. त्यात पानगल प्रशालेच्या विद्यार्थी अब्दुल्ला समीर कमिशनरच्या मॉडल ला द्वितीय क्रमांक मिळाले. तर अदिबा शब्बीर कुरेशी व सदफ मोहम्मद तोहीद आलम शेख या विद्यार्थीच्या मॉडलला चौथ्या क्रमांक म्हणजे उत्तेजनार्थ बक्षीस. प्राप्त झाले. त्याचबरोबर निकहत हसन बागबान, अबुबकर रफिक दौलताबाद या विद्यार्थीस सहभाग नोंदवल्याबद्दल समानपत्र देण्यात आले. दुसऱ्या व चौथा क्रमांक मिळालेल्या विद्यार्थी पाहुण्यांच्या हस्ते विस्मृती चिन्ह मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रशालेस मिळालेल्या यशाबद्दल प्राचार्य डॉ.हारून रशीद बागबान, फौजिया खेरदी, फर्जना नदाब, रियाज सय्यद, जाकीर शहापुरे,इद्रिस पेरमपल्ली सर आदिने विजय विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तर प्रशालेचे शिक्षक अकबर पठाण, मौलाना नाझीम व अल्ताफ सिद्दिकी यांचे मार्गदर्शन लाभले.



## शिक्षकेतरांचे प्रश्न लवकरच मार्गी लागतील : उच्च व तंत्र शिक्षणमंत्री पाटील

**सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी यांना आश्वासन**

**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. मंत्री पाटील हे सोलापूर दौऱ्यावर आले असता सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियन तर्फे जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले यांच्या नेतृत्वाखाली त्यांना भेटून निवेदन देण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते कॉलेज कर्मचारी युनियनने १० २० ३० चा प्रश्न आश्वासन प्रगती योजना यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील रकटलेली नोकर भरती व अनुकंपाच्या जागा तातडीने भरण्यास यावी अशी मागणी त्यांच्याकडे केली. जर मागण्या मान्य न झाल्यास पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीवर कुटुंबियासह बहिष्कार घालून म तदानापासून अलिप्त राहण्याचा इशारा दिला होता. परंतु उच्च शिक्षण मंत्री पाटील यांनी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय मागे घेत असल्याचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी जाहीर केले. यावेळी संघटनेचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद हो टकर,खजिनदार राहुल खराडे, विद्यापीठ सिनेट सदस्य अजित संगवे, भानुदास घंदुरे, शहाजी जाधव, केशव लोंढे, महेश ढेंगळे, संतोष अलकुंटे, संजीव थिटे, दत्तात्रय सुतार, विलास झरेकर, रोहन हावळे उपस्थित होते.

## हिंदी ही साहित्याबरोबरच रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणारी भाषा : प्रा. बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
केंद्रीय हिंदी निदेशालय, शिक्षण मंत्रालय, उच्चतर शिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली आणि हैदराबाद विद्यापीठाच्या हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने १२ ते १६ ऑक्टोबर दरम्यान आयोजित हिंदीतर भाषी हिंदी नवलेखक शिबिरात हिंदी साहित्यिक व हरिभाई देवकरण महाविद्यालयाचे प्रा. धन्यकुमार बिराजदार यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या शिबिरात त्यांनी विविध राज्यांतून सहभागी झालेल्या नवलेखकांना हिंदी साहित्याची ओळख करून देत सर्जनशील लेखनाच्या विविध प्रकारांवर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्रा. बिराजदार यांनी कविता लेखन, पथनाट्य लेखन, मुलाखत कौशल्य आणि मीडिया लेखन, ब्लॉग लेखन यांसह विविध विषयांवर प्रकाश टाकला. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात हिंदी ही केवळ साहित्यनिर्मितीची भाषा नसून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणारी महत्त्वपूर्ण भाषा आहे. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा सखोल अभ्यास करून उच्च शिक्षण घ्यावे आणि हिंदीच्या माध्यमातून विविध



क्षेत्रांत करिअर घडवावे, असे आवाहन प्रा. बिराजदार यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला केंद्रीय हिंदी निदेशालयाच्या हैदराबाद विभागाच्या उपनिदेशक डॉ. अंजू सिंह, डॉ. शालिनी राजवंशी, विद्यापीठाच्या मानविकी विभागाच्या अधिष्ठाता प्रा. सुनीता मिश्रा, भारतीय भाषा समिती, नवी दिल्लीचे प्रा. आर. एस. सर्राजू हे विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच हिंदी विभागप्रमुख डॉ. शामराव, शिबिराचे संयोजक डॉ. आत्माराम, डॉ. भगवान उपस्थित होते. त्यांच्या या मार्गदर्शनाबद्दल शाळा समिती अध्यक्ष सुरेश मंकणी, प्राचार्य प्रकाश कांबळे उपप्राचार्य शांतप्पा कुंभार यांनी प्रा. बिराजदार यांचे अभिनंदन केले आहे.



## अष्टमीदिनी पूर्व भागात घुमला 'ब्रतुकम्मा ब्रतुकम्मा उय्यालो...'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
नवरात्रनिमित्त पूर्व भागातील तेलुगु समाजात प्रसिद्ध ब्रतुकम्मा उत्सव शुक्रवारी अष्टमीदिनी मार्कंडेय उद्यानात साजरा करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध तेलुगू लोकगीत 'ब्रतुकम्मा ब्रतुकम्मा उय्यालो' म्हणत व फेर धरत शेकडो महिलांनी या उत्सवाचा आनंद घेतला.

भाजपा शहर मध्य विधानसभा मध्य मध्य मंडल अंतर्गत प्रभाग क्रमांक ९ मधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास शहर मध्येचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या पत्नी मोनिका कोठे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, शहर भाजपचे शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, महिला बालकल्याण समिती सभापती निर्मला जंगम, नगरसेविका राजश्री धोडमनी, नगरसेवक मेघनाथ येमूल, नगरसेवक शेखर इगे नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, नगरसेवक विजय चिप्पा, शंकर अण्णा चौगुले, भाजप शहर उपाध्यक्ष अंबादास बिंगी, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, भाजपा ज्येष्ठ सुकुमार सिद्धम, नागनाथ सोमा, रमेश मिट्टा दास भंडारी उपस्थित होते. या कार्यक्रमात सहभागी महिलांनी विविध रंगीबेरंगी फुलांचे गोपुर बनवून त्यामध्ये हळदीने बनविलेल्या गौरीदेवीची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर प्रसिध्द तेलगू लोकगीते म्हणत 'ब्रतुकम्मा' भोवती फेर धरला. उत्कृष्ट ब्रतुकम्मा सादर करणाऱ्या भगिनींना चाटला पैठणी व नगरसेविका श्रीमती सुनिता कामाठी परिवारातर्फे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

## नवरात्रोत्सव स्पर्धा: मेहता शाळेत बक्षीस वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
जुळे सोलापूर येथील कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत माननीय मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रमुख अतिथी आदिती भोसले (विशेष शिक्षिका, मानसशास्त्रज्ञ) या उपस्थित होत्या.

सर्वप्रथम श्रुती कुलकर्णी यांनी देवीस्तोत्र म्हटले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. मयुरी दुरुगकर



यांनी अतिथींचा परिचय केला. यानंतर प्रमुख आतिथींच्या हस्ते डाळीचे चिकट काम व रांगोळी स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

तसेच पाक कला व विविध गुणदर्शन स्पर्धेतील यशस्वी पालिकांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्विटी शिंदे या पालिकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन स्वाती मोहरे व आभार शितल जालीमींचे यांनी मानले.

## चक्क सहा फुटाचा ब्रतुकम्मा: सोलापुरातही तेलंगणाचा माहोल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर-**
जुना विडी घरकुल येथील प्रगती चौकाजवळील, गोविंदराज नगर येथे, श्री गोविंदराज गणेशोत्सव मंडळ व श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित पद्मशाली सखी संघम आयोजित ब्रतुकम्मा संबरालू' सोहळ्यात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. संपूर्ण वातावरण (माहोल) तेलंगणात असल्याची अनुभूती देणारी होती.

यामध्ये काही महिलांनी तर चक्क सहा ते सात फुटाचा ब्रतुकम्मा आणल्या होत्या. या सोहळ्यात ५८ बक्षिसे (लकी ड्रॉ) सोडतीद्वारे वाटप करण्यात आले.



यावेळी सर्वोत्तम लोकनृत्य, वेशभूषा, सर्वोत्कृष्ट ब्रतुकम्मा सजावट आणि सहभागी झालेल्या महिलांना लकी ड्रॉ द्वारे आकर्षक बक्षिसे देण्यात आले. चाटला पैठणी सेंटरतर्फे सेमी पैठणी व आकर्षक साड्या असे ८ साड्या, डॉ. गीता पिंडीपोल यांच्या देवइको हर्बल शॉपकडून ११ आकर्षक बक्षिसे, प्रीविंग्स फॉर यू'च्या वतीने सिध्देश्वर व वनिता पुंजाल यांच्यातर्फे ११ आकर्षक बक्षिसे, सुधाश्री ज्वेलर्सच्या श्रीनिवास कट्टा यांच्याकडून ११ पंचधातूंच्या अंगठ्या, आदिनाथ ॲग्रो प्रा. लि.चे विक्री अधिकारी रवि फलमारी तर्फे ११ आकर्षक बक्षिसे तर, भरत मेरगू यांच्याकडून ६ बक्षिसे देण्यात आले. अशाप्रकारे तब्बल ५८ बक्षिसे देण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक डॉ. अजय पोन्नम, अरिहंत इंग्लिश मिडीयम स्कूलच्या संचालिका सुलक्षणा पोन्नम, डॉ. गीता पिंडीपोल, श्रीनिवास कट्टा, वनिता व सिध्देश्वर पुंजाल हे उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबवा : अविनाश मडिखांबे

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.२१ ऑक्टोबर -**



दुष्काळी परिस्थितीत महिला बचत गट, मायक्रो फायनान्स कंपन्या तसेच राष्ट्रीयीकृत बँकांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबवावी, अशी मागणी रिपाइं (आठवले गट) अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे.

तहसिलदार विनायक मगर यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी दुष्काळामुळे नागरिकांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून, अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागविणेही कठीण होत आहे. प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन संबंधित बँका व मायक्रो फायनान्स कंपन्यांना आवश्यक निर्देश द्यावेत अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. यावेळी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, तालुका उपाध्यक्ष आंबादास गायकवाड, तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, दत्ता कांबळे, राजू कांबळे, ताहीर शेख, राजु हडपद, अर्जून बावकर, पुजा सनगुंदी, अजय कांबळे, निंगप्पा निंबाळ, शंकर बनसोडे आदी उपस्थित होते.



### महत्त्वाचे...



## नवरात्रोत्सवात 'माता बालक'तर्फे बचतगटांचे मेळावे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ ऑक्टोबर-**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला यांच्या वतीने सुरु असलेल्या अकोला, संगेवाडी, गार्डी, वाढेगाव, कमलापूर व राजुरी या गावामधील बचतगटात मेळावे घेण्यात आले. याप्रसंगी संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी महिलांना बचतीचे महत्व, सासू-सून नातेसंबंध, महिलांमधील सुप्त शक्ती, पाण्याची बचत, लघु उद्योग, स्त्रीचे महत्व, नवरात्रीचे महत्व यासंबंधी चर्चात्मक मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे महिलांचे छोटे छोटे खेळ, गाणी घेण्यात आली. महिलांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मेळाव्यात संस्थाध्यक्षा प्रा.निलिमा कुलकर्णी, कोषाध्यक्षा डॉ.शालिनी कुलकर्णी, सहसचिव डॉ.केतकी देशपांडे, स्नेहा देशपांडे, नीता लाटणे यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्याचे नियोजन व यशस्वी करण्यासाठी संपदा दौंडे, मंगल कुलकर्णी व बचत गटातील महिलांचे सहकार्य लाभले.



## सणापूर्वी रास्त भाव दुकानदारांचे मार्जिन जमा करा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ ऑक्टोबर -**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांच्या प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळावा, यासाठी सोलापूर ग्रामीण महासंघ जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुणे येथे पुरवठा उपायुक्त तावरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यावर दुकानदारांचे प्रलंबित मार्जिन सणापूर्वी जमा करण्यासाठी तातडीने कार्यवाहीचे निर्देश उपायुक्तांनी दिल्याची माहिती संघटनेने दिली. जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील धान्य वितरणाचे मार्जिन अद्याप मिळाले नसल्याचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला. याची दखल घेत तावरे यांनी सोलापूर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सोमवारपर्यंत मार्जिनसंदर्भातील आवश्यक माहिती तयार करून पाठविण्याचे निर्देश दिले. अन्यथा संबंधित कर्मचाऱ्याला नोटीस बजावण्यात येईल, अशी सूचना केल्याचे संघटनेने सांगितले. भेटीत मांडलेल्या अन्यही मागण्यांवर तावरे यांनी सकारात्मकता दर्शवली. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक, पंढरपूर तालुका संघटनेचे उपाध्यक्ष महावीर वाकसे, दुकानदार सुरेश पांढरे, बाळासाहेब आवटे आणि मिलिंद रेडेकर उपस्थित होते.



## ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा

### कॉम्रेड ठोंबरे; बार्शीत भाकप व आयटकची निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. २१ ऑक्टोबर -**

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि आयटक कामगार केंद्राच्यावतीने बार्शीतील शिवसृष्टी येथे निदर्शन आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांनी एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून अल्पसंख्याक, दलित आणि मागासवर्गीय मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची भीती व्यक्त केली. देशातील १३ कोटी लोकांची नावे मतदार यादीतून वगळल्याचा दावाही केला. आंदोलनात आयटकचे जिल्हा सचिव कॉ. ए. बी. कुलकर्णी, कॉ. प्रवीण मस्तुद, लहू आगलावे, रशीद इनामदार, आनंद गुरव, भारत भोसले, प्रमोद मंडलिक, बालाजी शितोळे, भारत चव्हाण, लोकरे, निर्मला सरवदे, भारती मस्तुद, आकाश कदम आदी उपस्थित होते.

# तुझेच धम्मचक्र फिरे जगावरी...!

### धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शहरात लक्षवेधक मिरवणूक

### श्री बुद्धांच्या चरणावरती विजयादशमी दिनी, दीक्षा आम्हा दिली भीमाने मंगल दिन तो जनी!

- ऐतिहासिक देखाव्यातून बुध्द
- भीम विचारांचा जागर
- मंगलमय वातावरणात लेझीमचे बहारदार खेळ
- लेझीम ताफ्यांमध्ये मुलींचाही लक्षणीय सहभाग







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑक्टोबर -**

श्री बुद्धांच्या चरणावरती विजयादशमी दिनी दीक्षा आम्हा दिली भीमाने मंगल दिन तो जनी...सोने लुटूनी मांगल्याचे लोक हर्षले मनी...!! साऱ्या विश्वाला बुद्ध हवा... असा संदेश देत धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मंगळवारी दि. २० ऑक्टोबर रोजी शहरातील विविध मंडळाच्यावतीने मंगलमय वातावरणात मिरवणुका काढल्या. ऐतिहासिक देखाव्याच्या माध्यमातून तथागत गौतम बुध्द आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. पारंपरिक वाद्यावर मंडळांच्या कार्यकर्त्यांनी बहारदार लेझीम खेळ सादर करून लक्ष वेधले.

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मंगळवारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात हजारो अनुयायींनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. मेणबत्ती प्रज्वलित करून पुष्प वाहण्यात आले. परिसरात विविध पुस्तके तसेच साहित्याचे स्टॉल्स थाटले होते. या ठिकाणी खरेदीसाठी मोठी गर्दी होती. सुमारे २० ते २५ मंडळाच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यावर गणवेशधारी कार्यकर्त्यांचा बहारदार लेझीम खेळ, भगवान बुध्दांच्या जीवनावर आधारित देखावे सादर करीत शहरातील विविध संस्था आणि मंडळांकडून मोठ्या जल्लोषपूर्ण वातावरणात गौतम बुध्दांच्या मूर्तीची मिरवणूक काढून शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. फुलांचा देखावाही सादर केला होता. पारंपरिक वाद्यासह ही मिरवणूक शांततेत पार पडली. काही मंडळांच्या लेझीम ताफ्यांमध्ये मुलींचा लक्षणीय होता.

मिरवणुकीत प्रबुद्ध भारत तरुण मंडळ, बुद्धदर्शन बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था, मातोश्री रमाबाई आंबेडकर तरुण मंडळ लेझीम संघ, प्रशिक सामाजिक संस्था, जी.एम. बहुउद्देशीय सामाजिक संस्था, आनंद बौध्द मंडळ, प्रबुध्द बहुउद्देशीय सामाजिक संस्था, छत्रपती शाहू राजे प्रतिष्ठान, अशोक जागृती तरुण मंडळ, मातंग समाज, सिद्धार्थ तालीम संघ, बॉबी मित्र परिवार दादर विभाग, स्वाभिमानी आर.जी. (राजगृह) कंपनी, बॉबी ग्रुप, बुद्धनगर फॉरेस्ट मित्र मंडळ, श्रावस्ती प्रतिष्ठान आनंद युवक मंडळ, डि. के. ग्रुप, रॉकी ग्रुप, सम्यक लेझीम ताफा, पी. एन. प्रतिष्ठान, डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती संजय नगर कुमठा नाका आदी मंडळांच्या कार्यकर्त्यांनी गणवेशात भव्य ताफ्यासह भव्य लेझीम खेळ सादर केला. मिरवणूक पाहण्यासाठी अबालवृध्द भीमसैनिकांची गर्दी झाली होती. मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह होता. समता सैनिक दलातर्फे डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास मानवंदना दिली. मिरवणूक मार्गावर पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. ही मिरवणूक सम्राट चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, सरस्वती चौक, चार हुतात्मा पुतळा चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आल्यानंतर डॉ. बाबासााहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सांगता झाली.

### धम्मशाही भोजन, मंडळांचा सत्कार उपक्रम

सिद्धार्थ मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने धम्मशाही भोजनाचे आयोजन केले होते. इंडियन दलित सेना महाराष्ट्रच्या वतीने डॉ. आंबेडकर चौक येथे विविध मंडळ पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

### हे देखावे ठरले विशेष आकर्षण

प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या वतीने तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीचा देखावा सादर केला. मातंग समाजच्या वतीने भव्य लेझीम ताफा काढला होता. या मंडळांनी आंबेडकरवादी मातंग हा संदेश देणारा देखावा सादर केला होता. बुद्ध दर्शन बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने मुकुटाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेला बादशाहीतल्या त्या मुकुटातला हिरा कोहिनूर डॉ. आंबेडकर हा आकर्षक देखावा उभा केला होता. छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठानच्या वतीने तथागत गौतम बुद्धांची मूर्ती आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस विद्युत रोषणाईचा देखावा तर प्रशिक सामाजिक संस्थेकडून सुवर्ण वृक्षाच्या तेजातून प्रकटणारी प्रज्ञा भगवान बुद्धांच्या धम्मातून मानवतेला मिळणारी दिशा 'सुवर्णबोधि' हा विशेष देखावा सादर केला. आर. जी. (राजगृह) मागासवर्गीय संस्थेच्या वतीने बुद्धांचा अहिंसेचा संदेश आणि 'जग मे बुद्ध का नाम है यही भारत की शान है' हा देखावा सादर केला होता. प्रबुद्ध बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने तुझेच धम्मचक्र फिरे जगावरी हा देखावा उभारला होता. जीएम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने भंतेगण आणि आकाशात कबूतर उडवितानाचा धम्म शांती संदेश देखावा, बॉबी ग्रुपने आकर्षक देखावा सादर केला होता. विविध मंडळांनी तथागत बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा संदेश देणारे देखावे सादर केले होते.



## सांगोला तालुक्यात डॉ.बी.पी. रोंगे यांना प्रतिसाद

### शिक्षकांशी थेट संवाद; वाढता पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर ,दि.२१ ऑक्टोबर -**

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'ज्ञानयात्री' म्हणून ओळख निर्माण झालेले डॉ. बी. पी. रोंगे हे सांगोला तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या भेटींना प्रचंड प्रतिसाद लाभत आहे.

स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर केलेल्या कामाची भेटीत शिक्षकांमधून चर्चा दिसून आली. सर्वत्र त्यांचे भव्य स्वागत केले जात आहे. प्रचारात त्यांनी आघाडी घेतल्याचे चित्र आहे. एकूणच त्यांच्याकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे. त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे.

डॉ. रोंगे यांनी सांगोलामधील फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, शिवाजी पॉलीटेक्निक, विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, विद्या मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, सांगोला महाविद्यालय, सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूल, ज्ञानदीप विद्यालय, छत्रपती शिवाजी विद्यालय वाटंबरे, श्रीधर कन्या प्रशाला नाझरे, कोळा विद्यामंदिर हायस्कूल कोळा, जुनोनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जुनोनी, महात्मा फुले विद्यालय किडबिसरी, आदर्श विद्यामंदिर जुजारपूर, राजुरी हायस्कूल राजुरी, गुरुकुल विद्यापीठ राजुरी, सोनंद हायस्कूल सोनंद, लक्ष्मीदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सोनंद, वत्सलादेवी विद्यालय व जुनिअर कॉलेज जवळाआदी शाळा व महाविद्यालयांतील शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या.

शिक्षकांच्या समस्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. हे प्रश्न पूर्वी सुटायला हवे होते. परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. आपण संधी दिली तर अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही त्यांनी शिक्षकांना दिली.

## 'दहिगाव'मधील पाण्यासाठी शेलगाव (क) ग्रामस्थ आक्रमक



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि २१ ऑक्टोबर-**

दहिगाव उपसा सिंचन योजनेतील २४ गावांना प्राधान्याने पाणी मिळावे, या मागणीसाठी शेलगाव (क.) ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. योजनेबाहेरील गावांना पाणी देण्यास विरोध नसून, प्रथम लाभक्षेत्रातील गावांची गरज भागवून शिल्लक पाण्याचे वाटप करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यासंदर्भात ग्रामस्थांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व संबंधित कालवा अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, जिल्हाधिकारी, आमदार, खासदार, पालकमंत्री आणि जलसंपदामंत्र्यांनाही निवेदन पाठविले आहे. शेलगाव क ला मागील वर्षी उन्हाळी आवर्तन मिळाले नाही, तसेच यावर्षीही खरीप आवर्तनाचे पाणी मिळाले नसल्याचे निवेदनात केले आहे. यावेळी माजी सरपंच आत्माराम वीर, पोलीस पाटील श्रीधर पाटील, माजी सरपंच अंकुश जाधव, सुरेश शिंदे गुरुजी, सरपंच राहुल कुकडे, उपसरपंच सचिन वीर यांच्यासह अनिकेत शिंदे, अमर शिंदे, प्रज्वल माने, अनिकेत माने, रोहित वीर, दत्तात्रय बनसोडे आदी उपस्थित होते.

## विजयालक्ष्मी पोशाख, अलंकारांनी रुक्मिणीचे दैवी रुप

### दसऱ्यानिमित्त देवांची पारंपरिक सजावट



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ ऑक्टोबर-**

खंडेमहानवमी विजयादशमी दसरा दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपरिक पोषाखासह अलंकार परिधान केले होते. रूक्मिणी मातेस श्री.विजयालक्ष्मी पोशाख परिधान करुन विविध अलंकार परिधान केल्याने मातेचे दैवी रुप अधिकच प्रसन्नता देत होते.

मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी याबाबत माहिती दिली. श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगनजोड, नामनिळाचा, नवरत्नाचा हार, मोरमंडळी, मोत्याचा तुरा, चांदीची काठी, सोन्याचे घोंगडे, सोन्याचे पितांबर इत्यादी अलंकार परिधान केले होते. रुक्मिणी मातेस जडावाचे मुकुट, जडावाचे बाजूबंद, खड्यांची वेणी, चिंचपेटी हिरवी, हातसर जोड, पाण्याडयाचा हार, तनमणी मोठा, कोल्हापुरी साज, दशावतारी साज, सोन्याची साडी, ठुशी, मास पट्टा, शिंदे हार इत्यादि अलंकार परिधान केले होते.

राधिका मातेस नक्षी टोप, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, जवमनी पदक, हायकोल इत्यादी तर सत्यभामादेवीला सिद्धेश्वर टोप, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, चिंचपेटी तांबडी, लक्ष्मीहार इत्यादी अलंकार परिधान केले होते. महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी एक पदरी पाचूचा लोलक असलेली, एकदाणी इत्यादी अलंकार परिधान केले होते. श्री व्यंकटेश मंदिर समितीच्या अखत्यातरीतील देवतांनाही पारंपारिक पोषाख केले होते.

दि. २२ ऑक्टोबर रोजी एकादशी असल्याने दर्शनासाठी होणारी गर्दीच्या पार्श्वभूमीवर अनुषंगिक सोयी-सुविधा पुरवल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले.

**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फुलांची सजावट**

विजयादशमी (दसरा) निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुले व पानांचा वापर करून मनमोहक सजावट केली होती. सजावटीसाठी झेंडू, ॲस्टर, शेवंती, गुलाब, ऑर्किड, अँथुरियम, कार्नेशन, सूर्यफूल, तगर, गुलछडी, लक्ष्मी कमळ, ब्लू डेझी, पिंक डेझी आदी फुलांचा, तसेच जिप्सोफिला, कमिनी, अशोकाची पाने, मनीप्लांट आणि ड्रॅसिना यांसारख्या शोभिवंत पानांचा वापर केला होता. ही सजावट भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. राम जांभुळकर, पुणे यांनी ही पुष्पसजावट सेवा सेवाभावी तत्त्वावर विनामूल्य उपलब्ध केल्याची श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी सांगितले.

